# नवभारत

मे - २०१५



कोशशास्त्र : संकल्पनाकोशाच्या निमित्ताने

इहवादी धर्मसमीक्षक लक्ष्मणशास्त्री जोशी

लीळाचरित्रातील लोकसंस्कृती : काही संदर्भ

क्रांतीचा जयजयकार

पुस्तक परीक्षण : 'इतिहासातील नवे प्रवाह'

वाचकांचा पत्रव्यवहार : म. शं. वाबगावकर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

# निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.**

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.**

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

रजिस्टर क्र 11697/57


आपल्या ग्रंथालयात अवश्य हवीत अशी

**प्राज्ञपाठशाळा मंडळ ग्रंथमालेची**

संग्राह्य वैचारिक मराठी प्रकाशने

| | सुधारित किंमत २० नोव्हेंबर २००६ पासून लागू |
|---|---|
| ■ वैदिक संस्कृतीचा विकास (तिसरी आवृत्ती) । तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | ३०० रु |
| ■ अद्वैतसिद्धीचे मराठी भाषांतर (पूर्वार्ध) । ब्र. स्वामी केवलानंद सरस्वती | २०० रु |
| ■ पुरोहितवर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास । डॉ. सुमंत मुरंजन | १२० रु |
| ■ हिंदी साहित्यविचार । प्रा. प्यारेलाल गोहेल | २५ रु |
| ■ श्री. यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ | ६० रु |
| ■ संशोधन साधना । डॉ. वसंत स. जोशी | ६० रु |
| ■ आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास । ऋग्वेदी | १५० रु |
| ■ वागीश्वरी । डॉ. गो. के भट | ६० रु |
| ■ गिर्यारोहण परिचय । अच्युत खोडवे | ४० रु |
| ■ इतिहासाचे तत्त्वज्ञान (दुसरी आवृत्ती) । सदाशिव आटवले | १३० रु |
| ■ शाहीर हैबती । डॉ. शिवाजीराव चव्हाण | ४० रु |
| ■ गीताचिकित्सा । भाऊ धर्माधिकारी | १४० रु |
| ■ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र) । सौ. मालती देशपांडे | २५ रु |
| ■ बौद्ध धर्माचा अभ्युदय आणि प्रसार । प. ल. वैद्य | ५० रु |
| ■ हिंदू धार्मिक परंपरा आणि सामाजिक परिवर्तन (संवर्धित दुसरी आवृत्ती) । मे. पुं. रेगे | १६० रु |
| ■ पाच पुस्तक-परीक्षणे । वा. म. कुलकर्णी | ६० रु |
| ■ भेदविलोपन : एक आकलन । अशोक केळकर | ३० रु |
| ■ कॉलिंगवुडची कलामीमांसा - एक भाष्य । रा. भा. पाटणकर | १०० रु |
| ■ धर्मश्रद्धा : एक पुनर्विचार । दि. के बेडेकर | ३० रु |
| ■ आचार्य शं. द. जावडेकर : व्यक्तित्व आणि विचार | १०० रु |
| ■ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कार्य आणि विचार | १५० रु |
| ■ इहवाद आणि सर्वधर्मसमभाव । मे. पुं. रेगे | १२० रु |
| ■ प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा | २०० रु |
| ■ चार्वाक: इतिहास आणि तत्त्वज्ञान (तृतीयावृत्ती) । सदाशिव आठवले | १०० रु |
| ■ विनोबांची संस्कृत साम्यसूत्रे (रसग्रहणात्मक मराठी अनुवाद) । वसंत नारगोलकर | १२० रु |
| ■ नागरी समाज, राज्यसंस्था आणि लोकतंत्र : भारतीय संदर्भात विवेचन । द. ना. धनागरे | ४० रु |
| ■ प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती (निवडक मौलिक लेखांचा संग्रह) । डॉ. म. अ. मेहेंदळे | ५५० रु |
| ■ हिंदुधर्माची समीक्षा आणि सर्वधर्मसमीक्षा (दुसरी आवृत्ती) : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | २२५ रु |
| ■ पाश्चात्त्य नीतिशास्त्राचा इतिहास (दुसरी आवृत्ती) : प्रा. मे. पुं. रेगे | १६० रु |

१) ग्रंथालये व संस्थांना किंमतीत १० टक्के सूट. पोस्टेजचा खर्च वेगळा पडेल. २) व्ही. पी. ची पद्धत नाही.
३) पैसे मनिऑर्डरने वा ड्राफ्टने पाठवावेत.

संपर्कासाठी पत्ता : चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५ गंगापुरी, वाई ४१२८०३ (जि. सातारा) फोन :(०२१६७)२२०००६


हे मासिक प्रा. यशवंत कळमकर यांनी सन प्रिंटर्स, गणपती आळी, वाई, पिन : ४१२८०३ येथे छापून सरोजा भाटे यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांच्याकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई संचालित मासिक

# नवभारत

वर्ष ६८ अंक ८ मे २०१५
वैशाख/जेष्ठ शके १९३७
वार्षिक वर्गणी ४०० रुपये
या अंकाची किंमत रु.३०/-

या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व प्राज्ञपाठशाळा मंडळ सहमत असतीलच, असे नाही.

## नवभारतची भूमिका*

मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारे महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणे, हे या मासिकाचे ध्येय व उद्दिष्ट आहे.

ध्येयप्रवण व्यक्तींनी स्वोन्नतीच्या हेतुपूर्तीसाठी जे आपले सांस्कृतिक मूल्यमापन ठरविलेले असेल, उच्च वातावरणातील जो अभिजात अनुभव स्वतःच्या साधनेने संगृहीत केलेला असेल, त्याचे दिग्दर्शन हेच संस्कृतिपोषक वाङ्मय होऊ शकते, असा संचालक व संपादक-मंडळ यांचा विश्वास आहे.

या मासिकात येणाऱ्या लेखांत कोणत्याही विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतू नाही.

संचालक व संपादक-मंडळातील सर्व व्यक्ती यांचेही सर्व विषयांत मतैक्य आहे, असे नाही. मानवी जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधी सदृश अशा दृष्टिकोणानेच त्यांना एकत्र आणले आहे. तथापि प्रत्येकाचे व्यक्तिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य यांचा विनाश न होता विकास व्हावा, या दृष्टीनेच त्यांचे सहकार्य राहील. प्रत्येक व्यक्ती आपल्या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या लेखाबद्दलच जबाबदार राहील.

मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लिखाणात सत्यनिष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील, अशी काळजी घेतली जाईल.

*नवभारत, ऑक्टोबर १९४७, वर्ष १ ले, अंक १ मधील कै. शंकरराव देव यांच्या 'संचालकांचे मनोगत' मधून.

प्राज्ञपाठशाळामंडळ
अध्यक्ष व विश्वस्त :
सरोजा भाटे

संपादक :
श्री. मा. भावे

संपादक मंडळ :
वसंत पळशीकर,
यशवंत कळमकर

संपादकीय पत्रव्यवहार :
संपादक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा).
फोन : (०२०) २५६७४०९३.

व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :
नीता गायकवाड
व्यवस्थापक, नवभारत मासिक
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा)
फोन : (०२१६७) २२०००६.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाला अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच, असे नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

# नवभारत

## मे २०१५

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ❁ | **कोशशास्त्र : संकल्पनाकोशाच्या निमित्ताने**<br>रमेश वा. धोंगडे | ४ |
| ❁ | **इहवादी धर्मसमीक्षक लक्ष्मणशास्त्री जोशी**<br>नवनाथ रासकर | ७ |
| ❁ | **लीळाचरित्रातील लोकसंस्कृती : काही संदर्भ**<br>अविनाश आवलगावकर | १९ |
| ❁ | **क्रांतीचा जयजयकार**<br>सुरेश भृगुवार | ३० |
| ❁ | **पुस्तक परीक्षण :**<br>**'इतिहासातील नवे प्रवाह'**<br>मृणाल जोशी | ३९ |
| ❁ | **वाचकांचा पत्रव्यवहार :**<br>**म. शं. वाबगावकर** | ४२ |




मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

## प्रा. यशवंत सुमंत

'नवभारत' मासिकाचे माजी संपादक आणि प्राज्ञपाठशाळामंडळाशी ज्यांचा बराच काळ संबंध होता असे प्रा. यशवंत सुमंत यांचे शनिवार दि. ११ एप्रिल २०१५ रोजी पहाटे निधन झाले, हे कळविण्यास आम्हांस परम दुःख होत आहे. मरणसमयी त्यांचे वय ६० वर्षांचे होते.

प्रा. सुमंत १९७५ ते ७७ या काळात त्या वेळच्या पुणे विद्यापीठात एम. ए. चे विद्यार्थी होते, तेव्हापासून मी त्यांना ओळखत होतो. अतिशय उमदे व होतकरू विद्यार्थी. त्यांच्याशी थोडा वेळ जरी संभाषण झाले, तरी चर्चाविषयासंबंधी त्यांना वाटणारी आल्या, त्या प्रश्नांच्या विविध पैलूंचे त्यांना होणारे झटिती आकलन, समोरच्याला मोठेपणा देऊन बोलण्यातील त्यांचा विनय आणि निराग्रही विवेचन या त्यांच्या गुणांची ओळख पटत असे. पुढे समाजवादी व परिवर्तनवादी झालेल्या प्रा. सुमंत यांचा विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठीचा अभ्यासविषय 'सावरकर आणि क्रान्तिकारक' असा होता, हे फारच थोड्या जणांना माहीत असेल.

त्या काळात राज्यशास्त्र विभागातील हुशार आणि अभ्यासू विद्यार्थी प्रा. राम बापट यांच्या प्रभावाखाली आल्यावाचून राहत नसत. प्रा. बापट समाजवादी विचारांचे आणि परिवर्तनाचा चिंतनशील ध्यास घेतलेले विचारवंत होते. प्रा. बापटांचे विचार आणि विवेचनशैली यांची छाप प्रा. सुमंत यांच्यावर पडलेली स्वच्छ दिसत असे. प्रा. सुमंत हेही समताधिष्ठित समाज आणि मूलगामी सामाजिक परिवर्तन यांचे व्रत घेतलेले विचारक होते. आधुनिक भारतातील पुरोगामी विचारांचे दीपस्तंभ असेच ज्यांचे वर्णन करावे लागेल असे महात्मा फुले, डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या वाङ्मयाचा गाढ अभ्यास त्यांनी केला होता. मात्र त्यांचा दृष्टिकोण या तिघांच्या विचारातील मूलभूत जवळीक दाखविण्यावर जास्त असे आणि त्यातील विरोध हा केवळ नैमित्तिक होता, असे ते सांगत असत.

पुरोगामी परिवारातील एक अग्रगण्य विचारक व प्रभावी प्रतिपादक म्हणून त्यांची ओळख महाराष्ट्राला झाल्यावर ठिकठिकाणच्या चर्चासत्रांतून व व्याख्यानमालांतून भाषणे करण्यासाठी त्यांना निमंत्रणे येऊ लागली. साताऱ्याच्या 'विचारवेध' चळवळीशी त्यांचा निकटचा संबंध आला व 'विचारवेध' संमेलनाचे ते अध्यक्षही झाले. एकदा चळवळीत सामील झाले की, फिरस्ती आलीच. बरे, ते ज्या संस्थांतून किंवा गटांतून व्याख्याने द्यायला जात, त्यांची आर्थिक स्थिती चांगली असेच, असे नाही. त्यामुळे प्रा. सुमंतांचा प्रवास बऱ्याच वेळा राज्यपरिवहनमंडळाच्या लाल डब्यातूनच होत असे. शालीनता व भिडस्तपणा यांच्यामुळे प्रा. सुमंत आमंत्रण नाकारूही शकत नसत. त्यांच्या या वणवणीसंबंधी मी थट्टेच्या सुरात त्यांना समजावतही असे.

प्रा. सुमंत हे एप्रिल २००२ ते सप्टेंबर २००७ या काळात 'नवभारता'चे संपादक होते. त्यांच्या प्रकृतीच्या व कौटुंबिक अडचणींमुळे ते या कार्याकडे नीटपणे लक्ष देऊ शकले नाहीत, ही दुर्दैवाची गोष्ट होती. त्यामुळे अंकांची थकबाकी वाढत गेली. त्यांचा प्राज्ञपाठशाळामंडळाकडे आग्रह चाललाच होता की, "दुस्तर विघ्ने आल्यामुळे मी मनापासून काम करू शकत नाही; तरी मला संपादकत्वापासून मोकळे करा." त्यांची ही अगतिकता पटल्यामुळे मोठ्या अनिच्छेने आम्ही त्यांना २००७ साली निरोप दिला.

त्यानंतरही माझ्या व त्यांच्या भेटी अधूनमधून होतच असत. निरनिराळ्या विषयांवर चर्चा होई. परंतु गेली दोन-तीन वर्षे तरी असे जाणवत असे की, उत्साह व तरतरी ओसरत चालली आहे. गेले तीन महिने ते बरेच आजारी होते. तरी इतक्या अकस्मात त्यांचे निधन होईल, असे वाटले नव्हते. एक शालीन व सहृदय सहकारी निवर्तला, ही खंत जवळ राहिली.

श्री. मा. भावे,
संपादक, नवभारत मासिक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

# कोशशास्त्र : संकल्पनाकोशाच्या निमित्ताने

रमेश वा. धोंगडे

### कोशांचे प्रकार

संकल्पनाकोश आणि शब्दकोश यांत फरक आहे. शब्दामधून उभे राहणारे आदिरूप हा त्याचा अर्थ असला, तरी आदिरूप म्हणजे संकल्पना नव्हे. संकल्पना वस्तुदर्शक नसते, भावदर्शकही नसते; अनेक विचार आणि अनुभवसमुच्चयातून संकल्पना अवतरते. सोयीसाठी संकल्पनेचे नामाभिधान शब्दातून होते एवढेच. पण संकल्पना म्हणजे केवळ शब्द किंवा कुठलाही शब्द नव्हे. 'घोडा' हा शब्द आहे, घोड्याचे आदिरूप हा त्याचा अर्थ आहे; पण 'राष्ट्रप्रेम' ही संकल्पना आहे.

विशिष्ट अर्थक्षेत्रातील शब्दांचा कोश करता येतो. उदाहरणार्थ, 'शरीर' हा शब्द घेतला तर त्यात शरीराचे अवयव, शरीरक्रिया, शरीरव्याधी अशी उपक्षेत्रे येतात व त्या त्या क्षेत्रोपक्षेत्रांतील शब्द संग्रहित करणे म्हणजे अर्थ-क्षेत्राधारित कोश करणे. त्याला संकल्पनाकोश म्हणता येणार नाही. अशा कोशात संग्रहित शब्दांच्या परस्परसंबंधांचा, शब्दपर्यायांचा विचार करावा लागतो.

केवळ शब्दपर्यायांचा किंवा समानार्थी शब्दांचा कोश –थिसॉरस– हा आणखी एक प्रकार.

थिसॉरस-शब्दकोश-ज्ञानकोश ही कोशातील माहितीची चढत जाणारी श्रेणी. ज्ञानकोश अर्थक्षेत्रे निवडून तयार करता येतात. उदाहरणार्थ, 'शेती' हे अर्थक्षेत्र घेतले, तर त्याच्याशी संबंधित सर्व माहिती देणारा कोश हा शेतीचा ज्ञानकोश. ज्ञानकोश विद्याशाखांच्या आधारेही करता येतात. यामध्ये विज्ञान, कला, साहित्य, इतिहास व संस्कृती यांचा समावेश करता येतो. एक प्रकारे ही मोठी अर्थक्षेत्रेच.

### कोशाची रचना

कोशाची रचना व व्याप्ती या गोष्टी कोशकाराच्या आवडीवर व क्षमतेवर अवलंबून असतात हे खरे; पण कोशाची ही प्राथमिक अवस्था आहे. थिसॉरस-शब्दकोश--ज्ञानकोश हे सांघिक कार्य केल्यास त्याची व्याप्ती व अर्थघनता वाढते. हा संघ तज्ज्ञांचा, कोशविद्येतील प्रशिक्षितांचा असतो-असावा. केवळ उपलब्धता आणि सोय यांवर संघाची निवड करणे बरे नव्हे. संघ असल्यावर वैयक्तिक मते बाजूला ठेवणे शक्य होते.

कोशामध्ये काय घ्यायचे व काय घ्यायचे नाही, निवडलेले कोणत्या स्थानी ठेवायचे, कोशातून देण्यात येणाऱ्या माहितीचा एक साचा (पॅटर्न) कसा निर्माण करायचा व तो सातत्याने सर्वत्र कसा राबवायचा वगैरे गोष्टींचे एक 'धोरण' ठरवावे लागते. संघकार्य असल्यास यासाठी प्रमुख संपादक लागतो. पण एका माणसाने कोश केला, तरी हे धोरण असावेच लागते. बहुधा कोशाच्या प्रस्तावनेत हे 'धोरण' स्पष्ट केले जाते. प्रथम 'धोरण' व नंतर कोशरचना हा क्रम असतो-असावा.

शब्दकोश एकभाषी किंवा बहुभाषी असू शकतो. परिभाषाकोश हा बहुधा द्विभाषी कोश असतो. द्विभाषी शब्दकोशाची रचना करताना मूळ भाषा आणि लक्ष्य भाषा यांच्या संरचनेचे, यांच्या सांस्कृतिक संदर्भांचे ज्ञान कोशकाराला असावे लागते. या दोन भिन्न गोष्टींचा तोल राखणे हे एक वेगळे आव्हान असते.

### कोशाचा आशय

थिसॉरसमध्येही पर्यायांचे अर्थ व त्यांचा वापर यांनुसार उपगट केलेले असतात.

शब्दकोशात शब्दाचे लेखन, उच्चारण, व्याकरण व अर्थ हे घटक आशयाचेच असतात. शब्दांचे परस्परसंबंध, शब्दसिद्धी या गोष्टींच्या समावेशाने आशयघनता वाढते. शब्दवापराची उदाहरणे, त्यांचा अस्सलपणा, त्यांच्या वापराचे संदर्भ यांवर शब्दकोशाच्या आशयाचे गुण ठरतात. म्हणूनच शब्दकोशासाठी उच्चारित व लिखित भाषितांचा साठा आवश्यक असतो. हा साठा म्हणजे डेटा किंवा सामग्री. ही सामग्री संगणकात विशिष्ट रीतलेख (प्रोग्रॅम) वापरून साठविली की, डेटाबेस तयार होतो. या सामग्रीची कालानुसार, स्थलानुसार, बोलीनुसार



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आणि शैलीनुसार वर्गवारी करतात.

ज्ञानकोश करताना प्रत्येक क्षेत्राच्या संबंधित विद्याशाखेची अद्ययावत माहिती असणारा तज्ज्ञ मदतीला असणे आवश्यक असते. एका व्यक्तीला सर्व क्षेत्रांतील ज्ञान चिकित्सकपणे गोळा करणे अशक्य असते. प्रत्येक ज्ञानशाखेचे आधुनिक रूप, तिची सांप्रत अवस्था, तिच्या विकासाचे टप्पे, तिचा इतर शाखांशी संबंध, तिच्यातील सैद्धान्तिक वाद-प्रतिवाद यांतून ज्ञानकोशाचा आशय ठरतो.

**कोशाचा वापर करणारा (वापरक?)**

कोशाचा – थिसॉरस, शब्दकोश, ज्ञानकोश – प्रकार, त्याची रचना, त्याचा आशय या सर्वांवर मोठा प्रभाव पाडणारा घटक म्हणजे कोशाचा अभिप्रेत वापरक.

कोशाला 'वाचक' नसतो, 'वापरणारा' असतो. कोश हे 'साधन' आहे, 'सिद्ध' लेखन नव्हे. 'छंद' म्हणून कोश तयार करणे आणि 'छंद' म्हणून कोश वाचणे हे छंद म्हणून नटाने स्त्रीभूमिका करणे आणि छंद म्हणून प्रेक्षकाने नाटकातील पात्रे वास्तवात शोधण्यासारखे आहे. थोडक्यात, या गोष्टींना 'मुलखावेगळी आवड' यापलीकडे महत्त्व देता येत नाही.

'कोश कोणासाठी?' या प्रश्नाचे 'सर्वांसाठी' किंवा 'कोणाहीसाठी' हे उत्तर फारच जुजबी असते, भाषेसंबंधित प्रश्न पडणाऱ्यांना उत्तरांची 'गरज' असते, अडचणी असणाऱ्यांना उपायांची गरज असते. अशी 'गरज' असणाऱ्यांना 'मदत' करणे हेच कोणत्याही कोशाचे उद्दिष्ट असते-असायलाच हवे. 'गरज' आणि 'मदत' यांची जोड फिट्ट बसली, तरच कोश खपतात व टिकतात. न वाचल्या जाणाऱ्या साहित्यासारखे किंवा अल्पजीवी लोकप्रिय साहित्यासारखे न वापरले जाणारे आणि अपेक्षाभंग करणारे कोशही असतात.

विभिन्न गरजा भागविण्याच्या क्षमतेनुसार कोशांची रूपे बदलतात. शालेय शब्दकोश, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीचा शब्दकोश, जिज्ञासूंसाठीचा शब्दकोश यात व्याप्ती, रचना व आशय यांमध्ये फरक असतो-असावा. लहान मुलांसाठीचा ज्ञानकोश आणि प्रौढ माणसांसाठीचा ज्ञानकोश यांतही फरक असतो.

यामुळे आपणाजवळचे सर्व ज्ञान, किस्से, आपल्या वैयक्तिक आवडीनिवडी, आपल्या सर्व पसंती हे सर्व कोशकाराने कोशात घालायचे नसते. कोशकारकेन्द्री कोश आणि वापरककेन्द्री कोश यांतील दुसरा कोश हा महत्त्वाचा, उपयुक्त आणि व्यावहारिक दृष्ट्या यशस्वी ठरतो.

**संकल्पनाकोशाविषयी**

संकल्पनाकोशातील प्रत्येक नोंद ही संकल्पना असायला हवी. वस्तू आणि संकल्पना यांतला फरक इथे लक्षात घ्यायला हवा.

संकल्पना ही क्वचितच सुटी व एकटी असते. कोशकाराने 'संकल्पनाव्यूह' हे लक्ष्य करायला हवे.

समांतर संकल्पनांच्या मुळाशी असणारी सैद्धान्तिक बैठक तपासल्यास या संकल्पनांना विशिष्ट भाषेने दिलेली नावे हे पर्यायशब्द नव्हेत, हे लक्षात येईल. उदाहरणार्थ, वैद्यकीय क्षेत्रातील मराठीतील 'नाडी' आणि इंग्रजीतील 'vein', इंग्रजीतील 'disease, disorder' आणि मराठीतील 'रोग, विकृती' हे खरे पर्याय नव्हेत.

संकल्पनांचा विचार करताना भाषांप्रमाणेच संस्कृती, ज्ञानरचना यांचे, त्यांतील फरकांचे भान कोशकाराला हवे. संकल्पनाकोशात हे फरक आशयामध्ये स्पष्ट व्हायला हवेत. केवळ पारिभाषिक शब्द देऊन भागणार नाही. उदाहरणार्थ, 'Tragedy' ही संकल्पना केवळ 'शोकनाट्य', 'शोकात्मिका' वगैरे शब्द वापरून कळणार नाही.

**भाषा व कोश**

एखादी भाषा, तिचे नियोजन, तिचे प्रमाणीकरण, तिचा वापर यांची अवस्था त्या भाषेतील कोशवाङ्मय दाखविते. कोशवाङ्मय हे या अर्थाने भाषेचा आरसा असते.

भाषेचे नियोजन व तिचे प्रमाणीकरण याला कोशवाङ्मय हातभार लावते; पण म्हणूनच कोशवाङ्मयाची जबाबदारी वाढते.

मात्र वेगवेगळे कोश तयार करून भाषा समृद्ध होते वा करता येते, हा समज अडाणीपणाचा आहे. उदाहरणार्थ, मराठीच्या बोलींचे कोश करून मराठी समृद्ध होईल, हा एक अडाणी समज.

भाषेच्या अध्यापनास कोशवाङ्मय आवश्यक आहे. विद्यार्थी व शिक्षक या दोघांनाही.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

भाषेच्या प्रमाणीकरणासाठी कोशवाङ्मय उपकारक आहे. शिक्षण, वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमे यांतून प्रमाणभाषेचे रूप ठसविले जाते. ते रूप प्रमाणित करण्यास कोशवाङ्मयाची मोलाची मदत होते.

मात्र भाषेच्या विकासास थेटपणे कोशवाङ्मय हातभार लावत नाही. भाषेचा विकास हा विविध क्षेत्रांत त्या भाषेच्या होणाऱ्या वापरावर अवलंबून असतो. भाषकांनी प्रथम हा वापर करायला हवा. त्या वापरातील अडचणी सोडविण्यासाठी ज्ञान, ज्ञानाचे सांस्कृतिक स्थान, ज्ञानाची सामाजिक प्रतिष्ठा, ज्ञानाचा प्रसार, ज्ञान-निर्मितीच्या त्या भाषेतील शक्यता व प्रक्रिया यांच्याबरोबर कोशवाङ्मय हे एक साधनभूत घटक म्हणून राहते.

---


प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आमचे नवीन प्रकाशन

## साहित्याचे तर्कशास्त्र

**( तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची साहित्यविषयक अध्यक्षीय भाषणे )**

**संपादक : सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे.**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अनेक प्रसंगी साहित्यावर आपल्या भाषणांमधून जे विचार मांडले, त्या भाषणांचा हा संग्रह मराठी साहित्याच्या अभ्यासकांना आणि सर्वसामान्य वाचकांनाही मार्गदर्शक ठरावा असा आहे. या ग्रंथात शास्त्रीजींनी संस्कृत साहित्यशास्त्राचे विचारमंथन तर केलेले आहेच; याखेरीज त्यांनी आधुनिक साहित्यविचाराचीही दखल घेतलेली आहे. हा ग्रंथ मराठी साहित्याच्या अभ्यासकांना अतिशय मौल्यवान ठरावा, असाच संपन्न झालेला आहे. संपादकमंडळाने प्रदीर्घ प्रस्तावना सुरुवातीस देऊन या ग्रंथाचे मोल अधिकच वाढविले आहे.

**पृष्ठे : ४२ + ४३७** **किंमत रु. ७५०/-**

**संपर्कासाठी पत्ता : चिटणीस, प्राज्ञपाठशाळामंडळ,**
**३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा.**
**दूरध्वनी क्र. ०२१६७/२२०००६**




मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

# इहवादी धर्मसमीक्षक लक्ष्मणशास्त्री जोशी

नवनाथ रासकर

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनचरित्राकडे पाहिल्यावर आणि त्यांच्या लेखनकर्तृत्वाचा आढावा घेतल्यावर असे लक्षात येते की, त्यांच्या भूमिकेत सदोदित बदल होत गेला आहे. त्यांच्या धर्मचिंतनाला 'आनंद मीमांसा' या पुस्तकापासून आरंभ झाल्याचे दिसते. अर्थात धर्मनिर्णयमंडळाच्या धर्मसुधारणेच्या कार्यक्रमात ते सामील होते. काही सुधारणा त्या त्या अनुषंगाने त्यांनी सुचविल्या. एवढेच नव्हे, तर अन्य (धर्मावरील) चर्चासत्रांमध्ये सामील होऊन आपली स्वतंत्र व बुद्धिवादी भूमिका घेऊन मतप्रदर्शने नोंदविली आहेत. पण येथे त्यांच्या धर्मचिंतनासाठी प्रामुख्याने लिखित साहित्याचा आधार घेऊन मांडणी केली आहे.

आनंदमीमांसा, हिंदुधर्माची समीक्षा, जडवाद अर्थात निरीश्वरवाद, वैदिक संस्कृतीचा विकास अशा पुस्तकांच्या माध्यमातून त्यांचे झालेले धर्मचिंतन येथे प्रस्तुत आहे. त्यांच्या लेखनसंग्रहाचाही यात समावेश केला आहे. वर म्हटल्याप्रमाणे त्यांच्यात सतत बदल होत गेला आहे. हा बदल विकासात्मक, व्यापक अशा स्वरूपाचा दिसतो. डॉ. अंतरकरांनी या संदर्भात रसेल यांचा दाखला दिला आहे. "रसेलच्या विचारांत सारखे बदल होत गेले, त्याचप्रमाणे सतत परिवर्तनशीलता हा तर्कतीर्थांच्या विचाराचाही स्थायिभाव होता. या परिवर्तनातही रसेलच्या विचारात एक प्रकारची एकात्मता आढळते,... तर्कतीर्थांच्या बाबतीतही हे खरे आहे. त्यांचा विचार प्रवाही आहे. ...परंतु त्यांच्या वैचारिक बदलातही एक सूत्र आहे."[१४]

तर्कतीर्थांनी जे धर्मचिंतन केले, त्यात आनंद-मीमांसेसाठी वापरलेली पद्धती आणि 'हिंदुधर्माची समीक्षा' यासाठी वापरलेली पद्धती ही भिन्न भिन्न आहे, असे डॉ. तळघट्टी यांचे म्हणणे आहे. अर्थात तर्कतीर्थांनीच हे मान्य केले आहे. ऐतिहासिक भौतिकवादाच्या प्रभावाखाली येण्यापूर्वी 'आनंदमीमांसा' लिहिली आहे (१९२८). यात वापरलेल्या पद्धती ऐतिहासिक पद्धतीहून भिन्न आहेत. नंतर मात्र (१९४०) त्यांनी 'हिंदुधर्माची समीक्षा' यासाठी ऐतिहासिक पद्धती स्वीकारली आहे. नंतर तर त्यांनी याहून व्यापक भूमिका घेतली आहे. वैदिक संस्कृतीचा विकास आणि इतर लेखन व विचार यांतून ते तेच सांगतात. एवढेच नव्हे, तर भौतिकवादाच्या, मार्क्सच्या ऐतिहासिक पद्धतीच्या मर्यादाही दाखवितात.[१५] येथवरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, तर्कतीर्थांच्या भूमिकेत ठामपणा व निश्चितता, नेमकेपणा नव्हता. मात्र त्यांच्या चिंतनात एकूण व्यापकता होती, हेही तेवढेच खरे आहे.

## (आ) धर्मचिंतन

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या धर्मचिंतनाचा मागोवा घेताना एक गोष्ट स्पष्ट लक्षात येते; ती म्हणजे त्यांच्यावर मार्क्सवाद, बुद्धिवाद, जडवाद आणि अध्यात्मवाद या सर्वांचा प्रभाव आहे. येथे अध्यात्मवाद हा शब्दप्रयोग अनुचित वाटेल; पण त्यांच्यावर अध्यात्माचाही प्रभाव होता हे त्यांच्या एकूणच कार्यावरून -लेखन, वाचन, चिंतन, भाषण यावरून- आणि धर्मसुधारणांवरून लक्षात येते.

त्यांचे धर्मचिंतन एका विशिष्ट ग्रंथात सामावलेले नाही. ते विखुरलेले आहे. ते लेखरूपात आणि पुस्तकरूपातही आहे. त्यांच्या धर्मचिंतनाचा-चिकित्सेचा आरंभ 'आनंदमीमांसा' या पुस्तकाने होतो. त्यानंतर हिंदुधर्माची समीक्षा, जडवाद अर्थात निरीश्वरवाद, वैदिक संस्कृतीचा विकास, सर्वधर्मसमीक्षा आणि विविध लेख व भाषणे अशा पद्धतीने, क्रमाने झाला आहे.

## (१) आरंभीची भूमिका

आनंदमीमांसेत, 'आनंदाद्धमेव खल्विमानि भूतानि जायन्ते आनन्देन जातानि जीवन्ती, आनंन्द प्रयन्त्यभिंस विशन्तीति । तद्विजिज्ञासस्वत तदब्रह्मेति ।' या तैत्तिरिय उपनिषदातील सिद्धान्ताचा विचार केला आहे.[१६]

यासाठी त्यांनी सांगितलेल्या तात्त्विक सिद्धान्ताच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

परीक्षणाच्या तीन पद्धतींतील दोन पद्धती योजल्या आहेत. ह्या तीन पद्धती म्हणजे प्रमाणपद्धती, मानसिकपद्धती, नैतिकपद्धती. यांतील मानसिक व नैतिकपद्धतींच्या आधारे ते हे कार्य करतात. कारण पहिल्या प्रमाणपद्धतीद्वारे, "आनंदमय तत्त्वाचे परीक्षण करण्याची शक्ती प्रस्तुत लेखकाच्या ठायी नाही. नैषा तर्केण मतिरापनेया।" (कठो. - १ - २ - ९) असे म्हणतात.[१७]

आनंदमीमांसेत तर्कतीर्थांनी 'आनंदमय विश्व' या अंगाने चर्चा करून वैदिक काळात आनंदमीमांसेवर भर दिला गेला किंवा वैदिक वाङ्मय व वैदिक संस्कृती आनंदमीमांसेचे उगमस्थान आहे, असे मत नोंदविले आहे. अडीच हजार वर्षे भारतात दुःखवादाचे प्रचंड सावट आहे. बौद्ध, जैनांपासून ते अलीकडच्या साधुसंतांपर्यंत भारतात दुःखवाद-निवृत्तीला महत्त्व होते/आहे. भारतीय दर्शनेही दुःखावरच भर देऊन दुःखमुक्तीसाठी ऐहिक जीवन व त्यानुषंगी सुखांवर पाणी सोडायला भाग पाडत आली आहेत. मोक्ष हेच त्यांचे ध्येय आहे, अशी चर्चा तर्कतीर्थ करतात. वैदिक काळात मात्र ऐहिक जीवनाला, मानवी शरीर-मन, समाज या गोष्टींनाही महत्त्व होते. कारण मानवी जीवनच नव्हे तर संपूर्ण विश्वच आनंदमय आहे, असा विचार त्या काळी होता; त्यामुळे समाजाची खरी प्रगती होत होती. समाज गतिशील, चैतन्यशील होता, असे विवेचन तर्कतीर्थ करतात.

"देवतोपासना, नीती आणि व्यवहार या तिघांच्या संमीलनाने समाजातील सुख आणि शांती वाढत असते. वैदिक धर्मात या तिन्ही गोष्टींचा पूर्ण समावेश केला आहे."[१८] आनंद हेच जीवनाचे, जगण्याचे, विश्वाचे मर्म आहे, असे तर्कतीर्थांना वाटते. वरील विचारातून किंवा या पुस्तकातून त्यांचा कल प्रवृत्तिवादाकडे आहे, हेच लक्षात येते. वैदिक काळातील शरीर, मन, गृहस्थाश्रम, समाज, नीती, धर्म, देव आदींविषयी चर्चा करून हाच काळ-समाज गतिशील होता, असा त्यांचा निष्कर्ष आहे आणि यातच आनंदाचा उदय झालेला होता, असे स्पष्टीकरण तर्कतीर्थ देतात.

"आनन्दाद्धमेव खल्विमानी
तद्विजिज्ञासस्च तदब्रह्मैति ।।"

या तैत्तिरीय उपनिषदातील, आनंदातून विश्वाची उत्पत्ती होते, आनंदात विश्वाची स्थिती असते व आनंदातच विश्वाचा लय होतो हे ज्याला-ज्यांना कळले, समजले त्यांचाच विकास, प्रगती होते. आनंदमीमांसेतील मुख्य समस्या प्रवृत्तिवाद की निवृत्तिवाद, आनंदवाद की दुःखवाद ही आहे. धर्म की इहवाद की जडवाद की चैतन्यवाद ही मुख्य समस्या तेथे नाही. ही समस्या तर्कतीर्थांच्या नंतरच्या धर्मचिंतनात मध्यवर्ती बनलेली दिसते. उपनिषदे, भगवद्गीता आणि धर्मशास्त्र ऐहिक, सामाजिक जीवन स्वीकारताना आणि त्याविषयी भलावण करताना दिसतात, असे तर्कतीर्थ सांगतात.

तात्पर्य, 'आनंदमीमांसा' यात तर्कतीर्थ प्रवृत्तिवादाला महत्त्व देतात. आजचा भारतीय समाज असा व्हायला हवा, अशी त्यांची अपेक्षा आहे. यातून त्यांचा धर्म नाकारण्याकडे कल नसला तरी स्वीकारण्याकडे प्रत्यक्ष कल नाही, असे दिसते.[२०]

हीच भूमिका की जी सौम्य आहे, जडवाद आणि चैतन्यवाद या दोहोंच्या मध्यावर आहे; पण 'हिंदुधर्माची समीक्षा' करताना ती बदललेली दिसते किंवा जडवादाकडे पूर्णतः झुकलेली दिसते. धर्मसमीक्षा करताना तर्कतीर्थांनी ऐतिहासिक पद्धतीचा आधार घेतला आहे. मार्क्सवादी दृष्टीने धर्म (हिंदुधर्म) विचार नाकारण्याकडे त्यांचा कल आहे; पण ऐतिहासिक पद्धतीद्वारे धर्माचे इतिहासातील महत्त्वाचे स्थान त्यांनी लक्षात घेतले आहे.

तर्कतीर्थांनी धर्माची व्याख्या अशी दिली आहे– "निसर्गातील अत्यंत पवित्र, संपूर्ण मानवी भवितव्य, सबंध जीवन, विश्व अथवा निसर्ग यांच्या नियंत्रक अशा अलौकिक शक्तीवर (किंवा अशा शक्तींवर) माणसाची श्रद्धा असते; त्या शक्तीचा (वा शक्तींचा) स्वतःशी अनुकूल, पवित्र व घनिष्ट संबंध स्थापित करणारी वैयक्तिक अथवा सामाजिक मनःप्रवृत्ती व त्यातून निघणारी आचरणाची पद्धती म्हणजे धर्म (रिलिजन) होय."[२१]

धर्माची ही सामान्य व्याख्या होय. उच्च धर्माचीही व्याख्या तर्कतीर्थ पुढे देतात, "जीवन परिपूर्ण व कृतार्थ करणारी अपरिपूर्ण, दोषमय, अशांत जीवन बदलून टाकणारी, उच्चतम ध्येयाच्या म्हणजे दिव्यत्वाच्या प्राप्तीची पद्धती म्हणजे धर्म होय."[२२] अशा तऱ्हेने धर्माच्या सामान्य व विशेष अशा दोन व्याख्या ते सांगतात.



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तर्कतीर्थांनी धर्मलक्षण सांगताना सामान्य व विशेष लक्षणे असा भेद केला आहे. धर्माचे सामान्य लक्षण, "अलौकिक शक्तींच्या कल्पनेवर आधारलेले व श्रेयस्कर मानलेले मानवी आचरण म्हणजे धर्म होय,"[२३] असे सांगतात. हे लक्षण सुधारलेल्या व मागास अशा सर्व समाजांतील धर्मसंस्थांना लागू होते; म्हणून हे सामान्य लक्षण होय.

"सगळ्या विश्वाच्या घडामोडींच्या मुळाशी गृहीत धरलेल्या अलौकिक शक्तींच्या कल्पनेवर आधारलेले, श्रेयस्कर मानवीय आचरण म्हणजे धर्म होय, अशी सुधारलेल्या धर्माची व्याख्या आहे.[२४]

धर्माकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण ऐतिहासिक पद्धतीचा आहे. 'आनंदमीमांसा' हा ग्रंथ मार्क्सप्रभाव-रहित असा असला, तरी त्यातही त्यांनी ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब केल्याचे दिसते. १९२३ मध्ये सोनगीर येथील धर्मसभेत पुरोगामी धर्मविचारांच्या बाजूने तर्कतीर्थ बोलले, तेव्हा ते म्हणाले, "धर्मग्रंथांचा काळजीपूर्वक तपास केल्यास धर्म पालटत गेल्याचे कोणत्याही माणसास कळून यावे. इंद्रियसंयमी माणूस हे जाणतो."[२५] एवढा पुरावा त्यांच्या दृष्टिकोणासाठी पुरेसा आहे असे म्हणता येईल. अन्यत्र ठिकठिकाणी ऐतिहासिक पद्धतीचाच त्यांनी उल्लेख केलेला दिसतो. याची चर्चा पुढे येईलच.

धर्माची बीजे आदिमानवाच्या काळापर्यंत मागे जातात. प्राथमिक अवस्थेपासून वर्तमानातील सुधारलेले जेवढे मानवी समाज आहेत, त्या सर्वांमध्ये धर्म अस्तित्वात होता, असे अभ्यासपूर्वक मत तर्कतीर्थ मांडतात. आधी ऐहिक गरजांपोटी धर्म उदयाला आला आणि मर्यादित राहिला; पण नंतर जेव्हा माणूस स्थिर झाला, त्याच्या ऐहिक गरजा भागून त्याला निवांतपणा लाभला, तेव्हा परलोकवादी धर्म उदयाला आले. कारण या काळात माणसापुढील प्रश्न होता तो मरणोत्तर जीवनाचा. नंतरच्या जीवनात प्राथमिक स्थितीतील बलिदान, पूजा, प्रार्थना मात्र चालूच राहिल्या, असे ते प्रतिपादतात. सर्व धर्मांची समीक्षा करताना धर्मस्वरूप, धार्मिक तत्त्वज्ञाने, धर्मविषयक भूमिका घेणारी इतर शास्त्रे आणि धर्म व विज्ञान या मुद्द्यांच्या साह्याने तर्कतीर्थांनी ही समीक्षा केली आहे.

धर्मस्वरूपात धर्मविषयक व्याख्या, लक्षणे, प्रकार आदींचा विचार ते करतात. तर्कतीर्थांच्या मते धर्मविषयक व्याख्येत उच्च धर्माची व्याख्या प्रथम भारतीय विचारवंतांनी केली आहे. जैमिनी, व्यास, कणाद या तीन भारतीय विचारवंतांचा ते व्याख्येसाठी अधिक विचार करतात.

तर्कतीर्थांच्या मते जैमिनी (पूर्वमीमांसक) ची व्याख्या प्राथमिक धर्मापासून उच्च धर्मांपर्यंत सर्व धर्मांना लागू होते. "चोदनालक्षणोऽर्थो धर्मः ।"

चोदना म्हणजे आज्ञा, क्रियाप्रवर्तक वाक्य. आज्ञेने सांगितलेले इष्ट साधक कर्तव्य म्हणजे धर्म होय. जे निसर्गतः कळत नाही ते आज्ञेने कळते. तर्कतीर्थांच्या मते जगातील सर्वच धर्मांत पवित्र ग्रंथांना महत्त्व असतेच.[२७]

कणादांच्या 'यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धीः स धर्मः ।' या व्याख्येचा समाचार घेऊन जैमिनींची व्याख्या धर्माचरण सांगते, तर कणादांची व्याख्या धर्मचरणाचे प्रयोजन सांगते. अभ्युदय म्हणजे मोक्षाशिवाय सर्व साध्ये, तर निःश्रेयस म्हणजे मोक्ष होय. हिंदुधर्मात मोक्ष आणि स्वर्ग यांत फरक आहे, तर यहुदी, ख्रिश्चन, इस्लाम या धर्मांत स्वर्गालाच मोक्ष म्हटले जाते, असे ते विवेचन करतात.

तिसऱ्या प्रसिद्ध व्याख्येचा, व्यासांच्या व्याख्येचा, ऊहापोह करून ही व्याख्या धर्मनिर्णयाबाबत शब्दप्रामाण्य वगैरेला महत्त्व न देता माणसाच्या विवेकबुद्धीला प्रमाण मानते, असे ते प्रतिपादन करतात. महाभारतातील धर्मचर्चेत पारलौकिक हिताला दुय्यम स्थान आहे, असेही ते सांगतात.[२८] "धारणाद्धर्म इत्याहुः धर्मेण विधृताः प्रजाः । यः स्याद्धारणसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ।।" धारण करतो म्हणून धर्म, कारण धर्मानेच प्रजेचे धारण होते. म्हणून जो धारणसंयुक्त, तोच धर्म असा सिद्धान्त आहे.[२९] या जगात लोकयात्रा-लोकव्यवहार नीट चालविणे हेच खरे धर्माचे प्रयोजन आहे, असे व्यासांनी सांगितले आहे. तर्कतीर्थांना या लक्षणांत बुद्धिवाद दिसतो. महाभारताच्या आधारे ते हे स्पष्ट करतात. अर्थशास्त्राला धर्मनिर्णयात महत्त्वाचे स्थान आहे. चातुर्वर्ण्य, वर्णधर्म शाश्वत नसून विशिष्टकालिक आहेत इ. विचारांवरून महाभारतीय धर्ममीमांसा विकासाच्या वरच्या टप्प्यावर होती, असे ते म्हणतात. हे असूनही या धर्मविचारात स्वर्गनरकादी



मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

कल्पनांचाही समावेश असल्याने तो पूर्णः बुद्धिवादी नाही, असे तर्कतीर्थांचे मत आहे.[३०]

तरी जैमिनींच्या लक्षणांत शब्दप्रमाण आणि कणादांच्या व्याख्येत अदृष्टांचा समावेश होत असल्याने या व्याख्यांपेक्षा व्यासांची व्याख्या त्यांना बुद्धिवादी म्हणून भावते; पण पूर्णतः बुद्धिवादी म्हणून नव्हे.

पाश्चात्त्य विचारवंतांच्या धर्मव्याख्यांचा उल्लेख करून तर्कतीर्थांनी धर्माची लक्षणे सर्व धर्मांत कमीजास्त प्रमाणात आढळणारी लक्षणे म्हणून सांगितली आहेत.

(१) निसर्गातील अलौकिक वस्तूंवर वा शक्तींवर विश्वास.

(२) पवित्र व लौकिक असा भेद.

(३) कर्मकांड व पवित्रापवित्र विचार.

(४) देवाने नियंत्रित नैतिक नियम.

(५) विशिष्ट धार्मिक भावनांची जाणीव - उदा., आश्चर्याची, पापाची इ.

(६) पूजा, प्रार्थना इ. द्वारे देवाशी संपर्क.

(७) विश्व-मानव संबंध.

(८) त्यावर आधारित जीवनपद्धती.

(९) मानवी गटांची त्या त्या उच्च उद्दिष्टांनुसार बांधणी.

ही लक्षणे तर्कतीर्थांच्या मते धर्माचे उत्कृष्ट नमुने होत. उदा., भारतातील शैव, वैष्णव, वारकरी पंथ, रोमन कॅथलिक इ. असे आहेत.[३१] वरील लक्षणे सर्व धर्मांत कमीजास्त प्रमाणात आढळतात; पण कर्मकांड व पुराणकथा, धार्मिक संस्कार व धर्म यांतून या गोष्टी सर्व धर्मांत आढळतात, असे त्यांचे प्रतिपादन आहे.

त्यांचे धर्मचिंतन चिकित्सेसारखे आहे; किंबहुना ती चिकित्साच आहे. ही करताना तर्कतीर्थ ऐतिहासिक पद्धतीचाच अवलंब करतात. मानवी मनातून धर्म निर्माण झाला आहे हे लक्षात घेऊन मानवी बुद्धीनेच धर्माची समीक्षा केली पाहिजे, असे या पद्धतीचे म्हणणे आहे.[३२]

या पद्धतीनुसार, जगातील धर्मसंस्था गणधर्म (Tribal), राष्ट्रधर्म (National), व विश्वधर्म (Universal) या क्रमाने परिणत झाले आहेत. पहिला गणधर्म टोळीचा धर्म होय. अनेक टोळ्या एकत्र येऊन स्थलबद्ध झालेला राष्ट्रधर्म आणि कुल, जाती, देश अशा मर्यादा नाकारून सर्व मानवांचा एकत्र धर्म तो विश्वधर्म या दृष्टीने बौद्ध धर्म हा पहिला विश्वधर्म होय, असे तर्कतीर्थांचे प्रतिपादन आहे.[३३] या विवेचनातून समाजपरिवर्तन व धर्मपरिवर्तन या समांतर गोष्टी आहेत, असे ते दाखवितात.

धर्मविषयक उपपत्तींचा ते ऊहापोह करतात. त्यामध्ये आरंभी त्यांनी धर्म हा ऐहिक गरजांतून उत्पन्न झाला असून भौतिक व सामाजिक अशा दोन गरजा यामध्ये येतात, असे प्रतिपादले आहे. यानंतर सुधारलेल्या धर्मांची निर्मिती झाली, असे ते सांगतात.

**(२) मोक्षमार्ग**

मोक्ष म्हणजे दुःखातून, अज्ञानातून, पापातून, देहबंधातून कायम मुक्तता व मृत्यूनंतरची शाश्वत परमशांती व श्रेष्ठ सद्‌गती होय. ही परमशांती काहींच्या मते जिवंत स्थितीतही प्राप्त होऊ शकते. यालाच जीवनमुक्त म्हणतात.

जीवात्म्याचे अंतिम ध्येय मोक्ष आहे असे जगातील सगळे उच्च धर्म मानतात. मनच मनुष्याच्या बंधास व मोक्षास कारण आहे, असा सर्व मोक्षवादी धर्मांचा सिद्धान्त आहे. मोक्षासाठी अनेक मार्ग सांगितले जातात. हे मार्ग परस्परांपासून अगदी अलग नसतात. फक्त प्राधान्य एकाला व गौणत्व अन्याला असे असते. हे मार्ग पायऱ्या-पायऱ्या स्वरूपातही मानले जातात. सर्व मार्ग मुख्यतः मानसिक असतात. या मार्गात देव वा गुरू यांचे साहाय्य लागते, असे काही अपवाद सोडल्यास बहुतेकांचे मत आहे. कर्मकांड, नैतिक कर्तव्य, योग, भक्ती, ज्ञान असे हे मार्ग किंवा साधने आहेत.

सर्वच उच्च धर्मांत कर्मकांड असते. पवित्र कर्माने पापनाश होतो, असे सर्व कर्मकांडवादी धर्मपंथ मानतात. ख्रिश्चन धर्मात पापनाशाला अधिक महत्त्व असते. कर्मकांडाचे स्तोम माजल्यास समाजावर आर्थिक परिणाम होतो. पुरोहितवर्गाला कर्मकांडवादी धर्मात अधिक लाभ असतो.

नैतिक कर्तव्याला, नीतीला मध्यवर्ती स्थान देणारे धर्म मोक्षासाठी नीती महत्त्वाची मानतात. उदा., बौद्ध, ख्रिश्चन इत्यादी. योगमार्गानेही मोक्ष प्राप्त होऊ शकतो, असे भारतीय धर्मात मानले जाते. भक्तिमार्ग हा सहजसोपा


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

असा मार्ग. इंद्रियनिग्रह आणि विकारांवर मात करण्यासाठी फलदायी असा हा मार्ग आहे. विषयप्राप्तीही मर्यादित असल्याने आत्मवंचनाही टळते. भक्तीला, नैतिकतेलाही स्थान असते. कर्मकांडाला गौण स्थान असले, तरी ते असते. प्रार्थना, नामकरण हेच भक्तीचे मुख्य साधन होय, असे सांगितले जाते. ऐहिक सामाजिक गोष्टीही साधता येतात.

ज्ञानमार्गात परमेश्वराच्या साक्षात्कारास महत्त्व असते. यहुदी, ख्रिस्ती, इस्लामी धर्मांत स्वर्गप्राप्तीच्या वेळी ईश्वरी साक्षात्कार होतो, असे मानले जाते. सत्कर्माने व भक्तीने चित्तशुद्ध होऊन याच जन्मात परमतत्त्वाचा साक्षात्कार होतो, असे अद्वैती मानतात. सुफी संतही याच मताचे आहेत. पण विशिष्ट अद्वैती विदेहमुक्ती मानतात.[३४]

मोक्षमार्गाचे असे साधकबाधक विवेचन तर्कतीर्थांनी केले आहे व हे सर्व मार्ग कमीजास्त प्रमाणात सर्वच धर्मांत अवलंबले जातात, असे मत मांडले आहे.

**(३) धर्मप्रमाण**

ज्याने धर्माचे ज्ञान होते त्याला धर्मप्रमाण म्हणतात. तर्कतीर्थांनी लौकिक व अलौकिक असे प्रमाणाचे दोन प्रकार (अस्तित्वात असलेले) सांगून त्यांचा आढावा घेतला आहे. लौकिकनुसार धर्म हा मानवबुद्धिगम्य असून धर्मग्रंथ मानवनिर्मित आहे असे मानले जाते; तर अलौकिकनुसार अलौकिक बुद्धीचेच हे काम असते, असे सांगितले जाते.

लौकिक प्रमाणवादाचे पुन्हा ऐतिहासिक व अनैतिहासिक असे दोन प्रकार पडतात. ऐतिहासिक प्रमाणानुसार समाजपरिवर्तनानुसार धर्मपरिवर्तनही होत असते व इतर अनुभवांसारखाच धार्मिक अनुभव असतो; तर अनैतिहासिक धर्मप्रमाणानुसार धर्म हा प्रगल्भ बुद्धीचा विषय आहे असे सांगून धर्मनिर्णयाचा व परिवर्तनाचा आधार अशाच व्यक्तींना असतो, असे हे मत आहे.

चार्वाकादी लौकिक प्रमाणवाद्यांच्या मते धर्म हा मानवी भ्रांती, प्रमाद असून लोकांच्या फसवणुकीसाठी उदयाला आला आहे.

अवैदिक विचारप्रवाह नीतीला धर्माचा गाभा मानताना दिसतो. वेदांबद्दल ते अपौरुषेय आहेत या मताचा परामर्श घेऊन वेद हे लौकिक, मानवनिर्मित आहेत, असे सांगतात. परंपरेबद्दल माणसे अज्ञानी असतात आणि मग परंपरेला जसे ईश्वर वगैरे कारण सांगितले जाते, तसेच वेदांचे आहे. वेदांना अलौकिकत्व कसे बहाल केले गेले, याचे उत्तर तर्कतीर्थ असे देतात : "याचे उत्तर सामाजिक परिस्थितीच्या मीमांसेत सापडते. वैदिक त्रैवर्णिक आर्यांच्या धार्मिक चालीरीतींचे व सामाजिक कायद्यांचे मूळ वेदांमध्ये आहे. वैदिक पुरोहितवर्गाचे म्हणजेच ब्राह्मणांचे वरिष्ठत्व आणि शूद्रांचे दास्यत्व हे जिचे मुख्य लक्षण आहे, अशा समाजसंस्थेला स्थैर्य आणण्याकरिता वेदांना अलौकिक प्रामाण्याच्या पदवीस पोचविले."[३५]

शबरस्वामी, कुमारिलभट्ट, शंकराचार्यांच्या मतानुसार वेद मानवबुद्धिगम्य नाहीत. म्हणजेच जे मानवी बुद्धीला अगम्य ते वेद सांगतात, असे त्यांचे थोडक्यात मत आहे. असे मानले नाही तर धर्मसंस्थेचे स्थैर्य टिकत नाही, असेही आपले मत तर्कतीर्थ नमूद करतात.

शैव, वैष्णव, बौद्ध, जैन या अवैदिक मतांचा उल्लेख करून शेवटी वेदप्रामाण्य नाकारले आहे. तर्कतीर्थांच्या मते धर्म हा अलौकिक आहे, हे वरील विवेचनाच्या माध्यमातून सिद्ध होते. आधुनिक मतेही (भारतीय व पाश्चात्त्य) ते लक्षात घेतात. टिळक व डॉ. राधाकृष्णन यांच्या मतांचा उल्लेख करून 'धर्मप्रमाणासाठी स्थितप्रज्ञ (आत्मानात्मविवेकी) व्यक्तीच योग्य असते', या टिळकांच्या मताचा अशी व्यक्तीच असू शकत नाही, असे म्हणून ते धिक्कार करतात. राधाकृष्णनांच्या मतावरही ते टीका करतात. पाश्चात्त्य धर्मप्रमाणवाद्यांत विल्यम जेम्स व फायरबाखच्या मतांचा तर्कतीर्थ समाचार घेतात.

जेम्सने धर्मसंस्थेपेक्षा त्यातील खाजगी–वैयक्तिक--अनुभवांना (धार्मिक) महत्त्व दिले आहे. या अनुभवांच्या उपयुक्ततेवरून तो अध्यात्म, धर्म, ईश्वर या गोष्टींचे महत्त्व सांगतो. (यालाच फलवाद – Pragmatism – असे तो म्हणतो.) या गोष्टींनी माणसाला समाधान मिळते म्हणून ते सत्य, योग्य असे काहीसे त्याला सांगावयाचे आहे. पण हे म्हणणे सदोष आहे. कारण वरील मतानुसार सर्व माणसे आजारी आहेत आणि त्यांना बरे वाटण्यासाठी ईश्वराची कल्पना मानली पाहिजे, असे मानण्यासारखे आहे. तर्कतीर्थ हे मत अमान्य


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

करतात.[३६]

फायरबाखच्या मताचा विचारही ते करतात. त्याच्या मतानुसार सर्व प्रचलित धर्मकल्पना मानवी मननिर्मित आहेत. याचे कारण अतृप्त, अपरिमित, सुप्त अशा वासना व भावनाच होत. जे येथील जगात मिळत नाही ते मनोनिर्मित जगात मिळेल, अशी आशा वाटते. धर्मात मानवी ध्येयवाद प्रतिबिंबित झालेला असतो. (विपरीत रूपात) सर्व मानवी विशेषणे एकत्र आणून ईश्वर बनतो.

धर्म हे एक स्वप्न आहे. स्वप्नात जसे वास्तवाचे विसंगत रूप दिसते, तद्वत धर्मात असते. धार्मिक विपर्यासाच्या उदरात माणसामाणसांतील गोड व श्रेयस्कर संबंध झाकलेले असतात. तोच खरा धर्म होय. अशा ध्येयासाठी स्वतःचे जीवन तृणवत मानणारे खरे धार्मिक होत. विज्ञान व तत्त्वज्ञानाच्या साह्याने मानवी जीवन सुखरूप करणे हेच खरे ध्येय होय. याला विज्ञानशुद्ध मानव्यवाद (Scientific Humanism) म्हणताना फायरबाख दिसतो. धर्माने मानवी जीवन उदात्त करणे एवढीच एक गोष्ट केली आहे. म्हणून ऐहिक जीवनातील सर्व समस्या सोडविणे आणि त्यासाठी विज्ञान व तत्त्वज्ञानाचे साहाय्य घेणे मानवाचे लक्ष्य राहिले पाहिजे, असे सांगून तर्कतीर्थ फायरबाखचा गौरव करतात; पण त्याचा दोषही दाखवितात. ज्यात अलौकिक किंवा पारलौकिक कल्पनांचा संबंध नाही, अशा खऱ्या मानव्यपूजक धर्माची स्थापना झाली पाहिजे असे तो म्हणतो; पण अलौकिक शक्तींच्या कल्पनेशिवाय धर्म कसा असू शकेल, असा प्रश्न तर्कतीर्थ करतात.[३७]

येथे तर्कतीर्थांना 'धर्म' नको आहे किंवा ही संज्ञा नको आहे, असे दिसते. त्यांना नुसता विज्ञानाधिष्ठित मानवतावाद हवा आहे, असे म्हणता येईल.

**(इ) भौतिकवाद व विज्ञानाचा पुरस्कार**

तर्कतीर्थांच्या मते समाजधारणेसाठी किंवा मानवी जीवन सार्थकी लागण्यासाठी कोणत्याही ईश्वरादी मूल्यांची गरज नसते. या मूल्यांपेक्षा ऐहिक मूल्यांनीच मानवी जीवन संपन्न होऊ शकते. हीच मानवी जीवनात अधिक फायद्याची व हिताची ठरू शकतात, असे तर्कतीर्थांचे प्रतिपादन आहे.

त्यांनी धर्मात/धार्मिक मूल्यांत आढळून येणारे दोष दाखवून तीन प्रमुख दोषांचा उल्लेख केला आहे.

(१) ईश्वरादी धार्मिक मूल्यांपेक्षा ऐहिक मूल्यांनी इतिहासातील फार मोठ्या घटना घडल्या आहेत. उदा., फ्रेंच राज्यक्रांती. आपलाही इतिहास असाच घडला आहे, असे ते सांगतात. भगतसिंग फासावर गेले ते स्वातंत्र्यप्रेमापोटी. नास्तिक वैज्ञानिकही अहोरात्र मेहनत घेत असतात. आई मुलांसाठी खस्ता खाते ती स्वर्गासाठी नव्हे, तर मुलांसाठी.

(२) विशिष्ट देशकालमर्यादेत उत्पन्न झालेल्या विचारांस, विधिनिषेधांस धर्म शाश्वतता बहाल करतो आणि समाजाच्या प्रगतीस अडथळा बनून राहतो. या म्हणण्याचा अर्थ असा की, अशी मूल्ये अडथळा बनतात.

(३) धर्मसंस्थेवर सत्ताधारी वर्गाचा प्रभाव असतो. इतरांना–सामान्यांना–गुलामीत ठेवण्याचा प्रयत्न ते त्याद्वारे करतात. कोणतीही धार्मिक मूल्ये स्वहितासाठीच या वर्गाकडून वापरली जातात, गेली आहेत, असे सर्वच धर्मांचा इतिहास सांगतो. उदा., विषमतेनुसार कायदे, अस्पृश्यता ही धर्ममूल्यांचीच करामत आहे.[३८]

म्हणून तर्कतीर्थ म्हणतात, "गूढ अध्यात्मवादाच्या पोटी ग्राम्य व घृणित भौतिकवाद सामावलेला असतो आणि विज्ञानशुद्ध भौतिकवादाच्या पोटात अत्यंत उच्च दर्जाचा अध्यात्मवाद साठवलेला असतो." ते पुढे आणखी म्हणतात, "आत्म्याचा म्हणजे मनुष्याच्या शक्तीचा विकास करणे हाच मानवी जीवनातील अध्यात्मवाद होय व ह्या विकासाकरिता सृष्टीतील सगळ्या शक्तींचे साहाय्य विज्ञान व कला यांच्याद्वारे घेणे यास 'विज्ञानशुद्ध भौतिकवाद' म्हणतात."[३९]

अशा तऱ्हेने धार्मिकतेपेक्षा ऐहिकता व ऐहिक मूल्ये कशी श्रेष्ठ आहेत, याचे विवेचन तर्कतीर्थ करतात. धर्मचिंतनात तर्कतीर्थ 'विश्वाचे गूढ' याविषयी मानवी मनातल्या भावना, वृत्ती यांचा विज्ञानाशी अन्वय लावण्याचा प्रयत्न करतात.

अनंताची संवेदना धर्माचा आधार मानला जातो; पण धर्मकल्पनेत सान्त विश्वातील ज्ञान व अनुभूत अशा कल्पनांचे विपर्यस्त व विकृत भ्रांतिजाल धर्मसंस्थेने निर्माण केले आहे. ज्ञानविश्वाच्याच पोटी गर्भित अशा कल्पनांचा आरोप करून बनविलेले निराळे काल्पनिक


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

विश्व म्हणजे धार्मिक तत्त्वे होत.[४०]

भावपूर्ण, तरल, रम्य, उदात्त अशा चमत्कारस्वरूप विश्वाविषयीच्या वृत्ती आत्म्याला भारून टाकतात. त्यांचा संस्थारूप धर्माशी कमी संबंध आहे. अशा वृत्ती कवी, शास्त्रज्ञ यांच्या ठिकाणीही असतात.

खरेतर विश्वातील अथांगतेने, अज्ञाताने माणसाला नम्र केले व या नम्रतेने विज्ञानाला जन्म दिला; धर्माला नव्हे, असे तर्कतीर्थ म्हणतात. अशी नम्रता धर्माने क्वचितच निर्माण केली आहे.[४१]

तर्कतीर्थ म्हणतात, "धार्मिक विचारसरणीचा त्याग करून विज्ञाननिष्ठ मानव एक निराळीच विचारप्रणाली निर्माण करीत आहे. पृथ्वीवर कधीतरी जीवसृष्टी उदयाला आली. मानवाने स्वप्रयत्नाने सृष्टी वश करीत आणली. ती आपल्याला अनुकूल आहे, हा दृष्टिकोण सोडला. ज्ञातापेक्षा अज्ञात अनंतपट आहे; पण न खचता अनंताला ज्ञाताच्या कक्षेत ओढण्याचा प्रयत्न करीत आहे." आजच्या माणसाने हे करणे उचित आहे, असे तर्कतीर्थांना वाटते.

आता धर्मसंस्थेपेक्षा उच्चस्तर सामाजिक संस्था उदयाला येत आहेत. म्हणून सर्वभेदातीत अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याकडे सर्वांनी लक्ष दिले पाहिजे, असे तर्कतीर्थांचे मत आहे. समाजातील सर्वांच्या गरजा भागतील अशा समाजवादी तत्त्वावर लोकसत्तेच्या राज्यघटनेने युक्त अशी समाजसंस्था पाहिजे. यासाठी विज्ञानाचा उपयोग करणे युक्त ठरेल.

तर्कतीर्थ म्हणतात, "अशी समाजव्यवस्था, ध्येये आपल्या परंपरेतच आहेत. आपल्या परंपरेचीच ही ध्येये नवपरिणती आहे. व्यासाने मानवी व्यवहाराला, लोकव्यवस्थेला आणि समाजधारणेला महत्त्व देऊन शाश्वत नैतिक मूल्यांनाही सापेक्ष ठरविले. बुद्धाने मानवाला केंद्रीभूत ठरविले. वेदांपासून ते शंकराचार्यांपर्यंत सर्वांनी सत्याच्या समीक्षेचा व संशोधनाचा पाठपुरावा केला हे लक्षात घेऊन आपण मागे न पाहता, न घुटमळता, भूतकाळात न अडकता पुढे गेले पाहिजे आणि नवी समाजरचना करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. असे तर्कतीर्थ यांचे धर्माच्या पुढील पाऊल आहे.[४२]

**धर्मांचे वर्गीकरण -**

तर्कतीर्थांनी जगातील धर्मांचे तीन वर्ग / प्रकार सांगितले आहेत.

(१) विधिप्रधान (सॅक्रॅमेंटल)

(२) प्रकटनप्रधान (प्रॉफेटिक)

(३) दिव्य साक्षात्कारप्रधान (मिस्टिकल)

विधिप्रधान धर्मात लाकूड, दगड, संतांचे अवशेष, क्रॉस, मंदिरे, चर्च, मशीद, नदी, पर्वत इ. वस्तूंत दिव्य शक्तींची कल्पना केलेली असते. पवित्र वस्तूलाच प्राथमिक समाजात साक्षात देव समजले जाते.

प्रकटनप्रधान धर्मात दिव्य तत्त्व विशिष्ट ऐतिहासिक प्रसंगी, विशिष्ट व्यक्तींच्या संदेशातून प्रकट होते. पवित्र कर्मकांडापेक्षा ख्रिश्चन, यहुदी, इस्लाम व भागवत धर्मात देवाचे शब्द महत्त्वाचे, पवित्र मानले जातात; तर दिव्य साक्षात्कारप्रधान धर्मात व्यक्तीच्या ज्ञानशक्तीच्या उच्चतम विकासाला, साक्षात्काराला महत्त्व असते. पौर्वात्य, भारतीय धर्मांचा यात समावेश होतो,[४३] असे तर्कतीर्थांचे प्रतिपादन आहे.

सर्वधर्मसमीक्षेच्या अनुषंगाने तर्कतीर्थांनी सर्व आजी धर्मांचा ऊहापोह केला आहे. शिवाय प्राथमिक समाजस्तरावरील धर्मकल्पनांचा व प्रकारांचाही आढावा घेतला आहे.

विविध धर्मांचे धर्मग्रंथ निर्माण झाल्यावर आणि त्यांमध्ये अंतर्गत विसंगती दिसल्यावर आपल्या धर्मातील सिद्धान्तांमध्ये कशी सुसंगती आहे, हे दाखवून देण्याचा त्या त्या धर्मतत्त्वज्ञांनी प्रयत्न केला. यातूनच धार्मिक तत्त्वज्ञाने उदयाला आली असे सांगून तर्कतीर्थ धार्मिक तत्त्वज्ञानाचे स्वरूप सांगतात.

बहुतेक धार्मिक तत्त्वज्ञाने परस्परांपासून बहुतेक बाबतींत भिन्न आहेत हे दाखवून देऊन तर्कतीर्थ भारतीय धर्ममतांचा वेगळेपणा दाखवून देतात. त्यांच्या मते भारतीय धर्मांत बहुतेक बाबतींत धर्ममतांच्या संदर्भात (उदा., मोक्ष इ.) भिन्नता असली तरी त्यांच्या इतिहासात रक्तपाती युद्धे झाली नाहीत. उलट, भारतीय धर्मपंथ असे मानतात की, सर्व धर्म एकाच ईश्वराकडे, अंतिम ध्येयाकडे, जातात. धर्मवैचित्र्य हे मानवी प्रकृतिवैचित्र्यामुळे आवश्यक आहे, अशी प्राचीन भारतीय धारणा आहे. अहिंसा हा सर्वच भारतीय धर्मांनी परमधर्म मानल्यामुळे हे धर्म परधर्मसहिष्णू बनले आहेत,[४४] असे सांगून तर्कतीर्थ



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

पाश्चात्त्य धर्मांबाबत म्हणतात की, उपरोक्त गोष्टी पश्चिमेकडील धर्मपंथांच्या ध्यानात न आल्याने त्यांचा इतिहास संघर्षांनी व रक्तपाती युद्धांनी भरला आहे.

असे का घडले, याची मीमांसाही तर्कतीर्थ देतात. पश्चिमी धर्मग्रंथांत मूर्तिपूजकांचा आणि बहुदेवतावाद्यांचा भयंकर धिक्कार केलेला असतो. ते आपल्या एका देवाशिवाय दुसरा देव नाही, इतर देवांची उपासना निषिद्ध आहे असे सांगतात. म्हणून त्यांच्यात संघर्ष झाला, असे तर्कतीर्थांचे प्रतिपादन आहे.[४५]

धार्मिक तत्त्वज्ञानाचे दोन गट तर्कतीर्थ करतात.
(१) धर्मग्रंथांवर आधारलेली तत्त्वज्ञाने. उदा., यहुदी, ख्रिश्चन, इस्लाम, वेदान्त, शैव इ.
(२) स्वतंत्रपणे रचलेली तत्त्वज्ञाने. उदा., वैशेषिक, न्याय, जैन, बौद्ध इ.

धार्मिक तत्त्वज्ञाने मानवाच्या अंतिम हिताचा– मोक्षाचा– विचार करतात. शिवाय ऐहिक व सामाजिक अशी उद्दिष्टेही सांगतात. उदा., कन्फ्युशिअस नैतिक राजकीय जीवन सांगतो. हिंदूंना सत्ययुग तर यहुदी ख्रिश्चनांना पृथ्वीवर स्वर्ग हवा असतो. भारतीय जीवनात पुरुषार्थाला महत्त्व असते.[४६]

तर्कतीर्थांनी धार्मिक तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने आत्मसाक्षिक मूल्ये–उदा., संसारबंधातून स्वयंमुक्त होणे, अहिंसादी महाव्रते, कांटचा नैतिक पूर्णतेचा सिद्धान्त इ.– सांगितली आहेत, दाखवून दिली आहेत. तसेच समुदायवाद व व्यक्तिवाद अशा दोन वादांची चर्चा ते करतात आणि भारतीय धर्म व्यक्तिवादी असल्याने (मोक्षवादी) भारतात जन्मसिद्ध उच्चनीच भेदावर आधारित जातिसंस्था हजारो वर्षे टिकली, असे मत मांडतात.

म्हणूनच विवेकानंद, गांधी, अरविंद, राधाकृष्णन इ. तत्त्ववेत्ते मानवतावादी समाजरचनेचा आशय सांगत असले तरी त्यांना (समाजरचनेसंदर्भात) यश येईल, असे नाही. याला एकच उपाय तर्कतीर्थ सुचवितात– “या सगळ्या भारतीय परंपरेपासून संबंधविच्छेद करणारी वैचारिक क्रांतीच भारतीय सामाजिक क्रांतीची प्रभात ठरेल. अन्यथा नाही.”[४७]

### (ई) ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब व आग्रह

हिंदुधर्माची समीक्षा करताना तर्कतीर्थांनी ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब केला आहे. या पद्धतीचा उदय अठराव्या शतकात पाश्चात्त्य विद्वानांकडून झाला. जगभरच्या भटकंतीने धर्मांचा इतिहास ज्ञात झाला आणि त्याची परिणती समीक्षेच्या उदयात झाली. प्रथम लेसिंग (Lessing), हर्डर (Herder) नंतर हेगेल, टेलर, फ्रेझर यांनी तसेच कांट, फायरबाख, मॅक्सवेबर, डूररखीम, स्पेन्सर, रॉबर्टसन स्मिथ, मॅरेट इ. धर्ममीमांसकांनी धर्मसमीक्षा केल्याचे दिसून येते, असे ‘हिंदुधर्मसमीक्षा’ या ग्रंथात आरंभीच तर्कतीर्थ सांगतात.

भारतीय धर्मांचे परिशीलन विल्यम जोन्स, मॅक्समुलर, हॉपकिन्स, कुंटे, भांडारकर, टिळक आदींनी केले, असे ते सांगतात.

ऐतिहासिक पद्धतीचा वापर करून तर्कतीर्थांनी हिंदुधर्माचा आढावा घेतला आहे. हे करताना त्यातील गुण-दोष दोन्हीही दाखवून दिले आहेत. यानुषंगाने त्यांनी आरंभी धर्मसमीक्षा, ऐतिहासिक पद्धतीचे महत्त्व, स्वरूप, धर्मविषयक उपपत्ती या सर्वांचा ऊहापोह केला आहे. विषयाची मांडणी करता यावी, पुढील विषयाचे आकलन सुलभ व्हावे यासाठी तर्कतीर्थ धर्मसमीक्षेची पार्श्वभूमी मांडतात. दुसरे व तिसरे या दोन प्रकरणांत हिंदुधर्माची प्रत्यक्ष चिकित्सा करतात. धर्माची व्याख्या, धर्मप्रमाण यांविषयी चर्चा दुसऱ्या प्रकरणात तर तिसऱ्या प्रकरणात हिंदुधर्माच्या सामान्य व विशेष स्वरूपाची, विविध शाखांची, ऐतिहासिक क्रमांची अशी मांडणी करून शेवटी सामाजिक प्रगतीस व जीवनात धर्ममूल्यांची गरज आहे का नाही, याविषयी चर्चा करून विषयाची समाप्ती केली आहे.

येथे आपल्या अभ्यासविषयानुसार तर्कतीर्थांच्या फक्त ‘धर्मविषयक’ विचारांचा परामर्श घ्यायचा असल्याने आरंभीचे प्रकरण व तिसऱ्या प्रकरणातील शेवटच्या भागावर (धर्ममूल्यांची चर्चा) अधिक लक्ष केंद्रित केले आहे. इतर गोष्टी– हिंदुधर्मविषयक त्यांची भूमिका– येथे अप्रस्तुत असल्याने तात्पर्यार्थ म्हणून लक्षात घेतली आहे.

ऐतिहासिक पद्धतीनुसार घडणारी धर्मसमीक्षा पाश्चात्त्य पंडितांनी अठराव्या शतकात सुरू केली. आपल्याकडेही धर्मसमीक्षा करणारे काही विद्वान त्या काळच्या बरोबरीने नंतर झाले.



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मानवी मनातूनच धर्म निर्माण झाला आहे हे लक्षात घेऊन धर्मसमीक्षाही मानवी बुद्धीनेच केली पाहिजे, असे तर्कतीर्थ या पद्धतीच्या भूमिकेविषयी सांगतात.

धर्म हा समाजाचा एक भाग, अंग आहे. ती एक सामाजिक वस्तू आहे. समाज जसा इतिहासबद्ध आहे, तसा धर्महीं इतिहासबद्ध आहे. इतिहासातील प्रत्येक घटना कार्यकारणसंबंधात जखडलेली असते. त्या दृष्टीने त्या त्या घटनेकडे पहावे लागते. धर्माचेही असेच आहे. "धर्म ही अत्यंत प्राकृत, हीन अवस्थेपासून ते अतिशय उच्च अशा अवस्थेप्रत परिणाम पावलेली अशी ऐतिहासिक घटनांची मालिकाच आहे. त्या घटनांचा प्रत्येक विशिष्ट दुवा लक्षात घेऊनच त्याची अवगती करून घेतली पाहिजे. या अवगतीस धर्माची ऐतिहासिक समीक्षा म्हणतात,"[४८] असे तर्कतीर्थ या समीक्षेबद्दल म्हणतात.

ऐतिहासिक पद्धतीचे मूलभूत तंत्र ही विशेष परीक्षा असते. यात प्रत्येक ऐतिहासिक घटनेचे स्वतंत्र महत्त्व असते. म्हणून विशेष परीक्षेला इतिहासमीमांसेचे अधिष्ठान म्हणून महत्त्व आहे आणि ही परीक्षा करण्याचे साधन मानवी बुद्धी आहे, असे प्रतिपादन ते करतात.[४९]

धर्मसमीक्षेच्या उपरोक्त साधनांशिवाय बुद्धिवादी पण अनैतिहासिक पद्धतीविषयीही तर्कतीर्थ सांगतात. ही पद्धती अठराव्या शतकात (काही) पाश्चात्त्य विद्वानांनी वापरली. आपल्याकडे चार्वाकांनी अशीच धर्माची समीक्षा केली होती. धर्मसंस्था ही एक सामाजिक शक्ती आहे हे, ही पद्धती लक्षात घेत नाही असे सांगून ही पद्धती दोषपूर्ण आहे, असे आपले मत नोंदवितात.[५०]

धर्माच्या क्षेत्रात अनेक दोष आहेत; पण त्याशिवाय माणसे आपले जीवन व्यतीत करत नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे, असे सांगून ते ऐतिहासिक पद्धतीचा आग्रह धरतात.

धर्मसमीक्षा करताना धर्माचे / धर्मतत्त्वांचे

(१) सत्यत्व तपासणे,

(२) प्रयोजन तपासणे व

(३) धर्मतत्त्वांचा, संस्थांचा ऐतिहासिक कारणकार्यसंबंध तपासणे

या तीन गोष्टी धर्मसमीक्षेत सांगितल्या जातात.[५१]

जगातील धर्मसंस्था गणधर्म (Tribal), राष्ट्रधर्म (National), व विश्वधर्म (Universal) याप्रमाणे परिणत झाले आहेत. पहिला गणधर्म म्हणजे टोळीचा धर्म. अनेक टोळ्या एकत्र येऊन स्थलबद्ध झालेला राष्ट्रधर्म. आणि कुल, जाती, देश अशा मर्यादा नाकारून सर्व मानवांचा एकच धर्म तो विश्वधर्म. या दृष्टीने बौद्ध धर्म हा ज़गातील पहिला विश्वधर्म होय, असे तर्कतीर्थांचे प्रतिपादन आहे. या विवेचनातून समाजपरिवर्तन व धर्मपरिवर्तनही समांतर अशी गोष्ट आहे, असे ते दाखवितात.

येथे तर्कतीर्थ धर्मविकासाच्या संदर्भातील एक महत्त्वाचा मुद्दा नमूद करतात. धर्मविकास झाला की नाही, हे ओळखण्याचे गमक ते सांगतात. अर्थात आधुनिक धर्ममीमांसक याचा वापर करतात.

(१) माणसाला एका विशिष्ट काळात जे ज्ञान जगाबद्दल, जीवनाबद्दल लाभलेले असते, त्यानुरूप धर्मविचार असला पाहिजे.

(२) अशा संस्कृतीस, सामाजिक जीवनास प्रेरक असा धर्म असला पाहिजे.[५२]

तात्पर्य, विज्ञानाचा आणि धर्माचा संबंध येथे दिसतो. भौतिकवादी दृष्टीपासून जो धर्म दूर, तो प्रगतीपासून जास्त दूर असतो. हिंदुधर्म या दृष्टीने विज्ञानाला जवळचा आहे. कारण ब्रह्मच विश्वात परिणत होत असते, असे ब्रह्मवाद सांगतो. तर्कतीर्थ हे दाखवून देतात.[५३] येथे तर्कतीर्थ धर्मविषयक विविध (आधुनिक) उपपत्तींचा ऊहापोह करतात. यामध्ये त्यांनी आरंभी धर्म हा ऐहिक गरजांतून उत्पन्न झाला असून भौतिक व सामाजिक अशा दोन गरजा यामध्ये येतात, असे सांगितले आहे. नंतर सुधारलेल्या धर्माची निर्मिती झाली, असे सांगतात.

टेलर, फ्रेझर, मॅरेट, ॲन्ड्र्यू लँग, स्पेन्सर, मार्क्स यांच्या धर्म-उपपत्तींचा समाचार घेऊन त्या ऐतिहासिक पद्धती स्वीकारून सांगितल्या गेल्या आहेत असे सांगून प्रत्येक उपपत्तीत कोणता ना कोणता दोष आहे म्हणूनच मार्क्सच्या मताचा अधिक विस्ताराने उल्लेख करतात. "निसर्गशक्ती व सामाजिक शक्ती यांचे मानवी अंत:करणावर उमटलेले विपर्यस्त भ्रांतिमय प्रतिबिंब म्हणजे



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

धर्म होय." या फायरबाखच्या मताचा उल्लेख करतात. सर्व विद्यमान मोठे धर्म असेच उदयाला आले आहेत, असे सांगतात.

आणि शेवटी वर्गविग्रह व अंत:कलह जोपर्यंत समाजात राहील, तोपर्यंत समाजात धर्म राहणारच. खाजगी संपत्ती व धर्मसंस्था यांचे सूत पूर्वीपासूनच जुळले आहे; त्यामुळे धर्मसंस्थेची सूत्रे सत्ताधारी वर्गाकडे गेली व धर्मसंस्थेला या वर्गाने संघटित केले. समाजातील परस्परविरोधी हितसंबंध जपण्याचे व संपत्ती, सत्तावाल्यांचे हात बळकट करण्याचे कार्य धर्माने केले.

विषमतामूलक समाजरचना व कायदा यांना पावित्र्य व शाश्वतता देण्याचेही कार्य धर्मानेच केले. असे जगात सगळीकडेच झाले, असे तर्कतीर्थ प्रतिपादन करतात.[५४]

संपूर्ण समाजाची व्यवस्थाच बदलून समाजवादी पद्धतीने समाजाची रचना केल्याशिवाय धार्मिकता नष्ट होणार नाही. समाजवादी व्यवस्था आल्यावर सर्वांचे कल्याण (धार्मिक वगैरे) साधल्यावर धार्मिकतेला वाव राहणार नाही. योग्य, अनुकूल वातावरण विज्ञानाच्या साह्याने निर्माण केल्यावर (केले गेले तर) धर्मापेक्षा श्रेष्ठ भावना व उच्च दर्जाची संस्कृती उदयाला येईल, असे तर्कतीर्थांना वाटते. हा तर्कतीर्थांचा युटोपिया आहे, असे म्हणता येईल.

### (उ) शाश्वताचा मागोवा

तर्कतीर्थांच्या धर्मचिंतनात आधीच्या टप्प्यात म्हणजे हिंदुधर्माची समीक्षा करतेवेळी किंवा त्याआधी व नंतर काही काळ त्यांच्यावर मार्क्सवादाचा पूर्णत: पगडा होता; त्यामुळे त्यांची हिंदुधर्माची समीक्षा धारदार झाली आहे. धर्माची गरज संपली आहे किंबहुना कोणाच्या तरी फायद्याचे साधन म्हणून धर्म आतापर्यंत राहिला आहे आणि कोणाचे तरी शोषण करत आला आहे. संघर्ष व युद्धाशिवाय धर्माने काहीच दिले नाही किंवा धर्म हे भ्रांतिजाल आहे किंवा वास्तवाचे ते विपरीत रूप आहे, अशा प्रकारची टीका त्यांनी जडवादी भूमिकेतून केली होती. मार्क्स, फायरबाख, डुरखीम त्यांच्या विचारांचे अधिष्ठान होऊन बसले होते. पण ही भूमिका कायम राहिली नाही. त्यांच्या भूमिकेत झालेला बदल किंवा आलेली व्यापकता आपल्याला 'वैदिक संस्कृतीचा विकास' या पुस्तकात दिसते. नंतर त्यांच्या झालेल्या मुलाखती, भाषणे, लेख किंवा सर्वधर्मांची समीक्षा (१९७६ - मुंबई विद्यापीठात दिलेली व्याख्याने) यातही (प्रगल्भता) व्यापकता दिसते. म्हणूनच व्यापक व अध्यात्मानुकूल धर्मचिंतन हा तर्कतीर्थांच्या धर्मचिंतनातील पुढचा टप्पा मानता येईल.

महात्मा गांधी आणि तर्कतीर्थांच्या पहिल्या भेटीत, तर्कतीर्थांनी साधारण धर्म शाश्वत आहे आणि बाकी इतर धर्म परिवर्तनशील आहेत असे अस्पृश्यतेच्या संदर्भात चर्चा करताना म्हटले होते. ही त्यांची धर्मसुधारकाची भूमिका होती. ह्याच भूमिकेचा विस्तार म्हणजे नंतरचे धर्मचिंतन होय.[५५]

तर्कतीर्थ मानवी जीवनात युटोपियाला महत्त्व आहे, असे म्हणताना दिसतात. त्यांच्या मते युटोपियाची गरज माणसाला आहे. माणसाचा सबंध इतिहास लक्षात घेता माणसाला तिचा ध्यास असतोच. (युटोपिया म्हणजे आपल्या आवाक्याबाहेरील जे असते ते वास्तवात आणू पाहणे होय.) युटोपिया ही एक 'मिथ' आहे. मिथ निर्माण करण्याची प्रक्रिया माणसाच्या जन्मापासूनची आहे. आजही आहे. म्हणून मिथपासून माणूस कधी सुटू शकत नाही. स्वार्थी माणूस कदाचित सुटतो. पण ज्यांना भव्यदिव्य काही करायचे असते ते पौराणिक आदर्शवादाकडून प्रेरणा घेत असतात. तर्कतीर्थांचा हा दृष्टिकोण नंतरचा आहे.[५६]

विज्ञानाला अनाकलनीय अशी गोष्ट म्हणजे 'सेल्फ कॉन्शसनेस,' तिचा विज्ञानाच्या पद्धतीने अर्थ लावता येत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. या दृष्टीने ते अध्यात्मवादाकडे झुकलेले दिसतात.[५७] अशा अनेक गोष्टींबाबत विज्ञानाच्या मर्यादा आहेत, असे तर्कतीर्थांचे म्हणणे आहे.

मार्क्सची मूल्यविषयक सापेक्षतावादी भूमिका तर्कतीर्थांना मान्य नाही. 'इंद्रियनिग्रह', चित्तशुद्धी, सर्वभूतानुकंपना इ. धार्मिक वा नैतिक मूल्ये मनुष्य-जातीच्या अंतिम मर्यादेपर्यंत टिकतील, असे मानण्यास पुष्कळ आधार आहे."[५८]

ते पुढे म्हणतात, ही/अशी मूल्ये एकदा निर्माण झाली व विकास पावली आणि कायम स्थिर झाली,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

की त्यांच्यात बदल होण्याचे कारण नाही.[५९]

"श्रद्धा मनास धीर देत असते व चिकित्सा सावध ठेवीत असते."[६०] मार्क्सचा सापेक्षतावाद या सावधपणाला मदत करतो या म्हणण्यात दोन्हीही गोष्टी त्यांना हव्या आहेत. नव्याबरोबर परंपरेचा तथ्यपूर्ण भाग स्वीकारणे योग्यच असा त्यांचा निर्वाळा आहे. अन्यथा स्नानपात्रातील पाण्याबरोबर लहान बालकही फेकून देण्यासारखे ठरेल. तात्पर्य, शाश्वताला त्यागून चालणार नाही, असे त्यांचे मत आहे.[६१]

'वैदिक संस्कृतीचा विकास' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांचे प्रतिपादन असे आहे. आध्यात्मिक किंवा वैचारिक स्थिर मूल्यांची शक्ती समाजातील भौतिक प्रवृत्तींवरही आधिपत्य गाजवू शकते, या कल्पनेला त्यांनी महत्त्व दिले आहे. आर्थिक उत्पादन पद्धतीत अनेक स्थित्यंतरे झाली तरी युगानुयुगे आपले सामर्थ्य किंवा प्रभुत्व टिकवणारी काही मानसिक मूल्ये असू शकतात, हे लक्षात घेऊनच त्यांनी प्रस्तुत पुस्तक लिहिले आहे.[६२]

प्रत्येक भाषा, प्रत्येक धर्म, प्रत्येक संस्कृती स्वरूपाने भिन्न असली तरी सर्व भाषा, सर्व धर्म, सर्व संस्कृती या एकाच सामान्य मानवी संस्कृतीचे विशेष आविष्कार होत.[६३] आजच्या यांत्रिक युगात, सत्तास्पर्धेच्या काळात जनतेच्या हितास धोका निर्माण होऊ शकतो, हे लक्षात घेता आध्यात्मिक शक्तींना आवाहन देणाऱ्या सत्प्रवृत्तीच या भावी प्रलयकारी संग्रामास टाळू शकतील.[६४]

ते आणखी पुढे म्हणतात, विश्वव्यापी मानवसंस्कृती उत्पन्न होऊ पाहत आहे. पण हे कसे घडेल? सर्व संस्कृतींना आत्मसात करून की विसर्जित करून? मार्क्सवाद विसर्जन करायला तयार आहे; परंतु त्याने हाती काही लागणार नाही. (येथे त्यांचा मार्क्सविरोध दिसतो.) पुढे ते म्हणतात, 'परंपरेतील स्थिर मूल्यांना आत्मसात करण्याचे तंत्र हस्तगत करूनच प्रगतीच्या शक्ती यशस्वी होऊ शकतात.'[६५]

"धार्मिक श्रद्धा ही मानवी मनातील गुंतागुंतीची, पण समर्थ अशी प्रवृत्ती आहे. मानवी मनाचा धार्मिकतेकडे विलक्षण असा स्वाभाविक ओढा असतो, असे लक्षात येते. किंबहुना मानवी स्वभावाचा धर्मभावना हा दुर्दम्य असा भाग दिसतो."[६६] ज्या पुस्तकात-व्याख्यानांत जडवादाच्या भूमिकेतून धर्मभावना-धर्म-धर्मसंस्था ते नाकारतात, त्याच्याच प्रस्तावनेत ते असे म्हणतात. या म्हणण्याचा व वरील इतर मतांचा एक सबळ निष्कर्ष, तर्कतीर्थांचा ...कौल धर्माकडे, त्यातील चिरभागाकडे - शाश्वताकडे ओढा होता, असे सांगतो. याचा अर्थ त्यांना पारंपरिक धर्म जसाच्या तसा हवा होता, असे मात्र नव्हे. उलट, उद्याच्या नव्या समाजात ऐतिहासिक वा प्राथमिक धर्मांना स्थानही उरणार नाही. धर्मातीत असा समाज असेल; पण तो कसा असेल? त्यात सर्वांच्या सर्व गरजा-कल्याण साधलेले असेल, असा समाज तो असेल. विज्ञानाधिष्ठित समाज असेल; पण त्यात शाश्वताला - मानसिक - नैतिक मूल्यांना की जी चिरंजीवी आहेत, त्यांना स्थान असेल, असे काहीसे तर्कतीर्थांना म्हणावयाचे आहे, असे दिसते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे धर्मचिंतन आनंद मीमांसा, हिंदुधर्माची समीक्षा, सर्वधर्मसमीक्षा, जडवाद अर्थात अनीश्वरवाद आणि वैदिक संस्कृतीचा विकास इ. पुस्तकांच्या माध्यमातून घडते. हे तटस्थपणे बुद्धिवादी, जडवादी आणि ऐतिहासिक पद्धतीच्या माध्यमातून ते करतात; पण जसजसे ते पुढे जातात तसतसे त्यांच्या दृष्टीत, चिकित्सेत आणि चिंतनात व्यापकता आलेली दिसते.

**संदर्भ**


| | | |
|---|---|---|
| (१४) डॉ. अंतरकर शि. स. | जन्मशताब्दी - गौरव अंक | ३७ |
| (१५) डॉ. शं. रा. तळघटी | कित्ता | ४५-४६ |
| (१६) तर्कतीर्थ ल. जोशी | लेखसंग्रह | ४३९ |
| (१७) तर्कतीर्थ ल. जोशी | लेखसंग्रह | ४४१ |
| (१८) कित्ता | कित्ता | ४६१ |
| (१९) कित्ता | कित्ता | ४६६ |
| (२०) कित्ता | आनंद मीमांसा | ४३७-४६९ |
| (२१) कित्ता | लेखक | १३७ |
| (२२) कित्ता | कित्ता | १३८ |
| (२३) कित्ता | हिंदुधर्मसमीक्षा (२००५ चौ. आ.) | ५८ |
| (२४) कित्ता | कित्ता | ६१ |




मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

| | | |
|---|---|---|
| (२५) अरुंधती खंडकर | महाराष्ट्राचे शिल्पकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | १४ |
| (२६) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | सर्वधर्मसमीक्षा (२००५ तृ. आ.) | २-३ |
| (२७) कित्ता | कित्ता | ७-८ |
| (२८) कित्ता | कित्ता | १०-१२ |
| (२९) कित्ता | हिंदुधर्मसमीक्षा | ६६ |
| (३०) कित्ता | कित्ता | ९६-९८ |
| (३१) कित्ता | कित्ता | ९९ |
| (३२) कित्ता | कित्ता | १ |
| (३३) कित्ता | कित्ता | १५ |
| (३४) कित्ता | कित्ता | ६१-७१ |
| (३५) कित्ता | कित्ता | ८३ |
| (३६) कित्ता | कित्ता | ९२-९५ |
| (३७) कित्ता | कित्ता | ९५-९९ |
| (३८) कित्ता | लेखसंग्रह-जडवाद | ४१-४३ |
| (३९) कित्ता | कित्ता | ४३ |
| (४०) कित्ता | हिंदुधर्मसमीक्षा | १७२ |
| (४१) कित्ता | कित्ता | १७२-१७३ |
| (४२) कित्ता | कित्ता | १७१-१७६ |
| (४३) कित्ता | कित्ता | २९-३२ |
| (४४) कित्ता | कित्ता | ३८ |
| (४५) कित्ता | कित्ता | ३९ |
| (४६) कित्ता | कित्ता | ४२-४४ |
| (४७) कित्ता | कित्ता | ५३ |
| (४८) कित्ता | कित्ता | ३ |
| (४९) कित्ता | कित्ता | ५ |
| (५०) कित्ता | कित्ता | ६-८ |
| (५१) कित्ता | कित्ता | ११ |
| (५२) कित्ता | कित्ता | १६ |
| (५३) कित्ता | कित्ता | १७ |
| (५४) कित्ता | कित्ता | ५५ |
| (५५) कित्ता | प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा | १४३ |
| (५६) कित्ता | कित्ता | १५५-१५६ |
| (५७) कित्ता | कित्ता | १५७ |
| (५८) कित्ता | लेखसंग्रह | ७१ |
| (५९) कित्ता | कित्ता | ७१ |
| (६०) कित्ता | कित्ता | ७२ |
| (६१) कित्ता | कित्ता | ७२-७३ |
| (६२) कित्ता | वैदिक संस्कृतीचा विकास-प्रस्तावना | ४ |
| (६३) कित्ता | कित्ता | ५ |
| (६४) कित्ता | कित्ता | ७ |
| (६५) कित्ता | कित्ता | ८ |
| (६६) कित्ता | हिंदुधर्माची समीक्षा - प्रस्तावना | २ |

(६६) (अ) तर्कतीर्थांच्या उपरोक्त विचारांतून विसंगती दिसून येते. (उपरोक्त पुस्तकांतच ही दिसते.)



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

# लीळाचरित्रातील लोकसंस्कृती : काही संदर्भ

अविनाश आवलगावकर

'लीळाचरित्र' हा मराठी भाषेतील पहिलाच ग्रंथ असल्याने त्याला साहित्यनिर्मितीची पूर्वपरंपरा नाही. तरीही मराठी साहित्यातील तो मानदंड ठरावा, इतका तो परिपक्व आहे. चरित्रनायकाचे सर्वार्थाने भारावून टाकणारे विलोभनीय व्यक्तिमत्त्व हाच या चरित्रग्रंथाचा केंद्रबिंदू आहे आणि विशेष म्हणजे चरित्रलेखकाने हे समर्थ व्यक्तिमत्त्व तेवढ्याच सामर्थ्याने आपल्या शब्दकुंचल्यातून अभिव्यक्त केले आहे. आशय आणि अभिव्यक्तीच्या एकरूपतेचे सौंदर्यमूल्य लाभलेल्या या कलाकृतीचे वाङ्मयीन सामर्थ्य आजही तेवढेच तुल्यबळ ठरलेले आहे. सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामींचे श्रीमंत व्यक्तिमत्त्व साकारताना त्याला लाभलेले तत्कालीन सामाजिक/ सांस्कृतिक जीवनाचे संदर्भ हे साहित्यकृती म्हणून लीळाचरित्राच्या श्रेष्ठत्वाचेच गमक ठरले आहेत. महानुभाव साहित्याच्या अभ्यासक डॉ. सुमन बेलवलकर म्हणतात त्याप्रमाणे, "मराठी साहित्यात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक संचिताचे रक्षण केलेला तो बहुमूल्य ठेवा + ÉÆä"[१]

सामाजिक आणि सांस्कृतिक आशयविश्वातूनच कलाकृतीची निर्मिती होत असते. संस्कृतिविरहित कलाकृतीचा आविष्कार संभवणे अशक्य आहे. साहित्य ही अधिक आशयप्रधान कला असल्याने संस्कृतीची व्यापकताही तिच्यातून तितक्याच समर्थपणे अभिव्यक्त होत असते. 'लीळाचरित्र' निर्मितीमागेही एक सांस्कृतिक संचित आहे. अध्यात्म हा त्याचा प्राण असला, तरी 'लीळाचरित्र' हा ग्रंथ संबंध महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा सांस्कृतिक आरसा ठरला आहे. लोकाविष्काराची, लोकसंस्कृतीची अनेक स्पंदने 'लीळाचरित्रा'त उमटलेली आहेत. म्हणूनच यादवकालीन सांस्कृतिक दस्तावेज म्हणून 'लीळाचरित्रा'चे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे 'लीळाचरित्रा'चे नायक असणाऱ्या श्रीचक्रधरस्वामींचा वावर समाजातील सर्व स्तरांमधून होता. त्यामुळे श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाचा, सर्वज्ञ म्हणून असलेल्या त्यांच्या अस्तित्वाचा वेध घेताना आपोआपच समाजाच्या विविध स्तरांतील अनेक पैलू उलगडत जातात. येथे सर्वज्ञांचे व्यक्तिमत्त्व हे केंद्रबिंदू असले, तरी समाजातील विविध जाती-जमातींचे आणि वृत्ती-प्रवृत्तींचे एक जग त्यांच्या भोवताली आहे आणि म्हणूनच लोकसमूहाचे असणारे मानसशास्त्रही येथे अभ्यासाचा भाग ठरते. भारतीय संस्कृतीच्या अभ्यासक डॉ. इरावती कर्वे म्हणतात त्याप्रमाणे, "कोणत्याही समाजाची संस्कृती काय आहे, हे ठरवायचे झाल्यास त्यातील व्यक्तींच्या जीवनक्रमाचे सूक्ष्म परीक्षण करावे लागते व बऱ्याच व्यक्तींना साधारण असे आचारविचारांचे रूप करून त्याला संस्कृती हे नाव द्यावे लागते."[२] 'लीळाचरित्रा'चे या दृष्टीने मूल्यमापन केल्यास, त्याची विशालता सहजपणे लक्षात येईल. लोकजीवनाचे अनेक आयाम 'लीळाचरित्रा'ला असल्याने त्याचे लोकसंस्कृतीच्या अंगाने मूल्यमापन करणे हा स्वतंत्र प्रबंधाचाच विषय होईल, याची मला कल्पना आहे; म्हणून काही विशिष्ट संदर्भ घेऊन त्याचे आकलन करण्याचा हा प्रयत्न आहे.

'लीळाचरित्रा'तील हा विशाल जनसमूह सर्वज्ञांच्या व्यक्तिमत्त्वाशी जोडला गेला आहे. येथे खऱ्या अर्थाने सर्वज्ञ हे लोकनायक आहेत. म्हणून यातील प्रत्येक लीळा लोकसमूहाचा आविष्कार ठरते. लोकसंस्कृती व लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. मधुकर वाकोडे या संदर्भात लिहितात, "श्रीचक्रधरांचे 'लीळाचरित्र' एका अर्थाने जनसामान्यांच्या खास प्रश्वासातूनच साकारले आहे आणि ह्यामुळेच मातीतून फुलारलेल्या लोकप्रतिभेच्या असंख्य 'लीळां'ना मृद्‌गंध प्राप्त झालेला आहे."[३] 'लीळाचरित्र' हे देशीवादी साहित्याचे पहिले अपत्य ठरते, ते याच अर्थाने.

श्रीचक्रधरस्वामी एकांकातून लोकान्तात आले आणि

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अल्पावधीतच त्यांच्या भोवती मोठा लोकसमूह गोळा झाला. चातुर्वर्ण्य नाकारणाऱ्या स्वामींच्या या समूहात ब्राह्मण, वाणी, मातंग, महार, चांभार, गुरव, कुणबी अशा विविध जाती-जमातींचे प्रतिनिधी दिसतात. स्वामींचा वावर प्रामुख्याने ग्रामजीवनातच अधिक होता. त्यामुळे ग्रामजीवनाशी संबंधित असणाऱ्या बारीकसारीक गोष्टींचे तपशील 'लीळाचरित्रा'त येतात. अर्थात हे तपशील केवळ सूचिवजा येत नाहीत, तर मानवी जीवनाचा अविभाज्य घटक म्हणून येतात. त्यामुळे कौटुंबिक नाती, त्यांचे परस्परसंबंध, त्यांचे सुखदुःख, मुंज, विवाह, सण, उत्सव इत्यादींचे अनेक तपशील एखाद्या चलच्चित्रासारखे उभे राहतात. त्याचबरोबर गावे, गावातील रस्ते, बाजारहाट, बाजारहाटाशी संबंधित तेली, खाती, धोबी, विणकर, रांधवनकार, माळी इत्यादींचे संदर्भ; पाणीपुरवठ्याच्या सोयी म्हणजे घाट, तलाव, विहिरी, विहिरींचे विविध प्रकार; गावाचे पार, स्मशान, मंदिरे, मंदिरांचे विविध प्रकार उदा., आडे, माड, मठ, मढु, मढी; तसेच मंदिरांच्या विविध भागांची नावे उदा., जगती (आवर), पौळी (आवाराची भिंत), दारवठा (प्रवेशद्वार), रायांगण (आवारातील प्रशस्त अंगण), चौक (मंदिराचा गाभारा), चांदोवा (चौकाचे शोभिवंत छत) इत्यादी. 'लीळाचरित्रा'तील हे सारे संदर्भ मुळातूनच पाहण्यासारखे आहेत.

यावरून श्रीचक्रधरस्वामी लोकजीवनाशी किती एकरूप झाले होते, हे स्पष्ट होते. मुख्य म्हणजे त्यांनी लोकभाषेला धर्मभाषेचे स्थान देऊन सर्वसामान्य माणसालाही धर्माचा अधिकार दिला. संस्कृत ही ज्ञानभाषा असल्याने सर्वसामान्य माणसाला कधीच ज्ञानोपासना करता आली नाही. सर्वज्ञांनी आपले सर्व तत्त्वज्ञान लोकभाषेतून सांगितले, आणि विशेष म्हणजे नागदेवाचार्य, म्हाइंभट, महदाइसा यांसारख्या संस्कृत पंडितांना सांगितले. लोकभाषेला धर्मभाषेचे स्थान देऊन भाषिक बंडखोरी करणारा हा पहिला संप्रदाय होय. सर्वज्ञांची ही भूमिका आचार्यपदी विराजमान झालेल्या नागदेवाचार्यांना समजली होती. म्हणूनच सर्वज्ञांच्या पश्चात त्यांनी आपल्या सर्व परिवारास मराठी भाषा सक्तीची केली. संस्कृतमधून साहित्यनिर्मिती करू इच्छिणाऱ्या केशिराजव्यासांना आचार्यांनी "नको गा केशवदया : एणें मार्गिचीया माझिया म्हांतारीया नागवतिल"[४] असे स्पष्टपणे नाकारले. माझा पुढील परिवार या ज्ञानापासून वंचित राहील, हे भविष्य त्यांनी आधीच वर्तवले आणि मराठी भाषेतूनच साहित्यनिर्मितीची प्रेरणा दिली. तेव्हा महानुभावांनी सर्वार्थाने मराठी भाषेला म्हणजे जनभाषेला धर्मभाषेचे स्थान देऊन मोठीच क्रांती केली, यात शंका नाही. भाषा हे संस्कृतीचे एक प्रभावी अंग आहे. श्रीचक्रधरस्वामी जनसामान्यांमध्ये मिसळले, त्यांच्या भाषेतून त्यांनी जनसामान्यांशी संवाद साधला, त्यांची सुखदुःखे समजून घेतली आणि म्हणूनच ते या जनसमूहाचे एक प्रतिनिधी ठरले. ही जनभाषा त्यांच्या सांस्कृतिक आविष्काराचे माध्यम ठरली. 'लीळाचरित्रा'ची भाषा ही यादवकालीन लोकसमूहाची भाषा आहे. लोकभाषेतूनच लोकसंस्कृतीचे जतन अधिक समर्थपणे होत असते. 'लीळाचरित्र' याचे जिवंत उदाहरण म्हणावे लागेल.

धर्म हा लोकसंस्कृतीचा दुसरा महत्त्वाचा घटक आहे. यादवकालीन सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जीवनातील प्रत्येक घटकावर धर्माचा प्रभाव होता. म्हणूनच धर्म हा एकूणच मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असल्याचे लक्षात येते. लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत म्हणूनच देवदेवता, दैवतसंकल्पना, उपासनाविधी, व्रतवैकल्ये, पूजा-अर्चा, दान-धर्म यांना अधिक महत्त्व आहे. मध्ययुगीन कालखंडात धर्मसंस्कृतीचे समाजमनावर खूपच वर्चस्व होते, हे तत्कालीन साधुपुरुषांविषयी असणारी श्रद्धा व त्या काळातील मंदिरे यांचे महत्त्व लक्षात घेतल्यावर स्पष्ट होते. राजसत्तादेखील मंदिरउभारणीला महत्त्व देत होती. यादवनृपती महादेवरायाची पत्नी राणी वैजाई हिने वैजनाथाचे देऊळ बांधण्यासाठी द्रव्य दिल्याची नोंद 'लीळाचरित्रा'त आलेली आहे (लीळा क्रमांक पूर्वार्ध ११६)[५] राजा कान्हरदेवाने स्वामींची भेट झाल्यावर त्यांना द्रव्याची थैली अर्पण केली. परंतु स्वामींनी ती स्वीकारली नाही. म्हणून राजा कान्हरदेवाने ते द्रव्य आपल्या भांडारात न टाकता त्या द्रव्याने कुमारेश्वराच्या मंदिराची पौळी म्हणजे आवाराची भिंत बांधली (लीळा क्रमांक पूर्वार्ध ६१). राजसत्तेने धर्मसत्तेचे महत्त्व आधीपासूनच मान्य केल्याचे हे द्योतक म्हणावे लागेल. यादवकाळात व यादवपूर्व काळातही



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

म्हणजे विविध राजसत्तांच्या काळात महाराष्ट्रात मंदिरे उभारल्याच्या नोंदी आढळतात.[६]

'लीळाचरित्रा'त अनेक मंदिरांचा उल्लेख येतो. सर्वज्ञांचा मुक्काम प्रामुख्याने मंदिरांमध्येच असायचा. त्यात 'लिंगाचा देऊळी'चा संदर्भ अनेक लीळांमधून येतो. उदा., "रामां लिंगाचा देऊळीं आसन" (पूर्वार्ध १६१), "आलेगावी लिंगाचा देऊळीं वस्ति" (पूर्वार्ध १४६), "तळवेली लिंगाचा देऊळीं आसन" (पूर्वार्ध १६३), "पुढीली लिंगाचीए देऊळीये पुजाअवस्वरू : आरोगणा होए : " (पूर्वार्ध -५४४) इत्यादी. 'लीळाचरित्रा'त अनेक देवी-देवतांचे उल्लेख येतात. उदा., अग्नी (उत्तरार्ध ४३६), इंद्र (पूर्वार्ध ३७२, उत्तरार्ध ६, ४६०), चित्ररथ (गंधर्वदेवता) (उत्तरार्ध ४६०), जय (विष्णूचा द्वारपाळ) (अज्ञात लीळा ३३), ब्रह्मा (पूर्वार्ध ३३०, उत्तरार्ध ३१८, ५७१, अज्ञात १२१, १५१), महेश (उत्तरार्ध ८४), वरुण (अज्ञात लीळा ९६), वसु (अज्ञात लीळा १४४), वायो (उत्तरार्ध ४३६), विष्णु (पूर्वार्ध ३१०, उत्तरार्ध ८४, ४६०, अज्ञात ३३, १२१, १३१, १५१) इत्यादी.

पुराणप्रसिद्ध असणाऱ्या या दैवतांच्या उल्लेखांबरोबरच गावोगावी असणाऱ्या मंदिरांचे येणारे उल्लेख सांस्कृतिक दृष्टीने अधिक महत्त्वाचे ठरतात. सर्वज्ञ श्रीचक्रधरांचा वावर प्रामुख्याने ग्रामजीवनातच अधिक असल्याने ग्रामजीवनाचे आध्यात्मिक अस्तित्व असणाऱ्या देवी-देवतांचे अनेक उल्लेख 'लीळाचरित्रा'त येतात. उदा., भोगनारायण (पूर्वार्ध १७६), नागनाथ (पूर्वार्ध १७०, उत्तरार्ध ५७६), संकनाथ (पूर्वार्ध १६९), कोडेस्वर (पूर्वार्ध १५४, १५६), वैजनाथ (पूर्वार्ध १४७, ११६), उत्तरेस्वर (पूर्वार्ध १४८), पानेस्वर (उत्तरार्ध ५२७), कोळेस्वर (उत्तरार्ध ३१२), विज्ञानेस्वर (पूर्वार्ध ५३२), सोमनाथ (पूर्वार्ध ५३०), गणपति (उत्तरार्ध ५२१), ढोरेश्वर (उत्तरार्ध ३९०-३९२, ४८०, ५१७), गोपाळ (उत्तरार्ध २५४), सायागोपाळ (उत्तरार्ध ४७३), संकरेस्वर (पूर्वार्ध २१२), माणिकेस्वर (पूर्वार्ध १८७, २१४), ताएस्वर (उत्तरार्ध ५२६), कुसमेस्वर (उत्तरार्ध २२३), लक्षणेस्वरी (पूर्वार्ध १५०), एकवीरे (उत्तरार्ध ४५५), वऱ्हारदेवी (पूर्वार्ध १७४), महालक्ष्मी (पूर्वार्ध १४०, १७२, उत्तरार्ध २५६, २५७), जोगेश्वरी (उत्तरार्ध ६७, ५४४), म्हाळसा (उत्तरार्ध २४७), पार्वती (उत्तरार्ध ४७२), आवंढा नागनाथ, चांडी (चंडिकादेवी) (उत्तरार्ध ३७७), सुंदरनारायण (पूर्वार्ध २४७) अशा कितीतरी देवी-देवतांची नावे व त्यांच्या मंदिरांचे उल्लेख सबंध 'लीळाचरित्र'भर आलेले आहेत. यांतील बहुतांश देवतांची नावे शिवाशी संलग्न असल्याचे दिसून येते. पार्वतीच्या मंदिराचा (उत्तरार्ध ४७२) आलेला उल्लेख हा विशेष महत्त्वाचा वाटतो, कारण पार्वतीचे स्वतंत्र मंदिर असल्याचा उल्लेख माझ्या पाहण्यात नाही. यावरून या काळात शिवपूजेचे प्राबल्य असल्याचे स्पष्ट होते. यांतील बरीच मंदिरे भंगलेली असल्याचे उल्लेखही 'लीळाचरित्रा'त आलेले आहेत. यावरून या मंदिरांना बरीच जुनी परंपरा असल्याचेही स्पष्ट होते. काही मंदिरे बंद असल्याची, तर काहींतील पूजा बंद असल्याचे उल्लेखदेखील लीळाचरित्रातून आलेले आहेत. एकदा सकाळी पूजावसर झाल्यावर स्वामी फिरायला गेले असताना बाइसांनी प्रश्न केला "बाबा : या लेणेयांचा एसणा दारवठा काइसा?" त्यावर स्वामी म्हणाले, "ए देवतेसि हस्तीवरि बोणे ए गा :" (पूर्वार्ध २१२.) म्हणजे हत्तीवरून नैवेद्य येत होता. यावरून आता येत नसल्याचे दिसून येते. एकदा स्वामींच्या आज्ञेवरून नाथोबांनी पुजाऱ्याकडून किल्ली घेऊन मंदिर उघडले. एवढेच नव्हे, तर ते स्वच्छ केले. "मढु उघडिला : घागरि मागीतली : मढु आंतुबाहीरि धुतला : कापडें अवघा मढु दाटिला : मग सांघावेया आले : मग गोसावीं बीजें केलें : पुर्वामुखें मढीं : पुरादित्याचां : गोसावीयांसि अवस्थान जालें : दखीणीले भींतीसीं पुर्वपसीम ओटा : मां नावेक पांकुळियांची घाणि होती : मग सर्वज्ञें म्हणीतलें : "तुपाभाताचा धुपु दावा :" मां तुपाभाताचा धुपु दाविला : मग घाणि गेली : ।।" या वर्णनावरून हा मढु बरेच दिवस बंद अवस्थेत असल्याचे दिसून येते. सर्वज्ञ त्यांच्या परिवारासह अशा मठ-मंदिरांमधूनच वास्तव्य करीत असत. लोकसंस्कृती आणि लोकदैवते यांचाच हा अनुबंध म्हणावा लागेल.

'लीळाचरित्रा'त या लोकदेवतांचे अनेक संदर्भ आलेले आहेत. लोकदैवते हा लोकमानसाचाच एक अविभाज्य घटक आहे. या संदर्भात डॉ. शरद व्यवहारे म्हणतात, "या लोकदैवतांचा लोकांना एक प्रकारचा मानसिक आधार



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

वाटतो. या मानसिक गरजांतूनही लोकदैवतांचे विश्व गजबजलेले दिसते. लोकदैवतांच्या या विश्वात विविध आकृतींची, प्रकृतींची दैवते आहेत. 'जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी' या सर्व ठायी लोकदैवतांचे वास्तव्य आहे. आजही नदी, तलाव, ओढा, डोह, बारव, डोंगरावर, डोंगरकपारीतून, टेकडीवर, माळरानावर, शेताच्या बांधावर, गावाच्या शिवेवर, मोकळ्या जागी, वृक्षावर लोकदैवतांचे वास्तव्य असल्याच्या लोकश्रद्धेतून या पूजारूप प्रतीकांची विधिवत पूजा मांडली जाते."[७] लोकदैवते ही समूहमनाची निर्मिती आहे, हे खरे आहे. म्हणूनच गाव आणि गावाच्या आजूबाजूला अनेक दैवतांचे वास्तव्य निर्माण होते. यामागे लोकश्रद्धा असली, तरी महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी लोकदेवतांची प्रतिकरूपात मांडणी होते आणि पूजा-अर्चा सुरू होते, त्या त्या ठिकाणी त्या त्या स्थळीची देवताशक्ती अभिमान घेते आणि आपले सामर्थ्य प्रस्थापित करते.

देवतांच्या ठिकाणी असणाऱ्या या सामर्थ्याची जाणीव महानुभावांना आहे. महानुभाव तत्त्वज्ञानात देवतांचे अस्तित्व आणि सामर्थ्य सर्वज्ञ श्रीचक्रधरांनी स्पष्टपणे सांगितले आहे. ते म्हणतात, "एथौनि देवताचक्र नीरोपितां पृथ्वीएसणी कडती आणि मेरुएसणी खडी न पुरे :" (पूर्वार्ध १४५) एकदा सर्वज्ञांच्या दर्शनाला म्हाळसा देवतां येणार असते. ती तुम्हाला पाहता येणार नाही म्हणून आधीच ते सर्व भक्तपरिवाराला डोळे बंद करायला सांगतात. "जी जी : आम्हीं देखौनि :" म्हणून भक्त इच्छा व्यक्त करतात. त्यावर स्वामी म्हणतात, "ते देवता कीं गा : ते कां आपणेयांते देखों देइल?" "मग तेही अवघां डोळे झांकिले : मग म्हाळसी आली : अवघेया मढांतु प्रकासु पडिला : अंदुचा घवघवाटु : अनेग परिमळ : आली : गोसावीयांचें दरीसन जालें : मग नीगाली :" त्या वेळी दाइंबा नामक शिष्याने डोळ्यांवरची बोटे फाकवून बघितले तेव्हा त्याचे डोळे प्रकाशाने भरले. "काहीं देखोंचि ना :" म्हणून त्यांनी सर्वज्ञांना सांगितले. त्यावर सर्वज्ञ म्हणाले, "तयाचां ठाइ काइ इतुलेंही सामर्थ्य नाहीं जें आपणपें देखों नेदिजे?" (उत्तरार्ध २४७) एकदा अरण्यातून जाताना सर्वज्ञ महदाइसांना म्हणाले, "बाइ : तुम्हीं पुढे चाला : मागील वास नको पाहों :" माहादाइसें पुढा चालतें असेंति : गोसावी मागां : माहादाइसीं म्हणीतलें : "गोसावीं मातें कां पां वारिलें?" म्हणौनि मागील वास पाहिली : गोसावीयांमागां होळीएएसना गगनचुंबीतु प्रकासु देखिला. ते काय होते म्हणून महदाइसांनी विचारल्यावर सर्वज्ञ म्हणाले - "बाइ : तीए स्थानीची देवता : एथिचें अनुवर्जन (वाटे लावणे) करीत एत होती : तुम्हीं माघौतें पाहिलें : ते तेथेंचि रहिली :" (पूर्वार्ध ५८६) प्रस्तुत लीळेतही देवता जीवाला आपल्या सामर्थ्याने दिसत नसल्याचे स्पष्ट होते.

देवतासामर्थ्याची आणखी एक लीळा पाहू या. एकदा नाथोबा (मंडळिक) प्रवासात असताना एका देवळात गेले, तेव्हा तेथे डांका वाजत होता. म्हणजे देवीचा गोंधळ सुरू होता. म्हणून नाथोबा दुसऱ्या देवळात गेले, तर तिथे सर्वत्र देवता होत्या. याचा अर्थ सर्व देऊळ देवतांनी (देवतांच्या मूर्तींनी) भरलेले होते. त्या वेळी नाथोबा म्हणाले, "कैसीया या रांडा भंवतीया बैसलीया असति : कवणें ठाइं पाठि घालुं?" आणि देवतांचा कोप झाला व नाथोबांना लगेच ताप भरला. "आंगी जरू : रगतांबर डोळे :" अशा अवस्थेत ते स्वामींजवळ आले. पण तत्पूर्वीच त्या ठाईची "देवता गाऱ्हाणें सांघावेया आलीया : गोसावीयांपुढां सांघों लागलीया : गोसावी 'हुं हुं' ऐसें म्हणताति : मग बाइसीं म्हणीतलें : "बाबा : हें कवणेंसीं बोलीजताए?" सर्वज्ञें म्हणीतलें : "बाइ : मंडळिकाचें एथ गाऱ्हाणें आलें :" "गाऱ्हाणें काइसें बाबा?" सर्वज्ञे म्हणीतलें : "मंडळिकें देवतेंसि सवीया दीधलीया : तयासि तेथ ज्वरु आणिला :" नाथोबा आल्यावर स्वामींनी त्यांची कानउघाडणी केली. ते म्हणाले "तें स्थान न पळे तरि आपण आणिका स्थाना जाइजे : परि देवतेंसि सवी नेदीजे कींगा : आपण कव्हणाची तांति न कीजे : ...... एथिचे म्हणौनि उपसाहिले :" (उत्तरार्ध २४२) कोणत्याही देवतेचा उपमर्द करू नका. तुम्ही आमचे म्हणून एवढ्यावरच निभावले. अन्यथा नाथोबांना आणखीही शिक्षा होऊ शकली असती.

त्या त्या स्थानाची म्हणून असणारी देवता ही एका अर्थाने क्षेत्रपाळ म्हणजे क्षेत्ररक्षणाचे काम करीत असते. अजूनही अनेक ठिकाणी गावाच्या सीमेवर ग्रामदेवतांची म्हणजे क्षेत्ररक्षक देवतांची मंदिरे असतात. "राणाइ वेसी



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

पाओ लावणें" (पूर्वार्ध ५३७) या लीळेत असाच संदर्भ आलेला आहे. एकदा राणाइसें रात्री अवेळीच सर्वज्ञांच्या दर्शनाला येते. वेळी-अवेळी येताना आपल्याला भीती वाटत नसल्याचेही ती सांगते. तेव्हा सर्वज्ञ तिला म्हणाले "तरि वेसी पाओ लाउनि या पां :" आणि तीएं गेलीं : वेसींसि पाओ लाविला : तवं बाबरझांटि : गुंजावर्ण डोळे : खांदावरि मुदगलु : माहाप्रचंडु : ऐसा पुरुष देखिला : आणि बीहालीं : तैसींचि गोसावीयांपासि आलीं : गोसावीयांपुढां सांघों लागलीं ....... हां जी : तरि तो कोनु?" सर्वज्ञें म्हणीतलें : "बाइ : तो ब्रह्मनाथू : एथिचोए ओळगेसि आला असे :" (पूर्वार्ध ५३७.) यासंबंधी डॉ. मधुकर वाकोडे लिहितात, "विशाल जटासंभार असलेला हा 'महाप्रचंडू' ब्रह्मनाथू बह्मांद्य परंपरेतील यक्षच होय."[८] त्यांनी सिद्धार्थ जातक कथेच्या आधारे तसे स्पष्ट केले आहे. यक्ष म्हणजे क्षेत्रपाळ, म्हणजे वेशीचा रक्षक होय. म्हणूनच सर्वज्ञांनी राणाइसाला वेशीला पाय लावून येण्यास सांगितले होते. वेळी-अवेळी येणे उचित नव्हे, याची जाणीव त्यांनी राणाइसाला करून दिली.

देवता हा महानुभाव तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाचा घटक असून त्याचे लोकजीवनाशी असणारे बंध हे लीळाचरित्राच्या माध्यमातून अधिक स्पष्ट होतात. लीळाचरित्रातील या सबंध देवताविषयक संदर्भांमध्ये देवतांची कोठेही अवहेलना केलेली नाही. उलट, त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या सामर्थ्याची व ऐश्वर्याची स्वामींनी वेळोवेळी जाणीव करून दिलेली आहे. असे असताना-सुद्धा डॉ. अमिता मुजुमदार या संदर्भात लिहितात, "महानुभावीयांना देवतांचे वावडे असूनही श्रीकृष्णचरित्रात देवतांचा उल्लेख येतो."[९] महानुभावांना देवतांचे वावडे आहे म्हणजे काय? महानुभावांना देवतांचे वावडे असल्याचे संदर्भ यांना कोठे प्राप्त झाले? वास्तविक महानुभावांना देवतांचे वावडे असल्याचे कोठेही दिसून येत नाही. सबंध लीळाचरित्रातही दिसून येत नाही. 'श्रीकृष्णचरित्र' हा 'लीळाचरित्रा'चाच एक भाग आहे. कारण चर्चिक आणि जिज्ञासक असणाऱ्या महदाइसांनी वेळोवेळी स्वामींना श्रीकृष्णचरित्राविषयी विचारणा केली, आणि स्वामींनी प्रसंगोपात्त श्रीकृष्णलीला सांगितल्यात. त्यामुळे साहजिकच आवश्यक तेथे देवतांचे संदर्भ आलेले आहेत. देवतांविषयी आपल्या परिवाराला माहिती देताना स्वामींनी कोठेही देवतांचा अधिक्षेप केलेला नाही. उलट, देवतांच्या ठिकाणी असलेल्या सामर्थ्याची व ऐश्वर्याची त्यांनी वेळोवेळी जाणीव करून दिलेली आहे. स्वामींच्या दर्शनाला अनेकदा देवता आल्याचे आपण पाहिले आहेच. नाथोबांनी चूक केल्यामुळे त्यांनी नाथोबांना पाठीशी घातले नाही; उलट देवतांचा उपमर्द करू नये म्हणून समज दिली. महानुभावांनी देवताभक्ती नाकारली, म्हणून देवतांचे अस्तित्व नाकारले असे नाही, किंवा त्यांचे सामर्थ्य नाकारले असेही नाही आणि देवताभक्ती नाकारण्याची कारणे महानुभाव तत्त्वज्ञानात आलेली आहेत. महानुभावांची देवताविषयक भूमिका इतकी स्वच्छ असताना महानुभावांना देवतांचे वावडे होते, अशी विधाने केली जातात, याचे आश्चर्य वाटते. आमच्याच काही अभ्यासकांनी महानुभावपंथाविषयी गैरसमज निर्माण करून ठेवले आहेत. अर्थातच यामागे त्यांचा हेतू स्वच्छ नव्हता हे जितके खरे, तितकेच त्याला त्यांचे अज्ञानत्वही कारणीभूत आहे. पुढच्या पिढीने तरी मूळ साहित्य गंभीरपणे वाचून त्याचा विचार करायला हवा; परंतु दुर्दैवाने तेही त्यांच्याच भूमिकेवर उड्या मारतात. संशोधकाने मूळ संदर्भ पाहिल्याशिवाय विधाने करू नयेत, ही संशोधनातील साधी समजही यांना नसावी, याचे आश्चर्य वाटते.

'लीळाचरित्रा'तील 'वीठलु वीर कथन' (उत्तरार्ध ५१९) या लीळेचा संदर्भ घेत डॉ. रा. चिं. ढेरे लिहितात, - "विठ्ठलाला नीचतम ठरवून भागणार नाही, तर त्याचबरोबर ख्यातनाम विठ्ठलोपासकांनाही निंद्य ठरविले पाहिजे, असा त्याचा (लीळाकाराचा) दुष्ट अट्टाहास आहे. विठ्ठलाच्या पुत्रांनी त्याला दैवतप्रतिष्ठा प्राप्त करून दिल्यानंतर आपल्या माता-पित्याची, विठ्ठल-रुक्मिणी ही नावे समाप्तिमुद्रेत गोवून, त्यांनी भक्तिपर पदे रचली, असे हा लीळाकार सांगतो. प्राचीन मराठी भक्तिपर वाङ्मयात, ज्ञानदेवांच्या नावावर मोडणाऱ्या अनेक अभंगांमध्ये समाप्तिमुद्रेत 'बाप-रखुमादेवीवर' हे नाव गुंफलेले आहे आणि ज्ञानदेवांच्या माता-पित्यांची नावे 'विठ्ठल-रुक्मिणी' अशीच आहेत. ही वस्तुस्थिती ध्यानी घेता, प्रस्तुत लीळेचा रोख ज्ञानदेवादी भावंडांकडे आहे, हे समजायला अडचण उरत नाही."[१०] प्रस्तुत 'वीठलु

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

वीरु कथन' ही लीळा जर आपण पाहिली तर त्यात महदाइसाने स्वामींना विचारले आणि त्यांनी विठ्ठलाची अगदी थोडक्यात माहिती दिली एवढेच. यात विठ्ठलाला नीचतम ठरविण्याचा प्रयत्न कोठे झाला हेच कळत नाही. मुख्य म्हणजे 'हे देखिले तैसे आठविजे' या स्मरणभक्तीच्या प्रेरणेतूनच 'लीळाचरित्रा'ची निर्मिती झाली, हे सर्वश्रुत असावे आणि 'देखिले तैसे' म्हणण्याचे कारण म्हणजे त्यात ईश्वरी स्मरण करताना कोठेही विकल्पाला थारा नसावा. म्हणूनच प्रत्येक लीळा नागदेवाचार्यांनी तपासून दिली. त्यामुळे प्रस्तुत लीळेचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घ्यायला हवे. शिवाय इतर देवी-देवतांचा अपमानास्पद उल्लेख कोठेही स्वामींनी केलेला नाही. याही लीळेत तो नाही. डॉ. ढेरेंना तो कोठे दिसला? दुसरे असे की, विठ्ठलोपासकांनाही निंद्य ठरविण्याचा दुष्ट अट्टाहास तरी डॉ. ढेरेंना कोठे दिसून आला? ज्याच्या नावे भडखंबा उभारला त्या विठ्ठलाच्या पुत्रांनी आपल्या माता-पित्याची म्हणजे विठ्ठल-रुक्मिणीची नावे गोवून पदे रचली. अर्थात हा उल्लेख 'लीळाचरित्रा'तील प्रस्तुत लीळेत नाही, परंतु डॉ. कोलते यांनी तळटिपेत दिलेल्या अन्य पाठातील लीळेत आलेला आहे. परंतु यातील विठ्ठल-रुक्मिणी ही नावे ज्ञानदेवांच्या माता-पित्याची होत, असे म्हणण्याचे कारण काय? वीरगती प्राप्त झालेल्या विठ्ठलाच्या पत्नीचे नाव रुक्मिणी नसेल कशावरून? आणि विशेष म्हणजे 'बाप रखुमादेवीवर' म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांचे आगमनच स्वामींच्या जाण्यानंतर झालेले आहे. तेव्हा स्वामींच्या नंतर आलेल्या ज्ञानदेवांच्या अभंगातील नाममुद्रा स्वामी त्यापूर्वीच कशी वापरणार? डॉ. ढेरे यांचा हा बादरायण संबंध कोणत्या कसोटीवर टिकणार आहे? विठ्ठलाविषयी किंवा संत ज्ञानदेवांविषयी आपल्या अनुयायांच्या मनात 'निंदाभाव' निर्माण करण्याचे कारण तरी काय? असा निंदाभाव निर्माण करण्याचे आणखी दुसरे उदाहरण डॉ. ढेरे यांना 'लीळाचरित्रा'त किंवा इतर महानुभाव वाङ्मयात आढळले का? "महानुभाव वाङ्मयात विठ्ठल आणि विठ्ठलभक्त यांच्या निंदेच्या अनेक खोट्या कथा आढळून येतात", असेही डॉ. ढेरे लिहितात.[११] मग त्यांनी त्याचे सबळ पुरावे का दिले नाहीत. संशोधन म्हणजे हवेतल्या गप्पा होत नाहीत, त्याला पुरावे हवे असतात. 'निंदाभाव'च निर्माण करावयाचा होता, तर तो आणखीही वेगवेगळ्या पद्धतींनी करता आला असता. तसे एक तरी उदाहरण डॉ. ढेरे यांनी दाखवावे आणि विशेष म्हणजे कोणत्याही देवी-देवतांचा उपमर्द हा स्वतः स्वामींनीच सहन केला नाही, हे डॉ. ढेरे लक्षात का घेत नाहीत?

मुख्य म्हणजे डॉ. रा. चि. ढेरे यांच्या मते "श्रीकृष्ण हेच महानुभाव संप्रदायाचेही आराध्य दैवत असल्यामुळे, विठ्ठल हा श्रीकृष्णाचा अवतार ठरला, तर महानुभावीयांनाही तो उपासनेचा विषय मानावा लागेल, ही या प्रश्नामागील बोच आहे."[१२] विठ्ठल हा श्रीकृष्णाचा अवतार मानावा लागेल म्हणजे काय? श्रीकृष्ण हे भारतीय संस्कृतीचेच आराध्य दैवत आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीतील अनेक दैवतांवर श्रीकृष्णाचा हेत्वारोप झालेला आहे. म्हणून काय त्या सर्व दैवतांना श्रीकृष्ण मानणार काय? आणि असे मानून अवतार सिद्ध होतो का? विठ्ठलावरदेखील श्रीकृष्णाचा हेत्वारोप केलेला आहे. सावळी मूर्ती, रुक्मिणी पत्नी त्याचेच द्योतक आहे. श्रीकृष्ण हे जगप्रसिद्ध दैवत असल्याने असे हेत्वारोप करण्याचा प्रयत्न झाला. परंतु महानुभावांची भूमिकाच मुळात वेगळी आहे. परमेश्वर आणि देवता यांचे स्वतंत्र अस्तित्व महानुभावांनी स्पष्ट केलेले आहे. तीनमुखी दत्तसुद्धा महानुभावांनी स्वीकारला नाही. त्यासंबंधीचा 'निंदाभाव'ही कोठे व्यक्त केलेला नाही. अर्थात कोणत्याही जगप्रसिद्ध दैवताचा आपल्या दैवतावर हेत्वारोप करणे हा लोकश्रद्धेचाच भाग आहे. विठ्ठलाच्या संदर्भातही तेच झाले आहे. कारण कोणत्याही पुराणादी ग्रंथांत विठ्ठल हा श्रीकृष्ण असल्याची नोंद आलेली नाही आणि डॉ. ढेरे तरी विठ्ठल हा श्रीकृष्णाचा अवतार असल्याचे सिद्ध करू शकले का? श्रीकृष्ण आणि त्याची श्रीमद्‌भगवद्‌गीता जगाच्या पाठीवर सर्वत्र पोचली. महानुभाव भारतभर पसरले. तसा विठ्ठल देशभर का पसरला नाही? श्रीकृष्ण भारतीय संस्कृतीचे आराध्य दैवत ठरले. म्हणून इतर देवी-देवतांवर त्याचा हेत्वारोप झालेला आहे. अनेक लोकगीतांमधून विठ्ठलावर श्रीकृष्णाचा हेत्वारोप झालेला आहे. तो लोकसमूहाचा आविष्कार आहे. भागवतधर्माचा प्रभाव मराठी लोकसंस्कृतीवर कसा होता, याचे प्रस्तुत



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

लीळा हे उदाहरण ठरावे. विठ्ठल हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोकदैवत. लोकसमूहाने या खडखांबूलाचे अस्तित्व स्वीकारले, आणि विठ्ठल ही खऱ्या अर्थाने लोकदेवता झाली. 'लीळाचरित्रा'तील विठ्ठलाचा उल्लेख या अर्थाचाच द्योतक आहे. संशोधकांनी पुरेशा गांभीर्याने संशोधन केले नाही, तर अनेक चुकीचे संदर्भ समाजापर्यंत पोचू शकतात.

महानुभाव संप्रदायाविषयी असे अनेक चुकीचे समज संशोधकांनी निर्माण केल्याचे दिसून येतात. उदाहरणार्थ, डॉ. मधुकर वाकोडेंचे हे विधान पहा. ते लिहितात, "तत्त्वज्ञान, आचारधर्म आणि सामाजिक क्षेत्रांत अत्यंत बंडखोर असलेले म. चक्रधर पंथीय प्रसाराकरिता मात्र लोकधारणा व लोकतत्त्वांचा आश्रय घेताना दिसतात आणि तत्कालीन लोकमानसाचा विचार करता त्यांनी वापरलेले तंत्र प्रभावीसुद्धा ठरले."[१३] तत्त्वज्ञान, आचारधर्म आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांची भूमिका ही अत्यंत बंडखोर आहे, यात शंकाच नाही. लोकभाषेला धर्मभाषेचे स्थान देणारे पहिले बंडखोर श्रीचक्रधरच ठरलेत. परंतु यामागे त्यांची कोठेही पंथीय प्रसाराची भावना नव्हती. महानुभाव संप्रदाय हा बुद्धिप्रामाण्यवादी असल्याने, तो केवळ भावनेच्या आहारी जाणारा संप्रदाय नाही. म्हणूनच महानुभावांकडे येणारा वर्गही बुद्धीच्या कसोटीवर येत होता. आपण सर्वज्ञानसंपन्न आहोत, असे वाटणाऱ्या म्हाइंभटांनादेखील स्वामींशी चर्चा झाल्यावर आपण अपूर्ण असल्याची जाणीव झाली. त्या वेळचा विद्वान पंडित हा सर्वज्ञांच्या तत्त्वज्ञानाकडे आपोआपच आकर्षित होत होता. त्यासाठी त्यांना कोठेही पंथप्रचाराची भूमिका घ्यावी लागली नाही आणि विशेष म्हणजे पंडित वर्ग हा प्रचाराने आकर्षित होत नसतो; तो केवळ ज्ञानाने आकर्षित होत असतो. सर्वज्ञ समाजातील सर्व स्तरांत वावरत होते, त्यामुळे त्यांना मानवी जीवनाचे अनेक पैलू माहीत होते. त्यात लोकधारणांपासून लोकतत्त्वांपर्यंत सारेच आले; पण त्याचा त्यांनी पंथप्रचारासाठी कोठेही वापर केला असे नाही. तसे असते तर डॉ. वाकोडेंनासुद्धा आपली भूमिका स्पष्ट करण्याकरिता काही उदाहरणे देता आली असती.

सर्वज्ञांचा लोकजीवनातील वावर तितकाच महत्त्वाचा ठरला. त्यामुळे समाजातील अनेक पैलू त्यांना न्याहाळता आलेत. सामाजिक विषमता हा त्यांतीलच एक महत्त्वाचा घटक ठरला. स्त्री-पुरुष समानतेचा महामंत्र देणाऱ्या सर्वज्ञांनी सर्वच स्तरांवरची सामाजिक विषमताही नाकारली. चातुवर्ण्यव्यवस्था ही यादवकाळातही प्रबळ होती. परंतु सर्वज्ञांनी आपल्या सर्व परिवाराला चातुर्वर्ण्य नाकारण्यासंबंधीची दीक्षा दिली. घर निवडीत भिक्षा करू नये, चारही वर्णांच्या घरी भिक्षा करावी, असे त्यांनी सर्व परिवारालाच सांगितले होते, आणि परिवारही आज्ञेचे पालन करीत होता. एकदा परसनाएकासोबत द्वारावतीला जा असे स्वामींनी मार्कंडाला सांगितले त्यावर मार्कंडाचे उत्तर, "जी जी : वाटे भीक्षा नाहीं : ब्राह्मणाचें गांव नाहीं" सर्वज्ञे म्हणीतलें : "याचाही भगवा करा" (उत्तरार्ध २२७) आणि मग मार्कंडाने संन्यास घेतला. यावर भाष्य करताना डॉ. सुमन बेलवलकर लिहितात, ".... परंतु संन्यास घेतल्याशिवाय चातुर्वर्ण्यातील भिक्षा चालणार नाही. अशा स्थितीत ज्या मार्गावर ब्राह्मणांची घरे असण्याची शक्यता कमी त्या मार्गाची यात्रा करण्यापूर्वी चक्रधर यात्रेकरूला संन्यास घ्यायला लावत. ..... चक्रधरांचे ब्राह्मण शिष्य केवळ ब्राह्मणां घरी भिक्षा करीत असत. जिथे ब्राह्मणांची घरे नाहीत तिथे कोरान्न भिक्षा मागत. संन्यास घेतल्यानंतर मात्र 'चातुर्वर्ण्य चरेद् भैक्ष्यम्' हा त्यांचा दंडक होता."[१४] याचा अर्थ स्वामींना 'चातुर्वर्ण्यं चरेद भैक्ष्यम्' हा आचार फक्त संन्याशांपुरताच अपेक्षित होता का? डॉ. बेलवलकरांना यामागील सूत्रच नेमके कळाले नाही. एकदा स्वामींनी आउसांना विचारले, "नाएका (आउसा) : अनो नीका कीं मार्कंड नीका?" "जी जी : स्वामी जगंनाथा : अनो निका नव्हे : तो चातुर्वर्णी भिक्षा करी : मार्कंडु निका :" सर्वज्ञे म्हणीतलें : "ढोरे राखा हो नाएका : एथिचेया दरीसनाचीया चाडा ब्रम्हण्यांचें सर्वस्व सीखासुत्र सांडिले तो अनो ओखटा? मां मार्कंडु चांग?" (उत्तरार्ध २४५) म्हणजे ज्याने ब्राह्मणत्वाचा त्याग केला तो अनो चांगला नाही आणि ब्राह्मणत्व पाळणारा मार्कंड मात्र चांगला. यावरून ब्राह्मणत्व पाळणाऱ्या मार्कंडाबद्दल स्वामी नाराज असल्याचे दिसून येते. परसनाएकासोबत जाताना जेव्हा भिक्षेचा प्रश्न मार्कंड उपस्थित करतो, तेव्हा स्वामी "याचाही भगवा करा" म्हणजे याला आता संन्यास द्या, त्याशिवाय तो


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

'सिखासुत्राचा' त्याग करणार नाही, म्हणजे त्याशिवाय ब्राह्मणत्व सोडणार नाहो, असा त्याचा अर्थ आहे. याचा अर्थ संन्यास घेतल्याशिवाय चारही वर्णांच्या घरो भिक्षा मागता येत नाही, असा नाही. स्वामींना सबंध समाजातीलच चातुर्वर्ण्यव्यवस्था नको होती. डॉ. बेलवलकरांनी केलेल्या भाष्याचा अर्थ फक्त संन्याशांनी चातुर्वर्ण्य टाळावा आणि इतरांनी पाळावा, असा होतो. स्वामींना असे कोठेच अपेक्षित नाही. स्वामींचे शिष्य फक्त ब्राह्मणांघरी भिक्षा करीत असत हा अनोखा शोध तरी डॉ. बेलवलकरांनी कोठून लावला? इतक्या स्पष्टपणे चातुर्वर्ण्याला विरोध करणाऱ्या स्वामींबद्दल किंवा त्यांच्या शिष्याबद्दल असे लेखन करणे म्हणजे स्वामींची भूमिकाच समजली नसल्याचे लक्षण म्हणावे लागेल. आयुष्यभर चातुर्वर्ण्य पाळणाऱ्या शिष्यांना स्वामी चातुर्वर्ण्यापासून परावृत्त करीत होते. स्वामींनी सांगितल्यावर आउसांनाही ते कळाले आणि आपले ब्राह्मणत्व विसरण्यासाठी मार्कंडानेही संन्यास घेतला. कोणत्याही साहित्याचे संशोधन करीत असताना, आणि त्यातही विशेषतः मध्ययुगीन साहित्याचे संशोधन करीत असताना, त्याचे सर्व पैलू नीटपणे लक्षात घेण्याची गरज असते.

चातुर्वर्ण्यव्यवस्थेबरोबरच यादवकालीन रूढी, व्रतवैकल्ये यांचे संदर्भही 'लीळाचरित्रा'त आलेले आहेत. या काळात ब्राह्मणवर्ग षट्कर्म करण्याला अधिक महत्त्व देत असायचा. स्वामींनी एका ब्राह्मणाला स्तिती दिली असता, तो षट्कर्म करणारा ब्राह्मण घरी आल्यावर आपले कर्म विसरू लागला. नातेवाइकांनी पुन्हा स्वामींजवळ जाऊन विनवणी केल्यास तू पूर्ववत होशील असे सांगितल्यावर त्याने स्वामींना प्रार्थना केली. त्यावर "सर्वज्ञें म्हणीतलें : "भटो : काहीं असुख होत असे? : "ना जी : असुख तरि काहीं नव्हे : सुखचि होत असे : परि हे माझे जावें :" (पूर्वार्ध ५६०-५६१) अशी विनंती करतो. स्तितीमुळे सुख वाटते तरी हे माझे जावे म्हणून तो पुन्हा प्रार्थना करतो; कारण या स्तितीपेक्षा त्याला त्याचे षट्कर्म महत्त्वाचे वाटतात. सर्वज्ञांच्या या षट्कर्मांनाच विरोध होता. मुख्य म्हणजे स्वामींचा ब्राह्मणत्वालाच विरोध होता. म्हणूनच इंद्रोबांना "तुम्हांसि काइ टीळेयाजानिवेयावीन भीक्षा नैए" (पूर्वार्ध २२२) असा प्रश्न सर्वज्ञांनी विचारला होता आणि एवढेच नव्हे तर टीळा, जाणिवे पुरायला सांगितले. नाथोबांनी ते पुरले, म्हणजेच टिळा आणि जानव्याचाच त्यांनी त्याग केला.

व्रतवैकल्याचाच एक भाग असलेल्या उपवासाला एकूण भारतीय संस्कृतीतच महत्त्वाचे स्थान आहे. गोकुळाष्टमीचा उपवास असो की एकादशीचे व्रत असो, ते तितक्याच आत्मीयतेने केले जायचे. एकादशीच्या दिवशी तर पुरुष जागरणासाठी देवळात जात (पूर्वार्ध ४३.) मासोपवास म्हणजे महिनाभर उपवास करण्याची पद्धती होती आणि हा खडतर उपवास प्रामुख्याने स्त्रियाच करीत. लीळाचरित्रात अनेक ठिकाणी मासोपवासाचे संदर्भ येतात. (उदाहरणार्थ, पूर्वार्ध लीळा ३८५, उत्तरार्ध लीळा १२३, १६८, ४२६ इत्यादी.) स्वामींनी या उपवासांना विरोध केला आहे. जन्माष्टमीचा उपवास करणाऱ्या नागाइसांना स्वामी म्हणाले, "बाइ : देवकीए देवीसि श्रीकृष्ण जन्मले तै काइ तीहीं उपवासु केला? पेज तऱ्हीं प्यालीचि कीं :" (पूर्वार्ध ९५.) गोकुळाष्टमी कशी केली जायची त्याचे सुंदर चित्रण 'लीळाचरित्रां'त आलेले आहे. ही माती कशाला आणली असे स्वामींनी बोणेबाइंना विचारले असता, बोणेबाइ म्हणतात, "बा मौन्यदेव हो : तुम्ही नेणा? आजि गोकुळाष्टमी : आजि श्रीकृष्ण जन्मले : याचा श्रीकृष्णु करूनि : नंदु : एस्वदा : वसुदेओ : देवकी करूनि : गोकुळ करूनि बा : फुलवरा कीजे : व्रज कीजे :" त्यावर स्वामींनी "बाइ : श्रीकृष्णु तो काइ मातीएचा? नंदु : एस्वदा : वसुदेओ : देवकी : तीएं काइ मातीएचीं? गोकुळ काइ मातीएचें?" (पूर्वार्ध ९५) असा प्रतिप्रश्न करून या प्रथेला विरोध केला. एकूणच अध्यात्मात वाढत जाणारी ही अंधश्रद्धा त्यांनी नाकारली. महानुभाव संप्रदाय हा अतिशय बुद्धिवादी संप्रदाय असल्याने भक्ती आणि अंधश्रद्धा यांत या संप्रदायाने नेहमीच अंतर ठेवले आहे. हे खरे असले, तरी यादवकालीन लोकसंस्कृतीचे वैविध्यपूर्ण प्रतिबिंब मात्र 'लीळाचरित्रा'त उमटलेले आहे. सोमवती अमावस्या करणे, चांद्रायणव्रत करणे, सोमवतीला पिंडप्रदान करणे (उत्तरार्ध ९९), गंगास्नान करणे, लोणार येथील वरजे नदीत स्नान करणेही पवित्र मानले जायचे. (पूर्वार्ध ४१५) तसेच तर्पण करणे इत्यादी विधी 'लीळाचरित्रा'त आलेले असून ते



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

लोकसंस्कृतीचेच द्योतक आहेत.

पुराण सांगण्याची परंपरा यादवकाळातही होती. गदोनायकासारख्या श्रीमंताच्या घरी जाऊन पुराणिक रोज पुराण ऐकवीत असत (पूर्वार्ध ११५.) मंदिरांमध्येही पुराण सांगितले जात असायचे. पुराणांवर लोकांची विशेष श्रद्धा होती. पुराण ऐकूनच "गुरुवांचौनि मुंचणे नाही"ची प्रचिती देमाइसांना आली, आणि त्या गुरूचा शोध घेत घेत सर्वज्ञांकडे आल्या (पूर्वार्ध १२७.) पुराण ऐकण्यामुळेच महदाइसांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत, आणि त्यांचे निरसन त्या सर्वज्ञांकडून करून घेत (लीळाचरित्र पृ. ७३८.) श्रीचक्रधरनिरूपित 'श्रीकृष्णचरित्रा'ची निर्मिती झाली, ती यातूनच. पुराण सांगणाऱ्या पुराणिकाला वृत्ती (मानधन) दिली जायची. दानधर्म करणे हे या काळाचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल, ब्राह्मणभोजन घालणे, दक्षिणा देणे, गोदान करणे, भूदान करणे एवढेच नव्हे तर गुरुकुल पद्धतीने अध्यापन होत असल्याने विद्वान ब्राह्मणांना त्यांचा योगक्षेम नीट चालावा म्हणून पाण्याची सोय असलेली कसदार जमीन दानात दिली जात असे. राणी वैजाई करीत असलेल्या दानाचा हा वृत्तांत पहा- "जी जी : रायाची राणी वैजाए : जी जी : ते ब्राह्मणा वृति देति असे जी : सेत : घर : आंथूरण : बाज : म्हैसि : बटीकि : साटि आसु : ऐसी वृति देति असे जी :" (पूर्वार्ध ११६.) यावरून तत्कालीन दानधर्मात दिल्या जाणाऱ्या सर्व वस्तूंचा तपशील स्पष्ट होतो.

धर्मप्रमाण असणाऱ्या या समाजजीवनात विविध विधींना जसे महत्त्व होते, तसे तंत्र-मंत्र आणि विद्यांनाही महत्त्व होते. उदाहरणार्थ, आगम म्हणजे तंत्रविद्या (पूर्वार्ध १८७), शरीरावयव पुन्हा प्राप्त करून देणारी चौरंगी विद्या (पूर्वार्ध २६०, उत्तरार्ध ३२५), वय रोखून धरणारी व एक हजार वर्षांचे आयुष्य देणारी वयस्तंभिनी विद्या (पूर्वार्ध २५), प्रल्हादविद्या (पूर्वार्ध १८९), घुटिकासिद्धी विद्या (पूर्वार्ध ६६) इत्यादी. यादवकाळात तंत्रमंत्रादी विद्यांवर विशेष भर होता, असे दिसून येते. त्यासाठी देवतांना पाचारण करून 'यंत्रासन' रचले जायचे (उत्तरार्ध ४७६).

लोकसमूहमनाचाच एक लक्षणीय भाग म्हणजे लोकसमजुती होत. लोकसमूहाच्या आध्यात्मिक मानसिकतेचीच ही दुसरी बाजू म्हणावी लागेल. भूतपिशाच, शुभाशुभ, शकुन-अपशकुन यांसंबंधीच्या काही लोकसमजुती पिढ्यान् पिढ्यांपासून चालत आलेल्या आहेत. त्या अंधश्रद्धा म्हणून नव्हे, तर लोकजीवनाचा एक अंगभूत घटक म्हणूनच लोकजीवनाशी तादात्म्य पावलेल्या आहेत. हत्येचे पातक लागल्याने पंचकौळ आचार्य म्हणजे पाच कुळांचा आचार्य ग्रहो होतो, आणि त्यातून सुटका होण्यासाठी तो सर्वज्ञांना उच्छिष्ट प्रसाद मागतो (पूर्वार्ध ३५.) तसेच सारंगपाणीभटास दोन ग्रह लागल्याने त्यांना ग्रहे सारंगपाणी म्हणूनच संबोधले जायचे. भाताच्या दोन मुदा करून त्यांच्या अंगावरून ओवाळून फेकल्याने त्यांच्या अंगातील ग्रहो निघून गेला. परंतु आला त्याच रस्त्याने पुन्हा परत गेलात तर तेच ग्रहो पुन्हा तुमची वाट पहात थांबल्याचे स्वामी सारंगपाणीभटास सांगतात (पूर्वार्ध १११.) गळनींबा येथील निंबाच्या झाडावर असलेले ग्रहो तेथे माणसांना वस्तीच करू देत नव्हते. स्वामींनी त्या ग्रहांना तेथून घालवले (उत्तरार्ध ३११.) भूताखेतांना वश करण्याची शक्ती काहींजवळ असायची. म्हणूनच स्वामींनी वामदेवांना "आपणेयां काइ वैस्य?" असा प्रश्न विचारल्यावर 'भूतसृष्टि' वश असल्याचे त्यांनी सांगितले. स्वामींनी त्यांना दाखवायला सांगितली; परंतु वामदेवाने आवाहन करूनही कोणीच आले नाही. स्वामींनी बोलावले असता दृष्टे, सृते, डोके नसलेले, धड नसलेले, खिंकाळणारे, वेताळे अशी सारी भूतसृष्टीच अवतरली. त्यांचे विक्राळरूप पाहून वामदेव घाबरले. खाऊ की गिळू करणारे, ब्रह्मांड गिळून टाकेल असे त्यांचे स्वरूप होते (पूर्वार्ध १३४.) डॉ. मधुकर वाकोडे म्हणतात त्याप्रमाणे, "सामान्यांच्या जीवोद्धारासाठी सामान्यजीवन जगणाऱ्या श्रीचक्रधरांच्या चरित्रातील काही घटना लोकमानसाने अद्भुताच्या पातळीवर अनुभवलेल्या आहेत."[१५]

शकुन-अपशकुनाच्या कल्पनाही यातूनच वाढीला लागल्या असाव्यात. एकदा महादेवराय राजा स्वामींच्या दर्शनाला निघाला असता, "पाटाचा हाति सरला : अपसगुणु जाला : म्हणौनि राहीला :" (पूर्वार्ध २२६.) राखेच्या ढिगाऱ्यातून स्वामी बाहेर आले तेव्हा "उकरडा माणुस वीयाला : गावांसि अरीष्ट उठिले : आतां सांतीक करुं



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

या :" म्हणून सगळ्या गावाने मिळून सडासंमार्जन केले, होम केला आणि गावजेवण दिले (पूर्वार्ध ७०.) अशा प्रकारचे अरिष्ट येऊ नये म्हणून नवस करण्याची पद्धती तर होतीच, परंतु पुत्रप्राप्तीसाठीही नवससायास केले जात असायचे. सत्पुरुषाच्या ठिकाणी नवस केल्यास आपल्याला पुत्र होईल, अशीही भावना या समाजात होती. ओरंगळचा (आंध्रप्रदेश) मालु (मल्ल) तर "जरि मज पुत्रु होईल तरि मी गोसावीयांचा ठाइं पांचां सहस्रां सोनेयांची पुजा करीन :" (पूर्वार्ध ३०) असा मनोमन नवस करतो. आपल्याला सात मुली असल्याची, पर्यायाने पुत्रप्राप्ती नसल्याची भावना भुतानंद व्यक्त करतो (उत्तरार्ध ४७८.) एका ठाकूराने तर पुत्रप्राप्ती नसल्याने आपल्या दोन्ही पत्नींना स्वामींकडे पाठविले होते. स्वामींनी त्या दोघींनाही परत पाठविले, तेव्हा ठाकूराने स्वतः येऊन आपल्याला पुत्रप्राप्ती नसल्याचे दुःख स्वामींजवळ व्यक्त केले. स्वामींनी त्याला पुत्रप्राप्ती होईल असा आशीर्वाद दिला (पूर्वार्ध ६३.)

या सर्व विवेचनावरून यादवकाळातही पुरुषप्रधान संस्कृती असल्याचे दिसून येते. पुत्रप्राप्ती हा कुटुंबाच्या दृष्टीने आनंदाचा सोहळा असायचा आणि पुत्रप्राप्ती झाली नाही, तर पुरुषांना बहुपत्नीकत्वाची परवानगी होती. स्त्रियांना मात्र पुनर्विवाहाचा अधिकार नव्हता. विधवा स्त्रियांना समाजात मानाचे स्थान नसायचेच. उलट त्यांनी उपासतापास, व्रतवैकल्ये करीत कडक ब्रह्मचर्याचे पालन करायचे. त्यांना स्वयंपाकघरात वावरायलादेखील मनाई असायची. त्यांच्या हातचे अन्नसुद्धा अपवित्र समजले जायचे. 'लीळाचरित्रात'त सर्वज्ञांच्या परिवारात अशा अनेक स्त्रियांना न्याय्य हक्क मिळाला होता. सर्वज्ञांचा सहवास हा त्यांना माहेरपेक्षाही हक्काचा वाटत होता. स्त्रियांच्या दुःखाची व त्यांच्या सामाजिक हक्काची जाणीव 'लीळाचरित्रा'त पहावयास मिळते. स्त्री-पुरुष समानतेचे सूत्र हे सर्वप्रथम श्रीचक्रधरस्वामींनीच मांडले, म्हणून त्यांच्या परिवारात स्त्री-पुरुषांना समान तत्त्वानेच वागवले जात होते. समाजातील वेश्याव्यवसाय करणाऱ्या 'सामान्य स्त्री'ला देखील स्वामींबद्दल आत्मीयता होती, ती यामुळेच. यादवकालीन अन्य कोणत्याही ग्रंथात स्त्रियांबद्दलची ही कणव दिसून येत नाही. म्हणूनच डॉ. सुमन बेलवलकर म्हणतात त्याप्रमाणे, "जिकडे कोणाचे लक्षही गेले नव्हते अशा स्त्रीच्या दुःखाच्या किती परी या महात्म्याने संवेदनशीलतेने जाणल्या होत्या, हे पाहून आश्चर्य वाटते."[१६] हे अगदीच खरे आहे. नुसती स्त्रियांच्या दुःखाची आणि त्यांच्या हक्काची त्यांनी फक्त दखल घेतली असे नाही, तर परंपरेने नाकारलेला धर्माचा अधिकार त्यांना मिळवून दिला. मध्ययुगीन काळात स्त्रियांच्या संदर्भातील क्रांतीचे हे पहिले पाऊल म्हणावे लागेल.

'लीळाचरित्र' हा ग्रंथ असा सर्वच दृष्टीने व्यापक आहे. लौकिकापासून-अलौकिकापर्यंत अनेक संदर्भ यात पाहवयास मिळतात. अध्यात्म हा त्याचा पाया असला, तरी समाजातील विविध घटकांचा त्यात समावेश झाल्याने त्याची व्यापकता अधिक वाढली आहे. म्हणूनच अध्यात्मापासून ते विविध व्यवसाय करणाऱ्या समाजातील सर्व घटकांचे चित्रण 'लीळाचरित्रा'त येते. समाजातील विविध लोकाविष्कारांचे उल्लेख 'लीळाचरित्रा'त आलेले आहेत. उदाहरणार्थ, पहाटेच्या वेळी देवाची करुणा भाकीत फिरणारा 'पांगुळ' (उत्तरार्ध ३५), वासुदेवासारखाच असणारा व शीघ्रकवित्व करणारा 'भगत' (पूर्वार्ध ४१८), देवीच्या मंदिरात गोंधळ घालणारा 'गोंधळी' (उत्तरार्ध २४२) इत्यादी. दोरीवरून चालण्याची कला ही यादवकाळात होती. सर्वज्ञांनी 'वर्तेच्या दृष्टांता'त त्याचा योग्य तो वापर केलेला आहे. 'लीळाचरित्रा'त सूत्रांच्या स्पष्टीकरणार्थ आलेल्या दृष्टान्तकथाही लोकसंस्कृतीचा एक सुंदर आविष्कार ठरल्या आहेत.

सर्वज्ञ श्रीचक्रधरांचा वावर समाजातील सर्व स्तरांत असल्याने यादवकालीन लोकसंस्कृतीचे एक समृद्ध असे प्रतिबिंब 'लीळाचरित्रा'त उमटलेले आहे. 'लीळाचरित्र' हा श्रीचक्रधरस्वामींचा चरित्रग्रंथ असला, तरी तो यादवकालीन लोकसंस्कृतीचा एक भाष्यकार म्हणावा लागेल. त्यात केवळ चित्रण नाही; तर लोकरूढी, लोकपरंपरा, लोकसंकेतांचा अन्वयार्थ आहे आणि म्हणूनच सर्वांगपरिपूर्ण असलेला हा ग्रंथ म्हणजे मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या इतिहासातील एक सुवर्णपान ठरला आहे.

**संदर्भ आणि टिपा**

१. लीळाचरित्रातील समाजदर्शन, सुमन बेलवलकर,



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००९, पृष्ठ क्रमांक ३४.
२. आमची संस्कृती, इरावती कर्वे, देशमुख आणि कंपनी, पुणे, पुनर्मुद्रण २०१०, पृष्ठ क्रमांक ९.
३. लोकधाटीच्या वहिवाटी, डॉ. मधुकर वाकोडे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००५, पृष्ठ क्रमांक ११.
४. स्मृतिस्थळ, संपादक- डॉ. रमेश आवलगांवकर, चंद्रकला प्रकाशन, पुणे, १९९९, स्मृती क्रमांक ४७.
५. लीळाचरित्र, संपादक- डॉ. वि. भि. कोलते, महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीयावृत्ती, १९८२, लीळा क्रमांक पूर्वार्ध ११६. प्रस्तुत शोधलेखात लीळाचरित्रातील आलेले संदर्भ याच प्रतीतून वापरलेले आहे. म्हणून जेथे लीळेचा संदर्भ आला असेल तेथे कंसात फक्त लीळा क्रमांकाचाच उल्लेख केलेला आहे.
६. स्थानपोथी : एक पुरातत्त्वीय अभ्यास (यादवकालीन महाराष्ट्र), डॉ. अरुणचंद्र शं. पाठक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१३, पृष्ठे १२९ ते १४८.
७. लोकसंस्कृतीचा अंतःप्रवाह, डॉ. शरद व्यवहारे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९९, पृष्ठ क्रमांक १९.
८. लोकधाटीच्या वहिवाटी, डॉ. मधुकर वाकोडे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००५, पृष्ठे १६-१७.
९. प्राचीन मराठी वाङ्मयातील लोकतत्त्व, डॉ. अमिता मुजुमदार, सविता प्रकाशन, औरंगाबाद, १९८८, पृष्ठ क्रमांक २०९.
१०. श्रीविठ्ठल : एक महासमन्वय, डॉ. रा. चिं. ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००५, पृष्ठ क्रमांक १६७.
११. तत्रैव, पृष्ठ क्रमांक १७५.
१२. तत्रैव, पृष्ठ क्रमांक १६५.
१३. लोकधाटीच्या वहिवाटी, डॉ. मधुकर वाकोडे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००५, पृष्ठ क्रमांक २०.
१४. लीळाचरित्रातील समाजदर्शन, सुमन बेलवलकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००९, पृष्ठ क्रमांक ११६.
१५. लोकधाटीच्या वहिवाटी, पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ११.
१६. लीळाचरित्रातील समाजदर्शन, पूर्वोक्त, पृ. क्र.२१८.

सर्व धर्म अध्ययन केंद्र

**बौद्ध धर्माचा अभ्युदय आणि प्रसार**

प. ल. वैद्य

(या विषयावरील एक मौलिक परंतु दुर्मिळ ग्रंथाचे पुनर्मुद्रण. किंमत रू. ५०.००)

**धर्मश्रद्धा : एक पुनर्विचार**

दि. के. बेडेकर

(आवृत्ती दुसरी; पृष्ठे ६४+८; किंमत रू. ३०.००)

*संपर्कासाठी पत्ता :* सचिव, प्राज्ञपाठशाळा मंडळ,
३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

# क्रांतीचा जयजयकार

सुरेश भृगुवार

ब्रिटिशांनी भारतावर सुमारे दीडशे वर्षे राज्य केले. ह्या प्रदीर्घ काळात प्रजेवर अतोनात जुलूम केले. या जुलमांविरुद्ध लढा देण्यासाठी संपूर्ण देशातून राजकीय विचारवंत व गुलामगिरीपूर्वीच्या विविध प्रांतांतील संस्थानिक व राजे यांनी एकत्र येऊन १८५७ साली ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध पुकारले. ब्रिटिश राजसत्तेला हे सहन झाले नाही. या स्वातंत्र्ययुद्धाला त्यांनी राजसत्तेविरुद्धचे बंड (Mutiny) असे मानून त्या सर्वांना राजद्रोही ठरविले व हिंदू संस्थानिकांची संस्थाने एका मागोमाग खालसा केली.

१८५७ सालापासून जे स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाले, ते भारताला १९४७ मध्ये स्वतंत्र करूनच थांबले. कुसुमाग्रजांना क्रांतिकारकांविषयी स्नेहादर होता. साहसी वीरांचे त्यांना कौतुक होते.

'क्रांतीचा जयजयकार' ही कुसुमाग्रजांची अत्यंत गाजलेली कविता आहे. ही कविता त्यांनी नाशिकला १९३९ साली म्हणजे त्यांच्या वयाच्या २८ व्या वर्षी लिहिलेली आहे. म्हणजे पारतंत्र्यकाळातच हो कविता लिहिली गेली. संपूर्ण देशातील तरुण ब्रिटिश सत्तेविरुद्धचा आक्रोश आपआपल्या परीने व्यक्त करीत होते व काही साहसी वीर लढा देत होते. कुसुमाग्रजांनी आपल्या लेखणीद्वारे या क्रांतिकारकांच्या कामगिरीचे साभिमान कौतुक केले, त्यांना मानवंदना दिली. ही मानवंदना म्हणजेच 'क्रांतीचा जयजयकार' ही कविता होय.

आता कवितेकडे वळू. कवितेची शैलीवैज्ञानिक समीक्षा करण्यापूर्वी वाचकांच्या सोयीसाठी त्वरित संदर्भ (Ready Reference) म्हणून कविता पुढे देत आहे :-

'क्रांतीचा जयजयकार'

१) गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार.
२) अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार!
३) खळखळु द्या या अदय शृंखला हातापायांत.
४) पोलादाची काय तमा मरणाच्या दारात?
५) सर्पांनो उद्दाम - आवळा कसूनिया पाश.
६) पिचेल मनगट परी उरातिल अभंग आवेश.
७) तडिताघाते कोसळेल का तारांचा संभार.
८) कधीही तारांचा संभार.
९) गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जाजयजयकार!

१०) क्रुद्ध भूक पोटात घालु द्या खुशाल थैमान.
११) कुरतडु द्या आतडी करू द्या रक्ताचे पान.
१२) संहारक काली, तुज देती बळीच आव्हान.
१३) बलशाली मरणाहुन आहे अमुचा अभिमान.
१४) मृत्युंजय आम्ही! अम्हांला कसले कारागार!
१५) अहो हे कसले कारागार!
१६) गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार!

१७) पदोपदी पसरून निखारे आपुल्याच हाती.
१८) होउनिया बेहोष धावलो ध्येयपथावरती.
१९) कधि न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे.
२०) बांधु न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे.
२१) एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार.
२२) होता पायतळी अंगार.
२३) गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार!

२४) श्वासांनो, जा वायूसंगे ओलांडुनि भिंत.
२५) अन् आईला कळवा अमुच्या हृदयातिल खंत.
२६) सांगा वेडी तुझी मुले ही या अंधारात.
२७) बद्ध करांनी अखेरचा तुज करिती प्रणिपात.
२८) तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार.
२९) तयांना वेड परी अनिवार.
३०) गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार!

३१) नाचविता ध्वज तुझा गुंतले शृंखलेत हात.
३२) तुझ्या यशाचे पवाड गाता गळ्यात ये तात.
३३) चरणांचे तव पूजन केले म्हणुनि गुन्हेगार.
३४) देता जीवन-अर्घ्य तुला ठरलो वेडेपीर.
३५) देशिल ना पण तुझ्या कुशीचा वेड्यांना आधार.
३६) आई, वेड्यांना आधार.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

३७) गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार !

३८) कशास आई, भिजविसि डोळे, उजळ तुझे भाल.
३९) रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल.
४०) सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते.
४१) उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते.
४२) लोहदण्ड तव पायांमधले खळाखळा तुटणार.
४३) आई, खळाखळा तुटणार.
४४) गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार !

४५) आता कर ओंकारा, तांडव गिळावया घास.
४६) नाचत गर्जत टाक बळींच्या गळ्यांवरी फास.
४७) रक्तमांस लुटण्यास गिधाडे येउ देत क्रूर.
४८) पहा मोकळे केले आता त्यासाठी ऊर.
४९) शरिरांचा कर सुखेनैव या सुखेनैव संहार.
५०) मरणा, सुखेनैव संहार.
५१) गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार !

———x———

५१ ओळींची ही कविता सात कडव्यांची आहे. पहिल्या कडव्यात ९ ओळी असून बाकीच्या सहा कडव्यांत एकूण ४२ ओळी आहेत. प्रत्येक कडव्यात ७ (सात) ओळी आहेत. ही कविता चन्द्रकांता ह्या मात्रा-वृत्तात रचलेली आहे. या वृत्तात २६ मात्रा आहेत. हे वृत्त प्रवाही आहे. हे द्रुतगतीने चालते. वीररसात्मक कविता सामान्यतः या वृत्तात केली जाते. या वृत्तात जोश, उत्साह व काहीशी आक्रमकताही जाणवते. 'क्रांतीचा जयजयकार' ह्या कवितेसाठी कविवर्य कुसुमाग्रजांनी 'चन्द्रकांता' ह्या वृत्ताची निवड केली हे यथोचित झाले. शब्दयोजनाही भावानुकूल झालेली आहे.

आता कवितेत उपयोजित प्रमुख शैलीउपायांच्या निवडक उदाहरणांची शैलीवैज्ञानिक समीक्षा (Stylistic Analysis) करू.

(एक) शब्दविवेक - (Choice of Words)

कवितेत शब्दनिवडीला अत्यंत महत्त्व आहे. (Best Words in the Best Orders.) कवितेतील भावानुकूल नेमक्या (Most Just) शब्दांच्या शोधात कवी असतात. श्रेष्ठ कवींना नेमके शब्द सहज सुचतात. उचित शब्दयोजनेतूनच कवीची शैली प्रकट होत असते. यांची शब्दांवर हुकमत असते. त्यांना 'शब्दप्रभु' म्हणतात. त्यांना शब्दसृष्टीचे ईश्वर म्हणून मान्यता मिळते.

शब्दविवेक ह्या शैलीउपायांतर्गत पुढील शब्दजाती येतात. :-

१) विशेषणे, २) क्रियाविशेषणे, ३) क्रियापदे, ४) शब्दलोप इत्यादी.

१) विशेषणे - सामान्यतः कवितेत विशेषणांचा अधिक वापर करण्याकडे बहुतेक कवींची प्रवृत्ती असते. काही कवी तर विशेषणांची अनावश्यक गर्दी करतात. समर्पक व नेमकी विशेषणे योजण्यात श्रेष्ठ कवींचा कल असतो. ह्या योजनेतून कवीची शैलीच प्रकट होते.

प्रस्तुत कवितेत कुसुमाग्रजांनी पुढील सहा विशेषणे योजिली आहेत :-

१) अदय, २) उद्दाम, ३) क्रुद्ध, ४) बलशाली, ५) बद्ध, ६) क्रूर.

यांपैकी निवडक दोन उदाहरणांची शैलीवैज्ञानिक चर्चा करू :-

१) अदय - हे विशेषण तिसऱ्या ओळीत असून ते शृंखला या नामाचे आहे. या विशेषणाऐवजी 'निर्दय' हे विशेषण अधिक प्रचलित असल्यामुळे 'अदय' च्या स्थानी कुणाला कदाचित ठेवावेसे वाटेल. परंतु त्यासाठी अन्य शब्दांच्या स्थानांत बदल करावा लागेल. कारण 'अदय' हे विशेषण तीन मात्रांचे आहे तर 'निर्दय' ह्या शब्दांत चार मात्रा आहेत. 'चन्द्रकांता' हे मात्रावृत्त असल्याने मात्रांचे भान ठेवणे आवश्यक आहे. अर्थातच 'अदय' च्या स्थानी 'निर्दय' हे विशेषण बसू शकत नाही. 'अदय' या विशेषणाची केलेली निवड यथोचित आहे. कवीने हा नवीन शब्द स्वतः निर्माण केलेला आहे.

शिवाय 'निर्दय' हे विशेषण 'अदय' च्या तुलनेत कठोर व कर्णकटू वाटते. 'निर्दय' ह्या शब्दात दयाहीनतेची पराकाष्ठा अंतर्भूत आहे.

'अदय' हे 'शृंखला' शब्दाचे विशेषण आहे. ह्या शृंखला तुरुंगात बंदिस्त असलेल्या राजबंद्यांच्या हातापायांत जखडलेल्या आहेत. राजबंद्यांचे व्यवहार शृंखलाबद्ध हातापायांनी होताना शृंखलांचा नाद होणारच. शृंखलांमुळे



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

हातांची हालचाल हळू होईल. त्यामुळे शृंखलांचा होणारा नाद सौम्य राहील. ह्या सौम्य नादामुळे राजबंद्यांना होणारे कष्ट काहीसे सुसह्य होतील. ("गाण्याने श्रम वाटतात. हलके हेही नसे थोडके" -केशवसुत)

बेचाळिसाव्या ओळीत लोहदंड हा शब्द वापरलेला आहे. ह्या सहाव्या कडव्याचा प्रारंभ "कशास आई भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल" ह्या ओळीने होतो आणि शेवट "लोहदण्ड तव पायांमधले खळाखळा तुटणार" ओळीने होतो. पारतंत्र्यात दीड शतक खितपत पडलेल्या मायभूमीला उज्ज्वल भवितव्याची जाणीव देत पायातील लोहदण्ड खळाखळा तुटतील, असा सुखद दिलासा राजबंदी देत आहेत. लोहदण्ड अत्यंत जड असतील म्हणून ते तोडताना खळाखळा तुटतील. शृंखलांचे वजन त्या मानाने बरेच हलके असेल म्हणून कवीने 'खळखळु द्या' हे शब्द वापरले आहेत.

शृंखला खळखळतात, तर लोहदण्ड खळाखळा तुटतात. कुसुमाग्रजांनी योग्य जागी योग्य शब्द वापरून आपले शब्दकौशल्य प्रकट केले आहे. 'शब्दविवेक' ह्या शैली-उपायाचे (Stylistic Device) सौंदर्य उलगडून दाखविले आहे.

तात्पर्य, शृंखलेच्या संदर्भात 'अदय' या शब्दाची योजना समर्थनीय ठरते.

२) क्रुद्ध :- हे भूक या नामाचे विशेषण आहे. (ओळ क्र. १०) कारावासात राजबंद्यांना मिळणारे अन्न सहसा रुचकर व स्वादिष्ट नसतेच. ते जाडेभरडे व बेचव असते. त्यामुळे राजबंद्यांची अन्नावरची वासनाच मरते. उपासमार होत असल्याने पोटात भुकेचा डोंब उसळत असेल. भुकेमुळे ब्रिटिश सरकारविरुद्ध राजबंद्यांचा क्रोधाग्नी भडकत असेल. हे लक्षात घेऊन कवीने 'क्रुद्ध' भूक असा शब्दप्रयोग केलेला आहे. वरील १० व्या ओळींवरून भूक म्हणजे पोटाची भूक हा विचार सामान्यतः वाचकांच्या मनांत येईल. परंतु सूक्ष्मपणे विचार केल्यास देशभक्त राजबंद्याच्या मनांत राष्ट्रस्वातंत्र्याची भूक असल्याने कवीला हाही अर्थ अभिप्रेत आहे. देशाला स्वतंत्र करण्याच्या ध्येयाने भारलेल्या राजबंद्यांच्या मनांत पोटाच्या भुकेचा विचारही येत नसेल.

डोक्यांत स्वातंत्र्याची भूक व पोटात अन्नाची भूक. या दोन्ही भूकांमुळे त्यांची उपासमारच होत आहे. तरीही राजबंदी म्हणतात,

"क्रुद्ध भूक पोटात घालु द्या खुशाल थैमान।
कुरतडु द्या आतडी करू द्या रक्ताचे पान"।

डोक्यात स्वातंत्र्याची भूक व पोटात अन्नाची भूक. अशा त्यांच्या दयनीय अवस्थेचे वर्णन 'क्रुद्ध भूक' या दोन शब्दांत सामावले आहे. येथे 'क्रुद्ध' हे विशेषण एकूण परिस्थिती पाहता अगदी समर्पक आहे. 'क्रुद्ध' या विशेषणाने राजबंद्याची कष्टद व दुःखद अवस्था सूचित होते.

परंतु देशस्वातंत्र्याचे वेड डोक्यात घेऊन लढणाऱ्या क्रांतिकारकांचे एकच ध्येय असते, एकच भूक असते- देशस्वातंत्र्याची! ध्येयपूर्तीसाठी वाटेलं ती किंमत मोजायला व प्रसंगी प्राणार्पण करायला त्यांची सहर्ष तयारी असते.

कुसुमाग्रजांनी समर्पक व नेमके (Most Just) विशेषण घालून त्या विशेषणाची अर्थव्याप्ती निर्देशित केलेली आहे.

तात्पर्य, योग्य जागी योग्य शब्द ठेवून कवीने आपले शब्दविवेककौशल्य पुन्हा एकदा प्रकट केलेले आहे.

**क्रियाविशेषण**

"आता कर ओंकारा, तांडव गिळावया घास" (ओळ क्र.-४५)

'आता' या कालदर्शक क्रियाविशेषणाने वरील ओळीची सुरुवात झालेली आहे. येथे 'आता कर' हे शब्द (म्हणजे क्रियाविशेषण व क्रियापद) ओंकाराला संबोधून कृतिप्रवृत्त करण्यासाठी कर्त्याच्या पूर्वी ओळीच्या आरंभी टाकलेले आहे. येथे क्रमविपर्यय हा शैलीउपाय आहे. (याविषयी पुढे विवेचन येईल.) 'ओंकारा आता कर...' च्या ऐवजी "आता कर ओंकारा" ही मांडणी अधिक प्रभावी असून यामुळे राजबंद्यांची कृती लवकर करण्याची घाईसुद्धा दिसून येते. ओंकाराने तत्परतेने तांडवनृत्य करावे. क्रियापद कर्त्याच्या पूर्वी आल्याने अविलंबे कृती व्हावी ही राजबंद्यांची इच्छा सूचित होते. विवेचनाच्या अंती विषयाचा समारोप करताना कवी 'आता' ह्या कालदर्शक क्रियाविशेषणाने प्रारंभ करतात. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीचा शेवट करताना १८ व्या अध्यायात पसायदान



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

लिहिताना आरंभीची ओवी 'आता' शब्दाने सुरू केलेली आहे. ती ओवी अशी –

आता विश्वात्मकें देवें। एणें वाग्यज्ञें तोषावें।
तोषोनि मज द्यावें। पसायदान हें।। (ओ. १८.१७७२)

ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाजवळ पसायदानातून विश्वकल्याणासाठी प्रार्थना केलेली आहे. जगाच्या कल्याणाची तळमळ असणाऱ्या एका संतश्रेष्ठाने ईश्वराजवळ हा प्रसाद मागितला.

प्रस्तुत ओळीतून राजबंद्यांनी ओंकाराजवळ जे मागितले आहे, ते त्यांच्यावर ओढवलेल्या परिस्थितीनुसार उचितच होते. मायभूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्याचे एकच ध्येय बाळगुन प्राणपणाने लढणाऱ्या राजबंद्यांनी डोळ्यादेखत आपला मृत्यू बघून मृत्यूपूर्वीच अपयश आल्याची खंत व्यक्त करूनही आईला जो धीर दिला व "कशास आई भिजविसि डोळे उजळ तुझे भाल। रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल" असा दिलासा देवून सरणावर आज आमची प्रेत पेटताच त्या ज्वालामधून भावी क्रांतीचे नेते उठतील व आमच्याकडून अपूर्ण राहिलेले कार्य ते पूर्ण करतील. "लोहदण्ड तव पायांमधले खळाखळा तुटणार" हे अखेरचे शब्द उच्चारून राजबंद्यांनी प्राण सोडले.

ह्यानंतर "आता कर ओंकारा ..." हे शब्द कवीने राजबंद्यांच्या तोंडी घातले आहेत. अर्थात प्राण गेल्यानंतर राजबंदी काय विचार करत असतील ह्याची कल्पना करून कवीने हे सातवे कडवे लिहिलेले आहे, असे मला वाटते. ह्या कडव्यातील काही वाक्ये अत्यंत संतापाने, क्रोधाने व हताश होऊन व्यक्त झाली आहेत.

'आता' पूर्वीच्या सहा कडव्यांमध्ये राजबंद्यांची वीरोचित उत्साहाने भरलेली उत्तुंग अशी प्रतिमा दिसून येते. तसेच वीरोचित शब्द त्यांच्या मुखातून बाहेर पडतात. 'आता' ने सुरू होणाऱ्या सातव्या कडव्यात राजबंद्यांच्या तोंडी कवीने घातलेल्या शब्दांतून क्रोध, आक्रोश, दु:खावेग व हताशा जाणवते. युद्धांत पराभूत झालेल्या वीर योद्ध्यांप्रमाणे त्यांची स्थिती झाल्याचे जाणवते. ह्या संपूर्ण कडव्यातून हे औपरोधिक बोलणे आहे, हे लक्षात येते.

'आता'पूर्वीची स्थिती व नंतरची स्थिती ही दोन स्थित्यंतरे. यामध्ये 'आता' हे क्रियाविशेषण महत्त्वाची भूमिका बजावते. 'आता' हा भावनांदोलनामधील टर्निंग पॉइंट आहे.

'आता' ह्या नेमक्या क्रियाविशेषणाची योजना करून कवीने शैलीय सौंदर्य वाढविले आहे.

(२) "क्रुद्ध भूक ... खुशाल थैमान" (ओ. क्र. १०)

ह्या ओळीत 'घालू द्या' ह्या क्रियापदाचे 'खुशाल' हे क्रियाविशेषण आहे. राजबंदी तहानभुकेची पर्वा न करता – एवढेच नव्हे तर जीविताचीही तमा न बाळगता आपला लढा अखेरपर्यंत चालवितात. याच मनोवस्थेत त्यांच्या तोंडी प्रस्तुत ओळ घातली आहे. प्रस्तुत ओळीतील 'खुशाल' हे क्रियाविशेषण अर्थगर्भ व अर्थव्याप्ती करणारेही आहे. आमच्या कार्यात कितीही अडचणी आल्या, कितीही व्यवधाने आली तरी खुशाल येवोत, आम्हाला त्याची फिकीर नाही. आमच्यापुढे एकच लक्ष्य, एकच ध्येय आहे. एकच निर्धार आहे. हे शब्द व याहूनही अधिक शब्द 'खुशाल' ह्या क्रियाविशेषणात अंतर्भूत आहेत. ह्या शब्दांतून राजबंद्यांच्या मनातील ध्येयप्रीती, ध्येयनिष्ठा, स्वाभिमान, आत्मविश्वास व जिद्द इत्यादी भावोर्मी उचंबळून आलेल्या आहेत. 'खुशाल' ह्या एका साध्या क्रियाविशेषणातून राजबंद्यांच्या जुझारू व्यक्तिमत्त्वाचे सर्व पैलू प्रकाशित झालेले आहेत.

अर्थात ह्या शब्दाची योजना करण्यात कुसुमाग्रजांचे शैलीय सामर्थ्य प्रकट झालेले आहे. 'आता' व 'खुशाल' ह्या दोन्ही शब्दांची निवड करण्यात कवीचे शब्दविवेक-कौशल्य निर्देशित होते.

**(३) क्रियापदे**

"नाचविता ध्वज तुझा गुंतले शृंखलेत हात"

ह्या ओळीत 'गुंतले' हे क्रियापद आहे. 'नाचविता' हा क्रियासाधित प्रत्यय आहे. मायभूमीचा ध्वज नाचविताना राजबंद्यांचे हात शृंखलाबद्ध झालेत. क्रांतिकारकांनी हातात ध्वज घेऊन नाचविले. ही त्यांची कृती ब्रिटिश राजसत्तेला मानवली नाही त्यामुळे त्यांनी राजबंद्यांचे हात शृंखलाबद्ध केलेत. प्रस्तुत ओळीतील 'गुंतले' या क्रियापदाचा विचार करावयाचा आहे. ही ओळ लक्षपूर्वक वाचली तर असे लक्षांत येते की 'गुंतले' हे क्रियापद मधोमध येते. डाव्या बाजूला 'नाचविता ध्वज तुझा' च्या अकरा मात्रा येतात



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आणि उजव्या बाजूला 'शृंखलेत हात' च्या दहा मात्रा येतात. (एका मात्रेचा फरक पडतो. 'गुंतले'च्या पाच मात्रा धरून सव्वीस मात्रा होतात.)

'गुंतले' ह्या क्रियापदाचा संबंध दोन्हीकडे येतो. ध्वज नाचविताना तो घट्ट पकडून ठेवण्यात हात गुंतले आहेत आणि उजवीकडे शृंखलेत हात 'गुंतले' आहेत. कवीने 'गुंतले'चा संबंध नाचविता ध्वज तुझा आणि शृंखलेत हात असा दोन्हीकडे फक्त एकदाच वापरून शब्दांचा मितव्यय साधला आहे. ध्वज नाचविण्यात हात गुंतले ह्याचा परिणाम म्हणून शृंखलेत हात गुंतलेत.

'गुंतले' हा शब्द मधोमध घेवून त्यांनी नेमका शब्द योग्य जागी ठेवून आपले शब्दविवेककौशल्य पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

मायभूमीच्या मुक्तीसाठी क्रांतीचा जयजयकार करीत तिचे ध्वज अधिकाधिक उंच नाचवून आपले ध्येय पूर्ण करणे ही बाब क्रांतिकारकांना स्वाभिमानाची आहे. आपल्या वीरोचित धाडसाचे प्रदर्शन व समर्थन करणे हे न्यायोचित आहे. पण हे आंदोलन चिरडून टाकण्याचाच प्रयत्न ब्रिटिश राज्यकर्त्यांचा असेल. सरकारने आंदोलनकारांच्या हातांत बेड्या ठोकल्या. जे हात एका विधायक कार्यात गुंतले होते, ते अखेर शृंखलेत गुंतले. शृंखलेत गुंतलेले हात अखेरपर्यंत मोकळे झाले नाहीत.

'गुंतले' ह्या क्रियापदाने एकूण परिस्थितीची गंभीरता व परिणामाची भीषणता दिग्दर्शित केलेली आहे. आपल्या मायभूमीचे गोडवे गाणे आणि उत्साहाने जल्लोष करणे व जनजागृती करणे याचे फळ अखेर मृत्युदंड ठरते. हा दैवदुर्विलास होय.

(२) "तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार" (ओ. क्र. - २८)

ह्या ओळीत 'होते' हे क्रियापद कवीने भूतकाळातील वापरलेले आहे. यापूर्वीच्या ओळींमधून मायभूमीच्या मुक्तीसाठी ते काय काय करीत आहेत, हे सारे वर्तनमानकालीन क्रियापद वापरून सांगितले गेले आहे. राजबंद्यांचे धाडसी प्रयत्न व लढा चालूच आहे. पण आपण अपयशी ठरू ही जाणीवही त्यांना हळूहळू होत चाललेली आहे, हे खालील ओळींमधून व्यक्त होते :- (राजबंदी वायूसंगे आपला संदेश मायभूमीला पोचवतात.)

"सांगा वेडी तुझी मुले ही या अंधारात
बद्ध करांनी अखेरचा तुज करिती प्रणिपात"

राजबंदी आईला अखेरचा प्रणिपात करीत आहेत. अर्थात त्यांना आपल्या जीवनाची अखेर येऊन ठेपली आहे, हे कळून चुकले होते व आता आपण आईला मुक्त करू शकत नाही, हेही कळून चुकले. परंतु आपण आपल्या ध्येयपूर्तीच्या प्रयत्नात कमी पडलो नाही. अखेरपर्यंत प्रयत्न चालूच होते.

राजबंद्यांनी प्रामाणिकपणे लढूनही त्यांना अपयशच आले याची खंत मनात ठेवून आपल्या प्रामाणिकतेची खात्री आईला देण्यासाठी "तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार" या शब्दांत दिलगिरी व्यक्त केली. ही दिलगिरी व्यक्त करताना राजबंद्यांचे कंठ दाटून आले असतील. 'होते' या क्रियापदातून आता आपण पूर्णपणे असहाय व अपयशी ठरलो या दुःखद जाणिवेचा डंख आत्मग्लानीने भरलेल्या मनांत ठेवून ते या जगाचा निरोप घेतील.

कवीने प्रस्तुत ओळीत 'होते' हे भूतकाळी क्रियापद जाणीवपूर्वक वापरले आहे. 'होते' या क्रियापदामुळे राजबंद्यांची अपयशामुळे झालेली शोकाकुल अवस्था व अपयशाची खंत यथावत व्यक्त झालेली आहे.

मुक्तीचे अनिवार वेड त्यांना आहे. असे 'आहे' हे वर्तमानकाळी क्रियापद वापरण्याची वेळ केव्हाच निघुन गेलेली होती.

कुसुमाग्रजांनी 'होते' या क्रियापदाची योजना करून राजबंद्यांची भावस्पंदने व भावांदोलने नेमकी टिपली आहेत. कवीने उचित स्थानी उचित शब्द योजण्यात आपले शब्दयोजनकौशल्य सिद्ध केलेले आहे.

चवथ्या कडव्यातील अठ्ठाविसाव्या ओळीत आईच्या मुक्तीचे अनिवार वेड होते, हे सांगितले आहे. 'होते' या क्रियापदावरून आता आईला मुक्त करणे अशक्य आहे, हे सूचित होते.

हे अशक्य का आहे हे पाचव्या कडव्यातील पहिल्या दोन ओळींवरून स्पष्ट होते. राजबंद्यांची अगतिकता, असहायता व असमर्थता सूचित करणाऱ्या दोन ओळी पुढीलप्रमाणे आहेत.:-

"नाचविता ध्वज तुझा गुंतले शृंखलेत हात



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तुझ्या यशाचे पवाड गाता गळ्यात ये तात"

ह्यानंतरच्याही दोन ओळी ह्याच भावना सूचित करणाऱ्या आहेत. (पहा ओ. क्र. ३३, ३४) यानंतर राजबंदी आपले जीवन-अर्घ्य देऊन मृत्यूनंतर 'आईच्या कुशीचा' आधार मिळेल ना, अशी याचना करतात.

या दोन कडव्यांनंतर सहावे कडवे सुरू होते. आता चर्चेला घेतलेल्या ओळींकडे वळू. यातील 'भिजविसी' ह्या क्रियापदाचे शैलीविश्लेषण करावयाचे आहे. 'तुझ्या कुशीचा आधार देशील ना?' हा प्रश्न विचारताच राजबंद्यांचे हृदय भरून आले असेल व हे ऐकल्यानंतर आईच्याही दु:खाचा बांध फुटला असेल. हे लगेच लक्षात येऊन कवीने सहाव्या कडव्याच्या दोन ओळी त्यांच्या तोंडी घातल्या :-

"कशास आई, भिजविसि डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल"

आईचे डोळे अश्रूंनी भरून येतील व अखंड अश्रुपात होईलच हे गृहीत धरून राजबंदी "कशास आई भिजविसि डोळे"? तू दु:ख करू नकोस इत्यादी शब्दांनी आईचे सांत्वन करून रात्रीनंतर उषःकाल हा येणारच व दिवस उजाडेल, असा दिलासाही देतात. दु:खालाही केव्हातरी शेवट आहेच व सुखाचेही दिवस येतीलच. आम्ही नसलो तरीही आमची प्रेते सरणावर पेटताच त्या ज्वालांमधून भावी क्रांतिकारक जन्म घेतील व आमचे अपूर्ण राहिलेले कार्य पूर्ण करतील. म्हणून मातें, तुझ्या पायांतील लोहदंड तुटतील व तू स्वतंत्र होशील. त्यामुळे तू रडू नकोस, शोक आवर.

'कशास आई भिजविसि डोळे'? हा प्रश्न व यातील 'भिजविसि' हे क्रियापद हा या करुणरसनाट्याचा मर्मबिंदू आहे. हे नाट्य कवीने चवथ्या, पाचव्या व सहाव्या कडव्यांमधून उभे केले आहे.

कुसुमाग्रज कवी तर आहेतच व यशस्वी नाटककारही आहेत. 'भिजविसि' हे क्रियापद केंद्रस्थानी ठेवून त्याभोवती करुणनाट्य उभे करून क्रियापदाची अर्थव्याप्ती वाढविली आहे.

वर आपण तीन क्रियापदांची शैलीविश्लेषणात्म चर्चा केलेली आहेच. विशेषणे व क्रियाविशेषणे यांच्या तुलनेत क्रियापदांची हाताळणी कुसुमाग्रजांनी आपल्या कुसुमकोमल करांनी नाजूकपणे केलेली आहे.

'शब्दविवेक' ह्या शैलीउपायांच्या उदाहरणांचे विवेचन येथे संपवितो. यानंतर 'आवृत्ती' ह्या शैलीउपायाच्या निवडक उदाहरणांची चर्चा करू.

(दोन) आवृत्ती (Repetition)

आवृत्ती म्हणजे एकच गोष्ट पुन्हा वा पुन्हा पुन्हा सांगणे. कवी आपले काव्य चित्ताकर्षक करण्यासाठी मुद्दाम काही शब्दांची आवृत्ती करतात. लेखन श्रुतिमधुर करण्यासाठी वर्णावृत्ती व लयबद्ध करण्यासाठी शब्दावृत्ती केली जाते. "The repetition of words is used for emphasis" असे मार्जोरी बोल्टन म्हणते. मनाच्या उत्कटावस्थेत पुनरावृत्ती होते, असे ती म्हणते.

कवी एखादा शब्द, शब्दसंहती, एक वा अधिक काव्यपंक्ती तर कधी संपूर्ण कडवे गरजेनुसार सहेतुक आवृत्त करीत असतात. (मर्ढेकरांच्या अनेक कवितांतून कडव्यांची आवृत्ती केलेली दिसून येते. पहिल्या कडव्याची आवृत्ती अंतिम कडव्यात करणे हे मर्ढेकरांच्या शैलीचे पृथगात्म वैशिष्ट्य होय.)

कुसुमाग्रजांनी 'क्रांतीचा जयजयकार' या कवितेतून आवृत्तीचा अभिनव प्रकार आणला आहे. ह्या कवितेच्या प्रत्येक कडव्याची अंतिम ओळ (ओळ - ५ वी) ही सहाव्या ओळीत आवृत्त करताना पाचव्या ओळीतील काही शब्द फक्त आवृत्त केलेले आहेत. उदा., :- (आकडे कवितेतील कडव्यांचे आहेत.)

१) तडिताघाते कोसळेल का तारांचा संभार।।
कधीही तारांचा संभार।।

२) मृत्युंजय आम्ही! आम्हांला कसले कारागार।।
अहो हे कसले कारागार।।

३) एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार।।
होता पायतळी अंगार।।

४) तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार।।
तयांना वेड परी अनिवार।।

५) देशिल ना पण तुझ्या कुशीचा वेड्यांना आधार।।
आई, वेड्यांना आधार

६) लोहदण्ड तव पायांमधले खळाखळा तुटणार।।
आई खळाखळा तुटणार।।

७) शरिरांचा कर सुखेनैव या सुखेनैव संहार।।


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मरणा सुखेनैव संहार ।।

वरील उदाहरणांव्यतिरिक्त "गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार" ही धृवपदाची आरंभीची ओळ प्रत्येक कडव्याच्या अंती आवृत्त झालेली आहे. म्हणजे ह्या कवितेत आठ वेळा आवृत्त झालेली आहे. क्रांतिकारक मातृभूमीला स्वतंत्र करण्याचे वेड घेऊन निघालेले आहेत. सर्व राजबंदी एकमेकांना उत्साह देत क्रांतीचे गीत गात वीरोचित उत्साहाने जात आहेत. ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध पुकारले आहे. मोर्चात सहभागी होणाऱ्या क्रांतिकारकांचा उत्साह, सतत वाढता ठेवण्यासाठी पुन्हा पुन्हा 'गर्जा जयजय...' हा नारा सतत गात गात पुढे जाणे आवश्यकच होते. कारण क्रांतीचा मार्ग किती लांबचा आहे, हे क्रांतिकारकांना माहीत नाही. हे क्रांतियुद्ध किती काळ चालेल व या युद्धाचा शेवट काय होईल, हे माहीत नाही. म्हणून "गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार" ह्या ओळीत क्रांतिकारकांना प्रेरणा देत, त्यांना उत्साह देत अनंत काळपर्यंत ह्या ओळी गायिल्या जातील. क्रांतिकारकांची एक पिढी गेली. त्यांच्या पुढच्या पिढ्या स्वातंत्र्याचे वेड डोक्यांत घेऊन अखंड गातच राहतील, चालतच राहतील.

धृवपदाच्या ओळीची आठ वेळा आवृत्ती करून तिची अनिवार्यता व अपरिहार्यता वर केलेल्या विवेचनातून स्पष्ट होते.

आता कवीने प्रत्येक कडव्याच्या अंतिम ओळीची जी वैशिष्ट्यपूर्ण आवृत्ती केलेली आहे, त्याचे शैलीविश्लेषण (Stylistic Analysis) करू. वर प्रत्येक कडव्यातील आवृत्त ओळी दिलेल्या आहेत. मनाच्या उत्कट अवस्थेत पुनरावृत्ती होते हे मार्जोरी बोल्टनचे मत वर नोंदविले आहेच. या पार्श्वभूमीवर कडवे एक ते सातमधल्या पुनरावृत्तीची चर्चा करू. पाचव्या ओळीतील संपूर्ण शब्दांची पुनरावृत्ती न होता अंतिम शब्दांची आवृत्ती होते. हे शब्द आवृत्त होताना प्रत्येक वेळी कवीने एक नवा शब्द टाकलेला आहे. हे शब्द पुढीलप्रमाणे आहेत.:-

१) कधीही, २) अहो, ३) होता, ४) तयांना, ५) आई,६) आई, ७) मरणा.

१) क्रांतिकारकांचे कार्य चालू असतांना ब्रिटिश राजसत्तेने त्यांची अडवणूक करून त्यांना शृंखलाबद्ध केले; पण मरणाच्या दारात उभे असणाऱ्यांना पोलादाची तमा बाळगण्याचे कारण नाही, हे शब्द उच्चारले आणि आकाशातील विद्युल्लतेचे उदाहरण देऊन आपला बाणेदारपणा स्पष्ट केला. विजेच्या आघाताने तारांगण कोसळत नाही, कधीही कोसळत नाही. तसाच आमचा निर्धार कायम राहील.

देशप्रेम, ध्येयवेड, स्वातंत्र्यपूर्तीसाठी बलिदान देण्याची तयारी ठेवून क्रांतियुद्धात उडी घेतलेल्या क्रांतिकारकांचा अदम्य उत्साह, बेबंद आवेग व अपूर्व आवेश या मनाच्या उत्कट भावना व्यक्त करण्यासाठी कवीने शब्दांची आवृत्ती केलेली आहे आणि ती प्रभावपूर्ण ठरली आहे. 'कधीही' या शब्दाने आवृत्तीची अपरिहार्यताच सिद्ध केलेली आहे.

२) दुसऱ्या कडव्यात कारागारात बंदिस्त राजबंद्यांनी कारावासाची आम्हाला पर्वा नाही, या शब्दांत आपली निर्भयता व्यक्त केली. मृत्युंजय आम्ही आम्हाला कसले कारागार एवढेच म्हणून ते थांबत नाहीत, तर "अहो, हे कसले कारागार" अशी पुनरावृत्तोही करतात. ह्या पुनरावृत्तीतून "आमचा मार्ग या कारागृहाच्या भिंती अडवू शकणार नाहीत. मृत्युंजयांना कोण रोधू शकतील?" हेच राजबंद्यांच्या मनातले विचार जणू काही व्यक्त होतात.

क्रांतिकारक राजबंदी स्वतःला मृत्युंजय म्हणतात. ह्यात त्यांची आत्मप्रौढी नसून त्यांचा स्वाभिमान व अभेद्य मनोबलच व्यक्त होत आहे. ही आवृत्ती बघून स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'आत्मबल' या कवितेच्या धृवपदांच्या ओळी येथे द्याव्याशा वाटतात :-

"अनादि मी अनंत मी अवध्य मी मला।
मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला"।।

क्रांतिकारकांची भाषा ही एकच असते. त्यांची राष्ट्रभक्ती, देशाभिमान, निर्धार व ध्येयासक्ती सारखीच प्रखर असते व सारेच क्रांतिकारक मृत्युंजय असतात.

३) एकेच तारा समोर आणिक पायतळी अंगार ।।
होता पायतळी अंगार ।।

क्रांतिवीरांसमोर एकच ध्येय असते, एकच लक्ष्य असते. त्या ध्येयाची पूर्ती होईपर्यंत कितीही संकटे आली तरी त्यांची नजर लक्ष्यापासून विचलित होत नाही. हेच "एकच तारा समोर आणिक पायतळीं अंगार।
होता पायतळीं अंगार"।



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ह्या आवृत्तीतून त्यांच्या झुंजारू वृत्तीचे व अनंत ध्येयासक्तीचे दर्शन होते. पायतळी अंगार असताना- सुद्धा राजबंदी ध्येयापासून ढळत नाहीत. 'पायतळी अंगार' हे दोन शब्द आवृत्त करून व मध्ये 'होता' हा शब्द ठेवून त्यांचा क्रांतिमार्ग हा अग्निपथच असतो, हे आवृत्तीतून अधिक स्पष्ट झाले आहे.

४) "तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार।
तयांना वेड परी अनिवार"।।

मायभूच्या मुक्तीचे अनिवार वेड डोक्यात घेऊन राजबंद्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली; पण दुर्दैवाने त्यांना अपयश आले. याबद्दल आईजवळ खंत व्यक्त करताना त्यांनी प्रस्तुत ओळींतून आईच्या मुक्तीचे अनिवार वेड होते, हे ठासून सांगितले व जोर देण्यासाठी "वेड परी अनिवार" ह्या शब्दांची आवृत्ती केली. ह्या आवृत्तीपूर्वी 'तयांना' हा शब्द कुसुमाग्रजांनी आणला आहे. वस्तुत: राजबंद्यांच्या तोंडी ही ओळ असल्याने 'अम्हाला' हा शब्द कवी वापरू शकले असते परंतु 'होते' हे क्रियापद वापरल्यामुळे कवीने 'तयांना' हा तृतीयपुरुषी शब्द वापरलेला आहे आणि ते उचितच आहे.

पहिल्या चार कडव्यांतील ओळ क्र. ५ व ६ यांमधील आवृत्तींची शैलीविश्लेषणात्मक चर्चा केली आहे. अंतिम तीन कडव्यांतील आवृत्तींची चर्चा विस्तारभयास्तव केलेली नाही. या आवृत्तींकडे सूक्ष्मपणे पाहिल्यास असे लक्षात येते की, प्रत्येक कडव्यातील आवृत्तीमध्ये राजबंद्यांच्या एकेका गुणवैशिष्ट्याचा परिचय करून दिलेला आहे. तो पुढीलप्रमाणे :-

१) प्रबळ आत्मविश्वास, २) स्वाभिमान, ३) ध्येयकेंद्रितता, ४) ध्येयनिष्ठा, ५) मातृभक्ती, ६) आशावाद, ७) निर्भयता.

प्रस्तुत कवितेत पालुपदापासून प्रत्येक कडव्याच्या अंतिम दोन ओळींमध्ये कुसुमाग्रजांनी आवृत्ती साधलेली आहे. ह्या आवृत्त्या शब्दातील ठामपणा आणण्यासाठी, जे सांगायचे आहे त्यावर अधिक जोर देण्यासाठी केलेल्या आहेत. हे तर खरेच; परंतु आवृत्तीसाठी आवृत्ती केलेली नसून प्रत्येक कडव्यातील आवृत्तीमधून राजबंद्यांच्या गुणांचेही दर्शन घडविले आहे.

आवृत्ती ह्या शैलीउपायाची अभिनव योजना केलेली पाहून कविवर्य कुसुमाग्रजांच्या व्युत्पन्न प्रतिभाशक्तीला व अद्‌भुत योजनकौशल्याला दाद द्यावी लागते.

अस्तु. आवृत्ती ह्या शैलीउपायावरील विवेचन आटोपते घेऊन पुढच्या शैलीउपायाकडे वळू.

(तीन) - क्रमविपर्यय - (INVERSION)

गद्यलेखनातील वाक्यांचा शब्दक्रम हा व्याकरणानुसार असतो. काव्यपंक्तीतील शब्दांचा क्रम अनिर्बंध असतो. तो कवीच्या लहरीनुसार ठरतो. म्हणूनच कवीला 'निरंकुश: कवय:' म्हणतात. कवितेतील शब्दांचा क्रम बदलणे म्हणजेच क्रमविपर्यय करणे होय. ह्यालाच शब्दक्रमभंग किंवा व्युत्क्रम असेही म्हणतात. शब्दक्रमभंग हा रचनाप्रधान शैलीउपायांतील एक महत्त्वाचा शैलीउपाय आहे. अक्षरगणवृत्तबद्ध आणि मात्रावृत्तबद्ध कवितांमध्ये ओळींतील शब्दक्रम हा वृत्तछंदादी नियमांवर अवलंबून असतो. तेथे वृत्ताच्या वा छंदाच्या सोयीसाठी शब्दक्रमभंग अपरिहार्य असतो. त्यामुळे अशा कवितांमधील क्रमविपर्ययाची उदाहरणे शैलीविश्लेषणाचा विषय होऊ शकत नाहीत. कारण अशा उदाहरणांतून कवीची शैली दिसून येत नाही.

शैलीवर प्रभुत्व असणाऱ्या श्रेष्ठ कवींच्या वृत्तबद्ध-छंदोबद्ध कवितांमधूनही शैलीविश्लेषणासाठी विपुल उदाहरणे दिसून येतात. मात्र अशी उदाहरणे शोधून काढण्यात शैलीविश्लेषकाचे कसब पणाला लागते.

'क्रांतीचा जयजयकार' ही कविता 'चन्द्रकांता' ह्या सव्वीस मात्रांच्या मात्रावृत्तात बंदिस्त असूनही शैलीविश्लेषणयोग्य अशी उदाहरणे दिसून येतात. त्यांपैकी निवडक चार उदाहरणांची चर्चा करू :-

१) "मृत्युंजय आम्ही अम्हाला कसले कारागार"!
(ओ. क्र. १४)

२) "श्वासांनो जा वायूसंगे ओलांडूनि भिंत"!
(ओ. क्र. २४)

(३) "अन् आईला कळवा अमुच्या हृदयातिल खंत!" (ओ. क्र. २५)

४) "सांगा वेडी तुझी मुले ही या अंधारात!"
(ओ. क्र. २६)

वरील उदाहरणांची चर्चा :-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

१) "मृत्युंजय आम्ही अम्हाला कसले कारागार" ह्या ओळीत 'मृत्युंजय' हा शब्द ओळीच्या आरंभी ठेवला आहे. ह्या शब्दाकडे वाचकांचे लक्ष लगेच वेधावे ह्यासाठी असा शब्द आरंभी ठेवण्याची सामान्यतः कवीची प्रवृत्ती असते. कवीच्या ओळीतील शब्दक्रमात शब्दांचा क्रम बदलून पुढील दोन प्रकारे ओळ लिहिता येईल :-

अ) आम्ही मृत्युंजय अम्हाला कसले कारागार!

ब) कसले कारागार अम्हाला मृत्युंजय आम्ही!

दुसरी परिवर्तित रचना स्वीकारता येत नाही; कारण अंत्य यमक जुळत नाही. म्हणून आपण 'अ' या परिवर्तित रचनेची चर्चा करू.

'अ' ओळीतील सर्व शब्दांवर नजर टाकल्यास व ह्या ओळीच्या पूर्वीच्या ओळींतील भावाशय पाहिल्यास असे लक्षात येते की, राजबंद्यांनी स्वतःसाठी लावलेला मृत्युंजय हा शब्द त्यांना अत्यंत प्रिय आहे. हसत हसत देशासाठी फासावर चढणारे राजबंदी मृत्यूची पर्वा करीत नाहीत. मरणाच्या दारात उभे असलेले राजबंदी मरणाची पर्वा करत नाहीत. अर्थात ते मृत्युंजय आहेत. म्हणूनच कवीने ह्या शब्दाला प्रथमस्थान दिले आहे. ते उचितच आहे. 'मृत्युंजय' हा ह्या ओळीतील प्रभावी शब्द (Prime word) आहे.

पहिल्या परिवर्तित रचनेत 'मृत्युंजय आम्ही' ऐवजी आम्ही मृत्युंजय असा बदल केला आहे. हाही बदल स्वीकारता येत नाही. असे का ह्याची चर्चा करू.

ही ओळ सव्वीस मात्रांची आहे. अर्थात छंदातील मात्रा. ही ओळ गायची झाल्यास संगीतातील त्रितालांत म्हणजे सोळा मात्रांत बांधता येते. पहिल्या मात्रेवर सम आहे. म्हणजे मृत्युंजय या शब्दातील 'मृ' हे अक्षर समेवर येते.

ओळीतील अत्यंत महत्त्वाचा मृत्युंजय हा प्रभावी शब्द ओळीच्या आरंभी व समेवर ठेवून कुसुमाग्रजांनी क्रमविपर्यय या शैलीउपायाचे औचित्यसौंदर्य साधले आहे. राजबंदी मृत्युंजय आहेत, आपल्या कृतीने ते अमर झाले आहेत, हे 'मृत्युंजय' हा शब्द प्रथमस्थानी आणून ठामपणे सांगितले आहे. तात्पर्य, प्रतिभावान कवीच्या शब्दांचा क्रम अटळ असतो व तो शब्दक्रम बदलता येत नाही, हेच खरे.

वरील क्रमांक २, ३, ४ ह्या ओळींमधील 'क्रमविपर्यय' ह्या शैलीउपायाच्या उदाहरणांची चर्चा सलग करू.

ह्या तीनही ओळींकडे लक्षपूर्वक पाहिल्यास असे दिसून येते की, ओळींच्या आरंभी क्रमशः दुसऱ्या, तिसऱ्या व पहिल्या स्थानी 'जा, कळवा व सांगा' अशी तीन क्रियापदे आलेली आहेत. सामान्यतः क्रियापद वाक्याच्या शेवटी येते. या तीनही ओळींत शब्दक्रमभंग करून व क्रियापदे आधी आणून कवीने क्रमविपर्यय साधला आहे.

क्रांतिकारक आपला लढा नेटाने लढत असताना ब्रिटिशांनी त्यांना पकडले व शृंखलाबद्ध करून कारागृहात टाकले. आता आपली ध्येयपूर्ती होऊ शकत नाही, हे त्यांच्या लक्षात आले. मायभूच्या मुक्तीचे अनिवार वेड खंडित झाले, ही खंत त्यांना आईला कळवायची होती. त्याच दिवशी त्यांना फाशी दिले जाणार होते. तत्पूर्वी आपल्या हृदयातील खंत आईला त्वरेने कळवावी, असे राजबंद्यांना वाटले.

आपला संदेश आईला पोचविण्यासाठी त्यांनी आपल्या श्वासांना दूत करून वायुवेगाने जाऊन आईला ती खंत कळविण्यास सांगितले आणि तिला शृंखलाबद्ध करांनी "तुझी मुले तुला हा अखेरचा प्रणिपात करीत आहेत", हा निरोप यथाशीघ्र पोचविण्यास सांगितले.

हा संदेश द्रुतगतीने पोचवायचा असल्याने श्वासदूतांना तत्परतेने कृतिसिद्ध करण्यासाठी क्रियापदे आरंभी आणणे यथोचितच होते.

आरंभी क्रियापदे आणून क्रमविपर्यय साधला गेला व हा क्रमविपर्यय करून औचित्यसौंदर्य साधले गेले.

योग्य जागी योग्य शब्द आणून योग्य ठिकाणी क्रमविपर्यय करून कवी कुसुमाग्रजांनी ह्या शैलीउपायाचे सामर्थ्य सिद्ध केलेले आहे.

कुसुमाग्रजांनी शब्दविवेक (विशेषणे, क्रियाविशेषणे व क्रियापदे), आवृत्ती आणि क्रमविपर्यय ह्या प्रमुख शैलीउपायांचे दर्शन 'क्रांतीचा जयजयकार' ह्या कवितेत घडविले आहे. ह्या कवितेतून व अन्य कवितांमधूनही त्यांच्या शैलीचा प्रच्छन्न विलास प्रकट होतो.


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

पुस्तक परीक्षण :

# 'इतिहासातील नवे प्रवाह'

मृणाल जोशी

इतिहास म्हणजे पिढ्यान् पिढ्या कोणत्याही बदलाविना हस्तांतरित होत आलेली माहिती नव्हे. ऐतिहासिक घटितांचे स्पष्टीकरण द्यावे लागते. ही स्पष्टीकरणे पुराव्यांचे विश्लेषण करून दिली जातात. नवीन पुरावे उजेडात आले किंवा नवे अन्वयार्थ लावले गेले की, भूतकाळाचे नव्याने आकलन होऊ शकते. म्हणूनच इतिहास ही विद्याशाखा यथार्थ रीत्या समजावून घेण्याआधी इतिहासलेखनशास्त्राची (Historiography) योग्य समज असणे आवश्यक आहे – रोमिला थापर.

प्राचीन काळापासून आजपर्यंत इतिहासलेखनाची पद्धत खूप बदलत गेली. इतिहासलेखनाचा हा इतिहास खूप रंजक आहे. आधुनिक पद्धतीच्या इतिहासलेखनाचा पाया प्रबोधनकाळात घातला गेला. मानव्यविद्येतील एक विद्याशाखा म्हणून इतिहासाची उत्क्रांती युरोपमध्ये प्रबोधनकाळापासून (Renaissance) घडून आली. पूर्वी राजकीय इतिहास हाच खरा इतिहास, असे समजले जात होते. मात्र ही धारणा Annales परंपरेने बदलली. मानवी जीवनाला व्यापून राहणाऱ्या सर्वच पैलूंचा समावेश इतिहासलेखनात केला पाहिजे, असे Annales परंपरेचे म्हणणे होते.

आज इतिहासाच्या कक्षा खूप रुंदावल्या आहेत. इतिहास वेगवेगळ्या विषयांचा लिहिला जातो. जसे देशाचा इतिहास, एखाद्या शहराचा इतिहास, संगीताचा इतिहास, कलेचा इतिहास वगैरे. तसेच इतिहास वेगवेगळ्या परिप्रेक्ष्यांतून पण लिहिला जातो. जसे मार्क्सवादी इतिहास, स्त्रीवादी इतिहास, राष्ट्रवादी इतिहास वगैरे. इतिहासातील ह्या वेगवेगळ्या प्रवाहांचा वेध प्रा. जास्वंदी वांबूरकर-संपादित **'इतिहासातील नवे प्रवाह'** या पुस्तकात घेतला गेला आहे.

ज्या नवीन विषयांचा इतिहास लिहिला जातो, त्यांपैकी स्थानिक इतिहास, प्रादेशिक इतिहास, पर्यावरणाचा इतिहास व खाद्यसंस्कृतीचा इतिहास यांची चर्चा ह्या पुस्तकात करण्यात आली आहे. इतिहास हा अतिव्याप्त विषय आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी वेगवेगळ्या प्रकारे त्याची विभागणी केली जाते. उदा., प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक अशी काळाच्या निकषावर केली जाणारी विभागणी. अशीच स्थळाच्या निकषावर केली जाणारी विभागणी म्हणजे जागतिक इतिहास, राष्ट्रीय इतिहास, प्रादेशिक इतिहास आणि स्थानिक इतिहास, असे डॉ. लहू गायकवाड 'स्थानिक इतिहासलेखन' या आपल्या लेखात नमूद करतात. स्थानिक इतिहास, अर्थात एखाद्या शहराचा/ गावाचा इतिहास. परंतु एखाद्या पेठेचा इतिहास किंवा एखाद्या विद्यापीठाचा इतिहास हासुद्धा स्थानिक इतिहास म्हणून गणला जाऊ शकतो. स्थानिक इतिहासलेखनाचा आढावा घेताना लेखकाने बरीच मनोरंजक माहितीसुद्धा दिली आहे. अनेकदा गावाच्या नावातच त्या गावाचा इतिहास दडलेला असतो. उदा., जुन्नर हे गाव पाण्याशी संबंधित आहे. जुन्नरचे प्राचीन नाव जुनेर होते. नेर हा शब्द 'पाणी' ह्या शब्दापासून बनला आहे. नेर म्हणजे वस्ती करण्यास योग्य प्रदेश. तसेच नेर हा शब्द नगर या प्राकृत शब्दाचे रूप आहे.

स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग आहे. प्रादेशिक इतिहासाची तात्त्विक चर्चा डॉ. राजा दीक्षित यांनी त्यांच्या 'प्रादेशिक इतिहास' या लेखात केली आहे. ते म्हणतात – " भव्य एकत्वाशी जोडलेल्या 'विभागा' च्या अतिविशिष्टत्वाचा वेध प्रादेशिक इतिहास घेतो.... भारत हे भव्य एकत्व मानलं तर उत्तर भारत, दक्षिण भारत, काश्मीर, महाराष्ट्र ... इ. कितीतरी प्रकारच्या विभागांचा समावेश 'प्रादेशिक' या सदरात होऊ शकतो." जागतिकीकरणाच्या लाटेमुळे एकरंगी संस्कृती घडू पाहत आहे आणि राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक संस्कृतीवर/उपसंस्कृतीवर आघात होत आहेत. सांस्कृतिक सपाटीकरणाचे प्रयत्न सुरू आहेत. अशा परिस्थितीत राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक अस्मिता जपण्याची गरज आहे. ह्यासाठी प्रादेशिक इतिहास खूप महत्त्वपूर्ण आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

स्थानिक/ प्रादेशिक वैशिष्ट्यांचा विचार करता त्या त्या ठिकाणचे खाद्यपदार्थ हेदेखील त्या त्या संस्कृतींचा एक अविभाज्य भाग असतात. हे जरी खरे असले तरी 'खाद्यसंस्कृतीचा इतिहास' ही सांस्कृतिक इतिहासाची उपशाखा नसून एक स्वतंत्र ज्ञानशाखा आहे, असे डॉ. मोहसिना मुकादम त्यांच्या 'खाद्यसंस्कृतीचा इतिहास' या लेखात सांगतात. डॉ. मोहसिना मुकादम यांनी लिहिलेला हा लेख वाचून काही वर्षांपूर्वी त्यांनी 'लोकसत्ता'मध्ये लिहिलेली लेखमालिका आठवली. त्या लेखनामागे किती गहन संशोधन होते, हे या लेखातून समजते. पाश्चिमात्य संशोधन क्षेत्रात या ज्ञानशाखेला 'हिस्ट्री ऑफ डायेट', 'हिस्ट्री ऑफ फूड' किंवा 'कुलिनरी हिस्ट्री' असे म्हणतात. खाद्यसंस्कृतीच्या माध्यमातून समाज कसा व्यक्त होत असतो, हे समजावण्याचा प्रयत्न हा इतिहास करतो.

वर आपण पाहिले आहे की, इतिहास वेगवेगळ्या विषयांचा लिहिला जातो, तसाच तो वेगवेगळ्या दृष्टिकोणांतूनदेखील लिहिला जातो. इतिहासावर आज ज्या ज्या विचारप्रणालींचा प्रभाव आहे, त्यापैकी पौर्वात्यवाद/ प्राच्यप्रणाली, स्त्रीवाद, लिंगभाव आणि पुरुषत्व, अब्राह्मणी इतिहास, नवमार्क्सवाद, वंचितांचा (subaltern) दृष्टिकोण, उत्तराधुनिकतावाद आणि जमातवाद यांचा समावेश ह्या पुस्तकात केलेला आहे.

Orientalism या शब्दासाठी पौर्वात्यवाद व प्राच्य-प्रणाली या दोन्ही शब्दांचा प्रयोग केला जातो. या विचारप्रणालीची चर्चा डॉ. राजा दीक्षित आणि डॉ. श्रद्धा कुंभोजकर यांनी वेगवेगळ्या लेखांमध्ये केली आहे. भारतातील प्राच्यप्रणालीविषयीची चर्चा करणारे लेखन मराठीत फारसे उपलब्ध नाही. डॉ. राजा दीक्षित यांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण पण तितक्याच सोप्या भाषेत लिहिलेल्या लेखात याचा परामर्ष घेतला आहे. प्राच्यप्रणालीकार कोणाला म्हणावे ह्यासाठी डॉ. दीक्षित यांनी प्राच्यविद्याभ्यासक आणि आंग्लवादी (उदारमतवादी, उपयुक्ततावादी, शुभवर्तमानवादी) असे दोन ठळक गट केले आहेत. मात्र त्यांच्या पूर्वेविषयीच्या (अर्थातच भारताविषयीच्यासुद्धा) दृष्टिकोणांमध्ये भिन्नता होती. परंतु मूलतः हे दोन्ही गट पाश्चात्त्य साम्राज्यवादाचे प्रतिनिधी होते, समर्थक होते आणि पूर्वेकडे पाहण्यासाठी पश्चिमी वर्चस्ववादाचा चष्मा त्यांनी लावला होता, अशी मांडणी त्यांनी केली आहे.

पौर्वात्यवादी लेखन केवळ आधुनिक काळापुरते मर्यादित नाही; त्याला एक प्राचीन वारसा आहे, ही बाब डॉ. श्रद्धा कुंभोजकर यांनी अधोरेखित केली आहे. ढोबळमानाने युरोप हे जगाच्या मध्यावर मानून त्याच्या मानाने पूर्वेला असणाऱ्या विविध संस्कृतींतील विविध अंगांचा विचार आणि अभ्यास करणे याला १९७८ पर्यंत पौर्वात्य अभ्यास किंवा पौर्वात्यवाद म्हटले जाई, असे डॉ. कुंभोजकर आपल्याला सांगतात. १९७८ मध्ये एडवर्ड [illegible] 'Orientalism' हे पुस्तक प्रकाशित झाले आणि पौर्वात्यवाद या संकल्पनेत आमूलाग्र बदल झाला. पाश्चात्त्य अभ्यासकांनी केलेल्या पूर्वेविषयीच्या अभ्यासात जेतेपणाचा आणि आपल्या वसाहतींवर असणाऱ्या आपल्या सत्तेसाठी समर्थन मिळवून देण्याचा उद्देश स्पष्ट होतो, ही बाब सैद यांच्या लिखाणामुळे अधोरेखित झाली.

गेल्या ३०-३५ वर्षांपासून भारतीयांना स्त्रीवाद, स्त्रीवादी इतिहास व लिंगभाव इतिहास हे शब्द काहीसे माहितीचे झाले असले, तरी त्यांबाबत सैद्धान्तिक स्पष्टता सर्वसाधारणपणे खूपशी नसते. प्रा. जास्वंदी वांबूरकर यांनी 'स्त्रीवाद' व 'स्त्रीवादी इतिहास' या दोन लेखांत आपल्याला स्त्रीवाद व स्त्रीवादी इतिहासाची खूप चांगली ओळख करून दिली आहे. स्त्रीवादाचा उगम पाश्चिमात्य जगात १९ व्या शतकात झाला. तिथपासून ते आजपर्यंतचा स्त्रीवादाचा इतिहास आणि स्त्रीवादातील वेगवेगळे विचार-प्रवाह यांचा आढावा प्रा. वांबूरकर यांनी 'स्त्रीवाद' या त्यांच्या लेखात घेतला आहे. 'स्त्रीवादी इतिहास' या त्यांच्या दुसऱ्या लेखात प्रा. वांबूरकर सांगतात, 'स्त्रीवादाच्या प्रभावामुळे आत्मभान आलेल्या स्त्रियांना, स्त्रिया भूतकाळात काय करत होत्या, हे जाणून घेण्याची गरज भासली; कारण मुख्य प्रवाही इतिहासात ही माहिती त्यांना कुठे सापडलीच नाही. त्या स्त्रियांचा इतिहास लिहू लागल्या.' स्त्रियांच्या इतिहासापासून सुरुवात करून, आता स्त्रीवादी इतिहास/लिंगभाव इतिहास इथपर्यंत हा प्रवास येऊन पोचला आहे. आज इतिहासलेखनशास्त्रातील सर्वांत प्रभावी ज्ञानशाखा म्हणून स्त्रीवादी इतिहासाचा उल्लेख करता येईल.

लिंगभाव अभ्यासात स्त्रीत्व आणि पुरुषत्व अशा दोन्ही शाखांचा अभ्यास अभिप्रेत आहे; पण सर्वसाधारणपणे लिंगभाव अभ्यासात स्त्रीत्वाचाच अभ्यास केलेला दिसतो. मात्र १९७० च्या दशकापासून पुरुष व पुरुषत्व यांचा अभ्यास पाश्चिमात्य देशांमध्ये सुरू झाला. केदार देशमुख यांनी पुरुष व पुरुषत्व या विषयावरील संशोधनाची ओळख आपल्याला त्यांच्या 'लिंगभाव आणि पुरुषत्वाचा अभ्यास' या लेखात करून दिलेली आहे. स्त्रीवादसमर्थक व पुरुष हक्कांचे समर्थक अशा दोन्ही पद्धतींच्या पुरुषत्वाचे राजकारण विकसित झाले. भारतातदेखील साधारणपणे ८० च्या दशकापासून हे दोन्ही गट दिसू लागले, अशी माहिती देशमुखांच्या लेखातून मिळते. मात्र भारतातील पुरुषत्वाविषयीचे ऐतिहासिक संशोधन अजून फारच बाल्यावस्थेत आहे, ही त्यांनी व्यक्त केलेली खंत रास्त आहे.

मुख्य प्रवाही इतिहासातून ज्याप्रमाणे स्त्रियांना वगळण्यात आले, त्याचप्रमाणे समाजातील इतर गटांना –दलित शोषितांनादेखील– वगळण्यात आले. १९ व्या शतकात वसाहतवाद्यांनी भारतीय जातिसंस्थेचा केलेला अभ्यास, राष्ट्रवादी इतिहासमीमांसकांनी दुर्लक्षिला. राष्ट्रवादी इतिहासकारांनी जातीच्या विषमतापूर्ण उतरंडीला मोगलकाळ आणि ब्रिटिशकाळच जबाबदार धरला. मार्क्सवाद्यांनी जात हा इमल्याचा भाग मानल्याने वर्गक्रांतीनंतर जाती नष्ट होतील, असा भाबडा आशावाद बाळगला. Subaltern इतिहासकारांनी फुले-आंबेडकर-पेरीयार यांचे जातिध्वंसनाचे काम दुर्लक्षून आपले संशोधन अभिजनवादी वळणावरच नेले. स्त्रीमुक्तिवाद्यांनी 'सर्व स्त्रिया समान शोषित असतात' असा नारा देताना, दलित स्त्रियांचे जातिव्यवस्थेतून आलेले प्रश्न अभ्यासण्याची तसदी घेतली नाही. जातवर्ग-स्त्रीदास्यान्तक अब्राह्मणी चळवळीसमोर असा कटू अनुभव असल्याने त्यांनी उपरोक्त पाचही प्रवाहांची चिकित्सा आरंभली, असे 'अब्राह्मणी (जातवर्गस्त्रीदास्यान्त) इतिहासमीमांसा' या लेखात डॉ. नारायण भोसले आपल्याला सांगतात.

डॉ. भोसले यांनी जातवर्गलिंगभावकोटीक्रमाद्वारे इतिहासाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात, "भारतीय संदर्भात वर्गाबरोबर जात महत्त्वाची असल्याने आणि स्त्रीदास्यांना पितृसत्तेचा संदर्भ असल्याने जातिव्यवस्थाक पितृसत्ताकतेमुळे शोषित बनलेला 'नाही रे' गट हा येथील बहुसंख्य गट आहे आणि म्हणूनच 'नाही रे' गटाचा इतिहास हा खऱ्या अर्थाने भारताचा इतिहास आहे."

शैक्षणिक वर्तुळात आजचे जग हे उत्तराधुनिक जग म्हणून ओळखले जाते. उत्तराधुनिकतावाद ही एक जटिल संकल्पना आहे. 'उत्तराधुनिकतावाद आणि इतिहास' ह्या लेखात डॉ. पुतुल साठे यांनी (अनुवाद – प्रा. चित्रा लेले) उत्तराधुनिकतावादाची संकल्पना स्पष्ट करताना म्हटले आहे –"उत्तराधुनिकतावाद ही संकल्पना तुटक, प्रवाह खंडित करणे/होणे, स्थान विस्थापित करणे/होणे आणि विकेंद्रितता यांच्याशी संबंधित आहे. उत्तराधुनिकतावाद हे काही आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे घटित नाही; उलट, प्रामुख्याने युरोपीय आणि अमेरिकन रचित आहे...." ज्ञानोदयाने स्वीकारलेल्या एकरेषीय, प्रागतिक अशा सर्वच धारणांना उत्तराधुनिकतावादाने नाकारले आणि इतिहास व साहित्य यांतील सीमारेषा धूसर केल्या. उत्तराधुनिकतावादाच्या रूढिभंजक संशोधनाने ऐतिहासिक संशोधनाचे क्षेत्र विस्तारले आहे, असेही ह्या लेखात म्हटले आहे. डॉ. साठे यांच्या लेखाची मांडणी चांगली आहे; पण भाषा क्लिष्ट व समजण्यास जरा अवघड आहे.

या लेखात 'इतिहासातील नवे प्रवाह' या पुस्तकातील काही लेखांचा परामर्श घेतला असला, तरी सर्वच लेख उपयुक्त व वाचनीय आहेत. इतक्या जटिल विषयांची चर्चा करतानासुद्धा बहुतेक सर्वच लेखकांनी भाषा शक्य तितकी सोपी ठेवली आहे. तसेच बहुतेक लेखांमध्ये मराठी शब्द/संकल्पना यांसाठी इंग्रजी शब्द/संकल्पना दिल्या आहेत. याचा पुस्तक वाचताना खूप उपयोग होतो.

इतिहासातील काही नवीन व महत्त्वाच्या प्रवाहांची चर्चा ह्या पुस्तकात केली आहे. मात्र प्राचीन काळापासून ते आजपर्यंतच्या इतिहासलेखनाचा इतिहास सांगणारा एखादा लेख ह्या पुस्तकात असायला हवा होता, असे वाटते. त्यामुळे पुस्तकात चर्चिलेल्या प्रवाहांचे ऐतिहासिक संदर्भ समजण्यास सोपे गेले असते. काही प्रमाणात ही उणीव संपादिकेने लिहिलेल्या दीर्घ प्रस्तावनेने भरून



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

काढली आहे, हे निश्चित.

गेल्या काही वर्षांत पदव्युत्तर अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल घडून आले आहेत. त्या अनुषंगाने विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापकवर्ग यांना, तसेच जिज्ञासू वाचकांना या ग्रंथाचा उपयोग व्हावा ही संपादिकेची इच्छा नक्की पूर्ण होईल, यात शंका नाही.

पुस्तकाचे नाव – 'इतिहासातील नवे प्रवाह'
संपादक – प्रा. जास्वंदी वांबूरकर
प्रकाशक – डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
प्रथमावृत्ती – ऑगस्ट २०१४
किंमत – रु. २९५/-.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### घुमान येथील नामदेवांसंबंधी शिलालेख

अ. भा. मराठी साहित्यसंमेलन एप्रिल २०१५ मध्ये पंजाबात गुरुदासपूर जिल्ह्यात घुमान येथे नुकतेच पार पडले. त्यासाठी पंजाब सरकारने भरीव अर्थसाहाय्य केले असून संमेलनाला येणाऱ्या खास असामींसाठी हेलिकॉप्टरही उपलब्ध करून देण्यात आले. घुमान हे पंजाबात नामदेवकी घुमानी नावाने ओळखले जाते. तेथे ४/५ गुरुद्वारे आहेत व नामदेवांचे स्मृतिमंदिर आहे. परंपरेप्रमाणे नामदेवांचे समाधिस्थळ पंढरपूरला आहे. घुमान येथील मंदिरात मोठ्या पितळी पत्र्यावर कोरलेले नामदेवांचे जुने चित्र जतन केले आहे. तेही महाराष्ट्रातील प्रचलित चित्रापेक्षा किंचित वेगळे आहे. शिवशाहीतील दोन संत तुकाराम व रामदास यांच्या शिष्या संत साहियाबाई सिउलकर (इ. स. १६२८-१७००) ह्यांनी म्हटल्याप्रमाणे –

संतकृपा झाली। इमारत फळा आली
ज्ञानदेवे रचला पाया। उभारिले देवळेया।
नामा मयच्या किंकर सेने केलेसे विस्तार।

म्हणजे नामदेव हे महाराष्ट्राचे वारकरी संप्रदायाचे आद्य विस्तारक होत. ज्ञानदेवांचा काळ (इ. स. १२७५-१२९६). नामदेव त्यांच्याहून पाच वर्षांनी वडील. त्यांचा काळ (इ. स. १२७०-१३५०) ज्ञानदेवसमाधीनंतर नामदेव ५४ वर्षे हयात होते. भागवतधर्मांची धर्मध्वजा त्यांनी पंजाबमध्ये पोचविली. महाराष्ट्रातील परंपरेनुसार नामदेवांचे समाधिस्थळ पंढरपुरात आहे.

मराठी भाषेत अभंगरचना करणारे पहिले मराठी संतकळी नामदेव होते. केवळ मराठीच नव्हे, तर इतर भाषांत अभंगरचना ज्यांनी रूढ केली असे पहिले संत नामदेव होत. शीख संप्रदायाचे संस्थापक गुरुनानकदेव ह्यांनी नाममाहात्म्याची प्रेरणा मुख्यत्वे नामदेवांपासून घेतली असावी. शिखांचा धर्मग्रंथ जो गुरुग्रंथसाहेब– त्यांचा आदिग्रंथ– त्यात नामदेवांची ६१ पदे समाविष्ट आहेत. त्यातील काहींमध्ये नामेका चीतू हरीसऊ लागा



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

म्हणजे नामदेवांचे चित्त हरीशी संलग्न झाले, हरीला चिकटले, असे नामदेवांच्या नाममुद्रेसह भाषेचे मराठी वळण स्पष्ट आहे. घुमान येथे विहिरीत दोन शिलालेख आहेत, जे महाराष्ट्रातील अभ्यासकांना आजतागायत अभ्यासासाठी उपलब्ध झालेले नाहीत. मराठी साहित्य महामंडळाने योग्य ती कारवाई करून पंजाब सरकारच्या पुरातत्त्व संशोधन खात्याच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून ह्या शिलालेखांचे मिळवून ते अभ्यासकांना उपलब्ध करून दिले तर नामदेवचरित्रावर नवा प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने ती ह्या साहित्यसंमेलनाची मोठी उपलब्धी ठरेल. लेखांची भाषा पंजाबी, हिंदी की मराठी, लेखांचा आशय व (असल्यास) त्यातील कालोल्लेख यांविषयी प्रत्यक्षात पाहिल्यावरच काही लिहिता येईल.

- म. शं. वाबगावकर.

---

## लेखकांचा परिचय

⌘ **रमेश वा. धोंगडे**

***पत्ता :–*** शरण्य फ्लॅट ४७, स्वेदगंगा सोसायटी, वारजे, पुणे ४११०५८
दूरध्वनी : ०२०–२५२३०८१६.

⌘ **प्रा. नवनाथ रासकर**

फलटण येथील ‘मुधोजी महाविद्याल’यात तत्त्वज्ञान विषयाचे प्राध्यापक आहेत. त्यांनी ‘स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील धर्मचिंतन’ या विषयावर प्रबंध लिहून विद्यावाचस्पती ही पुणे विद्यापीठाची पदवी मिळविली आहे.
***पत्ता :–*** प्रा. नवनाथ रासकर, मुधोजी महाविद्यालय, फलटण. भ्रमणध्वनी : ९६६५४०९४१५.

⌘ **डॉ. अविनाश आवलगावकर**

पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात प्राध्यापक. व संत नामदेव अध्यासनाचे प्रमुख. मध्ययुगीन व विशेषतः महानुभव साहित्य याविषयी लेखन. नवभारत, अनुष्टुभ्, युगवाणी, मराठी संशोधन पत्रिका, अस्मितादर्श, महाराष्ट्र साहित्य पत्रिका इत्यादीमधून संशोधन व समीक्षात्मक लेखन प्रकाशित.

***पत्ता :*** १०४ सँडलवूड, स्पेन्सर्स लेन, डी. पी. रोड, औंध, पुणे-४११ ००७. दुरध्वनी (०२०) २५८९६१५४.

⌘ **प्रा. डॉ. सुरेश भृगुवार**

बनारस हिंदू विद्यापीठातील मराठीचे प्राध्यापक (निवृत्त.) शैलीशास्त्राचे अभ्यासक. ‘गोविंदाग्रजांची काव्यशैली’, ‘वाङ्मयीन शैली : तरंग–अंतरंग’ या ग्रंथांचे लेखक.
***पत्ता :*** ५०४ पेरेग्राईन, रहेजा वुड्स्, कल्याणी नगर, पुणे ४११ ००६. दूरध्वनी : ९९२३०८०७५८.

⌘ **मृणाल जोशी**

यांचा परिचय व पत्ता मूळ लेखाबरोबर आलेला नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

# आवाहन

'नवभारत' हे वैचारिक मासिक सुरू होऊन आता ६५ वर्षे झाली. साहजिकच मासिकाच्या मूळ कर्त्यांनी जे उद्देश डोळ्यांपुढे ठेवले होते, ते उद्देश स्वीकारून लिहिणारे लेखक व त्या उद्देशांविषयी आस्था बाळगणारे वाचक आता कमी होत चालले आहेत. तरीदेखील वैचारिक आदानप्रदानाचे समर्थ व्यासपीठ म्हणूनच 'नवभारता' ने कार्य करीत राहावे, असाच आमचा संकल्प आहे.

भारतीय परंपरेची ओळख व परिष्करण करून देणारे लेख येतच राहतील. परंतु, विज्ञान, अर्थकारण, तत्त्वज्ञानातील आधुनिक विचारप्रवाह, इतिहासलेखनाला आलेले नवे रूप इत्यादी विषयांची भाष्यरूपाने ओळख करून देणे, नवीन ग्रंथांची समीक्षा करणे, लोकसाहित्य, दलित वाङ्मय यांना जी काळानुरूप वळणे मिळत आहेत त्यांचा मागोवा ठेवणे या विषयांवर भर देणे अगत्याचे झाले आहे. लघुकथा, ललित लेख व कविता या 'नवभारता'ने पूर्वीही कक्षेबाहेर ठेवल्या नव्हत्या व आताही त्या कक्षेबाहेर ठेवलेल्या नाहीत.

आज तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालये निघाली आहेत. येथील शिक्षण मराठी भाषेतून चालते व ते योग्यच आहे. तथापि, इंग्रजी वा अन्य भारतीय भाषांतील विचारप्रवाहांशी या शिक्षणाचा संबंध राहू नये, ही खेदाची गोष्ट आहे. या महाविद्यालयांतील ग्रंथालयात अद्ययावत पुस्तके येत नाहीत व आली तरी ती वाचून सकस चर्चा करतील, असे अभ्यासूंचे गटही सहसा असत नाहीत. आमचे अनेक विद्यार्थी या महाविद्यालयांतून प्राध्यापक व प्राचार्य आहेत. त्यांनी ही व्यथा आमच्यापाशी बोलून दाखविली व असेही सांगितले की, 'नवभारता'तील काही लेखांच्या छायांकित प्रती काढून त्यांनी विद्यार्थ्यांना आवर्जून वाटल्या.

आमची अशी खात्री आहे की, महाविद्यालये, तेथील प्राध्यापक व विद्यार्थी तसेच गावोगावी विखुरलेले अभ्यासू नागरिक यांना 'नवभारत' वाचण्याची व त्यातील लेखांवर चर्चा करण्याची सवय लागून जाईल. या सर्वांनी आपले दर्जेदार लेख 'नवभारत' कडे अवश्य पाठवावेत.

यासाठी 'नवभारता'चा प्रसार झाला पाहिजे. आमची वाचकांना अशी विनंती आहे की, त्यांनी 'नवभारता'ला वर्गणीदार मिळवून देण्याची मोहीम चालवावी. जो वाचक पाच वर्गणीदार मिळवून देईल, त्याने सहाव्या व्यक्तीचे नाव व पत्ता कळवावा. त्या सहाव्या व्यक्तीला 'नवभारता' चे अंक वर्षभर आमच्याकडून विनाशुल्क पाठवले जातील. वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होता येते.

वर्षाची वर्गणी रु. ४००/- असून वर्गणी, चेक/डी.डी./मनिऑर्डर यांच्याद्वारे 'नवभारता'च्या पत्त्यावर पाठवावी. चेक/डी.डी. 'नवभारत' मासिक, या नावाने ३१५, गंगापुरी, वाई ४१२८०३ या पत्त्यावर पाठवावे.

**– संपादक मंडळ**

## लेखकांस आवाहन

*'नवभारत' मासिकामध्ये दर्जेदार वैचारिक लेखनाचे आम्ही नेहमीच स्वागत करतो. पण 'नवभारता' कडे आपले लेखन पाठविण्यापूर्वी काही काळजी घ्यावी, अशी विनंती आहे.*

१. *आपले लेखन सुवाच्य अक्षरात कागदाच्या एकाच बाजूस असावे.*

२. *आपण लेखनासाठी जे संदर्भ वापरले असतील, ते लेखाच्या शेवटी काही टीपा असल्यास त्यांसह द्यावेत.*

३. *महत्त्वाचे म्हणजे आपण आपला लेख यापूर्वी कुठल्याही नियतकालिकात प्रसिद्धीसाठी पाठविलेला नाही, याची स्पष्ट कल्पना 'नवभारत' च्या संपादकांना द्यावी.*

४. *'नवभारत' मध्ये लेख छापण्यापूर्वी तो संपादक मंडळाच्या योग्य त्या सदस्याकडे वाचनासाठी व अभिप्रायासाठी पाठविला जातो. त्यामुळे तो लेख कुठल्या महिन्यात 'नवभारत' मध्ये येईल किंवा येणार नाही, हे यथावकाश कळविले जाईल, याची लेखकांनी कृपया नोंद घ्यावी.*

*आपल्या सहकार्यबद्दल संपादक मंडळ आपले आभारी आहे.*

*– संपादक मंडळ*



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई




हे मासिक प्रा. यशवंत कळमकर यांनी सन प्रिंटर्स, गणपती आळी, वाई, पिन : ४१२८०३ येथे छापून
सरोजा भाटे यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांच्याकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका